


ई पुस्तक निर्मिती व वितरण :

**ई साहित्य प्रतिष्ठान**

फ़ोन : 9869674820

esahity@gmail.com

पत्ता : जी ११०२, इटर्निटी

तीन हात नाका , ठाणे, ४००६०४

www.esahity.com

ई साहित्य प्रतिष्ठान ही नोंदणीकृत संस्था असून अनेक लेखक वाचकांनी एकत्र येऊन सुरू केली. संस्थेतर्फ़े दर आठवड्याला एक मराठी ई पुस्तक चाळीस देशांतील सुमारे दोन लाख वाचकांना विनामूल्य वितरित केले जाते. त्याशिवाय ई साहित्यच्या विविध वेबसाईट्सना लाखो लोक व्हिजिट करतात.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

# प्रतिभेचा स्तिमित करणारा साक्षात्कार

## मुरलीधर जावडेकर यांची कला

**कथाकथन** : १५ ऑगस्ट १९९९ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेत कथासंग्रहप्रकाशन आणि कथाकथन केले. महाराष्ट्रात अनेक प्रयोग केले. श्रोते चकित, आनंदित, प्रभावित होतात. कितीही वर्षे जावोत पुनः भेटले की कथांची आठवण काढतात. आजचे आघाडीचे कथाकार.

**नाट्यवाचन** : 'मस्तानीचा बाजीराव' या स्वतःच्या नाटकाचे वाचन थोरल्या बाजीरावांच्या तीनशेव्या जन्मदिनी पुण्यात केले. त्यानंतर दूरदर्शन (सह्याद्री) ने मुलाखत घेतली आणि नाट्यवाचनाचे वर्णन 'मंत्रमुग्ध करणारे' असे करून ती प्रसृत केली. डॉ. वि. भा. देशपांडे आदींना आवडलेली संहिता आणि नाट्यवाचन.

**काव्यप्रस्तुती** : साहित्य संमेलनाध्यक्ष कविवर्य श्री. नारायण सुर्वे, गंगाधर महांबरे, संगीता जोशी इत्यादींना आवडलेल्या कविता. काव्यसंग्रहप्रकाशन आणि 'काव्याचे नाट्यपूर्ण बहारदार सादरीकरण' केले.

**एकपात्री नाट्यप्रयोग** : 'स्वातंत्र्यवीर' (वि. दा. सावरकर) हा (सावरकरांच्या ६ ध्वनिमुद्रित पदांसह) प्रयोग अत्यंत प्रभावी होतो. स्वर्गीय सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, स्वा. सावरकर संमेलनाध्यक्ष वा. ना. उत्पात आदींनी दाद दिली. प्रेक्षकांना सावरकर भेटल्याचा परमानंद होतो. पुण्याच्या 'सांस्कृतिक वार्तापत्र' संस्थेने याबद्दल सत्कार केला.

**व्याख्यान, मुलाखत इत्यादी** : धर्म, विज्ञान, संस्कृती, वाङ्मय इत्यादी विषयांवर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य प्रांतांतही अनेक व्याख्याने झाली. दूरदर्शन आणि आकाशवाणी यांनी अनेक मुलाखती घेऊन पुनः पुनः प्रसारित केल्या.

**डॉ. मुरलीधर जावडेकर**

**जन्म** : २० मे, १९३६, शिक्षण : एम.ए. (पुणे), पीएच.डी. (मुंबई)
**व्यवसाय** : मराठी, इंग्रजी प्राध्यापक, प्राचार्य.
म्हाडा उच्च उत्पन्न गट वसाहत, इमारत क्र. १,
गाळा क्र. ९, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८
(महाराष्ट्र राज्य-भारत)
**दूरध्वनी** : ०२०-२७४२१६८३
**मोबाईल** : ९८९०१६९१५६



**मुरलीधर जावडेकर**

# सत्तेचा विजय असो!

**मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे**

© सर्व हक्क
**मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे**
(क्र. ई. ५६४८ पुणे दिनांक २१.१.२०११)
यांच्या स्वाधीन

लेखक
**डॉ. मुरलीधर जावडेकर**
उच्च उत्पन्न गट वसाहत,
इमारत क्र.१, गाळा क्र.९,
संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११०१८
दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३
मोबाईल : ९८९०१६९१५६

**प्रथमावृत्ती** : १९७२
**द्वितीयावृत्ती** : २०१२

**मुखपृष्ठ**
लक्ष्मीकांत तोष्णीवाल
९४२२३०७४५३

**अक्षरजुळणी**
व्यंकटेश टाईप
सुजाता तोष्णीवाल, पुणे
९४२०४८०५३६

**मुद्रक**
लकी प्रेस, पुणे ३०

**देणगी मूल्य ₹ १२०**

---

**सूचना** : या नाटकातील सर्व कथा, सर्व पात्रे, सर्व प्रसंग संपूर्णपणे काल्पनिक असून कोणास कोठे वास्तवात साम्य आढळल्यास तो केवळ योगायोग आहे, असे समजावे.

*माझ्यावर प्रेम करणाऱ्या*
*माझ्या सर्व*
*विद्यार्थि-विद्यार्थिनींस*
*सप्रेम अर्पण*

*– मुरलीधर जावडेकर*

# सत्तेचा विजय असो!

## १

## (प्रवेश पहिला)

(प्राचार्य शहाणे यांचे घर. प्रा. शहाणे आणि विद्यार्थिनी शीला व विद्यार्थी सुधीर. एका मांडणीत मुलांचे खेळांचे आणि अभ्यासाचे सामान.)

**शीला** : हुकूमशहा सगळे रोगट मनोवृत्तीचे पिसाट असतात. सगळ्या जगाला गुलामगिरीच्या दुःखात लोटावं आणि आपण एकट्यानं अमर्याद सत्तेचं सुख भोगावं असं वाटणं म्हणजे केवढी विकृती आहे! साऱ्या हुकूमशाही मनोवृत्तीच्या लोकांना पकडून वेड्यांच्या इस्पितळात टाकलं पाहिजे. म्हणजेच साऱ्या जगात खरीखुरी लोकशाही नांदू लागेल, आणि धरतीचं नंदनवन होईल! लोकशाही म्हणजे मूर्तिमंत काव्य! आपण जगावं, इतरांना जगू द्यावं. आपण फुलावं, इतरांना फुलू द्यावं. आपण हसावं, इतरांना हसू द्यावं....

**सुधीर** : आपण मरावं, इतरांना मरू द्यावं! हुंः! लोकशाही म्हणजे रोगराई! मूर्तिमंत मरण! गेली इतकी वर्षं चाललेला लोकशाहीचा खेळखंडोबा पाहूनसुद्धा तुमची हौस अजून फिटली नाही? जे प्रश्न चुटकीसरशी आटपायचे अन् सरशी करीत पुढं जायचं, त्यांत लोकशाहीत कोण वाद! कोण घोळ! नुसता काथ्याकूट! लष्करी शिक्षण सक्तीचं असावं की नसावं, राष्ट्रीयीकरण करावं की न करावं, अण्वस्त्रं बनवावीत की न बनवावीत. .. किती प्रश्न न् किती समस्या. पण नुसत्या चर्चाच. नुसता वाढता गुंता! हा गुंता सोडवायचा आता एकच रामबाण इलाज आहे! असाच गुंता पाहून मागे लोक दिङ्मूढ झाले होते; पण जगज्जेत्या शिकंदरानं तो पाहिला न् एकाच तडाख्यात पूर्ण सोडवला! तडाखा पाहिजे! शिकंदर पाहिजे! हुकूमशहा पाहिजे! मग पाहा–

**शीला** : गाडी कशी खड्ड्यात जाईल ते! हे हुकूमशहा स्वतःचा

सत्यानाश तर करून घेतातच पण स्वत:बरोबर अख्ख्या राष्ट्राचासुद्धा सर्वनाश ओढवून घेतात. हिटलरचा अन् मुसोलिनीचा इतिहास वाचा थोडा!

**सुधीर** : सोडा! तो जमाना गेला! आता रशियाची अन् चीनची बात काढा. छे:! कुठल्याकुठं गेली ही राष्ट्रं! अक्षरश: अस्मानात! तिथं अशी आपल्यासारखी दिव्य लोकशाही असती, तर? बसले असते लोक रडत 'हे करू की ते करू?'

**शीला** : अन् रशिया-चीनसारख्या हुकूमशाही देशांतली जनता आज रडत नाही असं म्हणायचंय की काय तुम्हाला? अहो, तिथं रडायचं तरी स्वातंत्र्य आहे का?

**सुधीर** : इथं आहे की ते!

**शीला** : जनतेच्या अश्रूंची चेष्टा करू नका! उरी फुटेतो घाम गाळते त्या हुकूमशाही देशांतली जनता म्हणून तर दिसते ही प्रगती; अन् वर रडायचीसुद्धा चोरी! हुकूमशहांना हवी रथाची घोडदौड जगापुढं नेऊन स्वत: मिरवायला; पण इकडे तो रथ हाकताना कितीकांचे प्राण खर्ची पडतात याची कोण करणार गणती?

**सुधीर** : बळी दिल्याशिवाय देवतासुद्धा प्रसन्न होत नाहीत. मग प्रगती तरी कशी प्रसन्न होणार?

**शीला** : पण कोणाचा बळी कुणी द्यायचा हे ठरवायचा अधिकार आहे कुणाला?

**सुधीर** : हुकूमशहाला!

**शीला** : हुकूमशहा! हुकूमशहा!! हुकूमशहा! सगळे पुरुष मेले हुकूमशहाच! स्त्री म्हणजे लोकशाही! दुसऱ्यांच्या सुखांत आपलं सुख मानणारी. दुसऱ्यांच्या सेवेत राबणारी. पण पुरुष म्हणजे नुसते हुकूमशहा! दुसऱ्यांच्या जीवांवर चैन करणारे! स्वत:च्या आनंदासाठी दुसऱ्यांचा बळी घेणारे! आपल्या मौजमजेसाठी रक्त येऊन मरेपर्यंत स्त्रियांवर बलात्कार करणारे! (रडू लागते.)

**शहाणे** : अहो शीलाताई, सगळ्याच पुरुषांना तुम्ही हुकूमशहा केलंत म्हणजे त्यांत आम्हीही आलोच की! द्या आम्हांला सजा काय द्यायचीय ती. नाहीतर पाठवा वेड्यांच्या इस्पितळात!

**शीला** : तुम्ही नव्हेत हो सर. माझ्या डोळ्यांसमोर दुसरीच व्यक्ती होती. तुम्हाला कोण म्हणेल हुकूमशहा! तुम्ही तर मूर्तिमंत लोकशाही आहात! पण दुसरे आहेत ना हम करे सो कायदावाले? अन् त्यांचंच चालतंय ना या जगात? पुरुषांची जातच- -जाते मी, सर- - पण तुम्ही नव्हेत सर, तुम्ही नव्हेत- -

**सौ. शहाणे** : (आतून येत) हे नाहीत काय? हेच! पुरुषांची जातच अशी! दुसऱ्यांच्या सुखदु:खांची जरा जाणीव? नाव नको! दिवसभर पोरं जमवायची अन् कुणाला ओरडायला लाव, कुणाला रडायला लाव! आत्ता येतीलच ती नाटकी सोंगं!

**शहाणे** : अग पण...

**सौ. शहाणे** : अग नाही न् उग नाही. आधी हा चहा या मुलांना द्या आणि आपण घ्या. एवढं मुलांना ओरडायला न् रडायला लावायचं अन् त्यांच्या घशाची काळजी नाही घ्यायची?

**शहाणे** : तू घेते आहेस ती! मग मी कशाला?

**सौ. शहाणे** : छान! तुम्ही फक्त मुलांना रडवीत जा!

**शहाणे** : अन् तू हसवीत जा!

**सौ. शहाणे** : ये ग शीला. बाईबाईबाई! किती रडवलीत बिचारीला कोण जाणे! असलंकसलं मेलं नाटक काढलं आहेत?

**शहाणे** : नाटक नव्हे ग. ती रानडे स्पर्धा.

**सौ. शहाणे** : रडण्याची?

**शहाणे** : ओरडण्याची! वक्तृत्वस्पर्धा!

**सौ. शहाणे** : अन् मग ही रडायची तालीम कशाला करून घेत होतात?

**शाला** : तसं नव्हे हो बाई. सरांचा काही दोष नाही त्यात. मीच--

**शहाणे** : जाऊ द्या. जाऊ द्या. तूर्त आपण भरपूर चहा प्यायची स्पर्धा लावू या.

**सौ. शहाणे** : जाऊ द्या काय? मी मुळीच जाऊ द्यायची नाही. एवढी ही मुलगी विद्यापीठात पहिली आली. तिला तुम्ही काही दिलंत?

**शीलो** : बाई, सरांनी आम्हांला इतकं काही दिलंय- -

**सौ. शहाणे** : काय? ज्ञान नी आशीर्वादच ना? हुं:! त्यात काय? ये आत. मी तुला चांगला साजुक तुपाचा शिरा करून घालते. चल.

**शहाणे** : अग अग, हे पुढल्या परीक्षेत पहिले येणार आहेत हं. यांनाही... आणि ते एकटे घेणार नाहीत म्हणून- -

**सौ. शहाणे** : तुम्ही करा पुढल्या आरड्याओरड्याची तयारी. आम्ही करतो

कावळ्यांचं ओरडणं बंद करायची तयारी. चल ग.

(दोघी आत जातात.)

**शहाणे** : पाहिलंत बायकांची कशी हुकूमशाही चालते ते? आणि वर म्हणतात काय, तर 'पुरुष मेले हुकूमशहा!' पण आताचा हुकूम ऐकलात ना? 'करा पुढल्या आरड्याओरड्याची तयारी!' मग काय, करा आता हवा तो आरडाओरडा! – साजुक शिरा येतोच आहे! –(हसून) पण काय हो सुधीरराव, तुम्हाला काही माहिती आहे का? ही शीला एवढी हुशार मुलगी; पण चांगली पंडितासारखी वाद करताकरता एकदम रडूबाई कशी झाली? हिच्या घरी काही– –

**सुधीर** : तुम्हाला माहिती नाही सर? शीलाताईंच्या पतींना थोड्या दिवसांपूर्वीच काहीतरी मेंदूचा विकार झाला आणि त्यांची वाचाच गेली. कसलातरी जबरदस्त मानसिक आघात सोसावा लागला त्यांना. हालत नाहीत. बोलत नाहीत. आढ्याकडे बघत नुसते पडलेले असतात.

**शहाणे** : अतिसंतापामुळे तर झाली नाही त्यांची ही अवस्था? बायकोला मारहाण तर करीत नव्हता हा गृहस्थ?

**सुधीर** : छे, छे सर. आमच्या शेजारीच राहतात ही मंडळी. प्रेमविवाह होता म्हणे त्यांचा. पण विवाहानंतरही प्रेम होतं त्यांचं यात शंकाच नाही. दोन लहान मुलंही आहेत त्यांना. मोठी गोड आणि चलाख. इतके दिवस शीलाताई नोकरी करीत नव्हत्या. पण त्यांना नोकरी करणं भाग पडलं आणि त्यांच्या यजमानांच्यावर नोकरी सोडण्याची पाळी आली.

**शहाणे** : हां, तर मग नोकरीत गडबड असणार.

**सुधीर** : येस सर, बरोब्बर ओळखलंत. नोकरी त्यांना खरोखरच मुकाट्यानं करावी लागते. तोंड मिटून. ओठ दाबून.

**शहाणे** : तोंड दाबून? आहे तरी कोण हा हुकूमशहा?

**सुधीर** : आपल्या गावातील प्रसिद्ध समाजसेवक आणि देशभक्त पुढारी – रामरावसाहेब!

**शहाणे** : रामरावसाहेब? अहो ते तर देवमाणूस म्हणून– –

**सुधीर** : देवमाणूस खराच! दुसऱ्या कोणत्याही माशाला गिळून टाकतो तो देवमासा आणि दुसऱ्या कोणत्याही माणसाला गिळून टाकतो तो देवमाणूस!!

**शहाणे** : काय सांगता?

**सुधीर** : सर, तुम्हाला हे माहिती आहे असं दाखवू नका, नाहीतर तुम्हालाही गिळून टाकील हा देवमाणूस. आणि–– माझ्यावर कृपा करा–– तुम्हाला मी काही सांगितलं होतं हेही विसरून जा.

**शहाणे** : विश्वास बसत नाही. अहो या रामरावांनी इथं सहकारयुग आणलं नां? सहकारी भांडार, सहकारी बँक, सहकारी साखर कारखाना... अहो, कितीतरी चळवळी, आणि सगळ्या सहकारी.

**सुधीर** : सहकारी नव्हे सर, स्वाहाकारी!

**शहाणे** : अहो, सहकारी भांडाराच्या उद्घाटनाच्या वेळी तर– –

**सुधीर** : तुमचं व्याख्यान झालं होतं, सर. रामरावांनीच ठेवलं होतं ते मुद्दामच. तुमच्यासारखी चांगली माणसं आपल्याबरोबर आहेत हे दाखवण्यासाठी; आणि सर, तुमच्या तोंडून लोकशाहीचं महत्त्व जगाला पटवून देण्यासाठी. तुम्ही सांगितलं होतंत सर त्यावेळी, 'सहकार हाच लोकशाहीचा आधार! लोकशाही हाच धर्म आणि सहकार हाच आचार! भांडवलशाहीतली जीवघेणी विषमस्पर्धा नको आणि साम्यवादातली सरकारच्या हाती सर्व काही सोपविणारी खुळीपांगळी श्रद्धा नको! ही दोन्हीही टोकं टाळायची असतील आणि प्रत्येक माणसाचं जीवनमूल्य वाढवायचं असेल तर सर्व मुखांतून एकच ललकार हवा– – सहकार!'

**शहाणे** : अन् त्यावेळी रामरावांनी सहकाराचं व्रत आपण शपथपूर्वक पाळू असं जाहीरपणे सांगितलं होतं.

**सुधीर** : या शब्दांत नाही सर, या–– 'माझा शेवटचा श्वासदेखील आता सहकारासाठीच राहील! मरतानादेखील मी रामराम ऐवजी 'सहकार, सहकार'च म्हणेन!' आणि मग कडाडून टाळ्या! पण इकडे सहकाराला मात्र भला मोठ्ठा टाळा!

**शहाणे** : म्हणजे!

**सुधीर** : स्वत:ची सत्ता आणि संपत्ती वाढविण्याची ही सगळी साधनं आहेत, सर. आणि त्यासाठी हा राम लोकशाहीच्या सीतेची

विटंबना करतो आहे.

**शहाणे** : कशावरून?

**सुधीर** : रामराव इथल्या सहकारी संस्थांचे अध्यक्ष कसे झाले माहिती आहे ना?

**शहाणे** : हो. भगवानराव आणि शंकरराव यांच्यांत चुरस होती. त्यांच्या गटांत मारामाऱ्या होऊन भगवानरावांचा खून झाला आणि शंकरराव तुरुंगात गेले. त्यानंतर– –

**सुधीर** : केवळ कर्तव्य म्हणून रामराव पुढे झाले– –

**शहाणे** : आणि बिनविरोध निवडून आले– –

**सुधीर** : कारण जाणकारांना त्यांच्या कर्तृत्वाची माहिती होती.

**शहाणे** : कोणती?

**सुधीर** : की भगवानरावांचा खून आणि शंकररावांचा तुरुंगवास या दोन्ही क्रियांचा खरा कर्ता एकच– –

**शहाणे** : रामराव?

**सुधीर** : रामराव!

**शहाणे** : बाप रे! कमाल आहे! पण हे त्यांना जमतं कसं?

**सुधीर** : पैशातून!

**शहाणे** : कुठल्या!

**सुधीर** : सहकारी भांडारांतल्या!

**शहाणे** : काय सांगता?

**सुधीर** : सर, तुम्हाला म्हणून सांगतो, सहकारी भांडारात आधी गरजू आणि विश्वासू माणसालाच हा नोकरी देतो. मग मालात लबाडी करण्याचं पद्धतशीर शिक्षण त्याला देतो आणि विक्री करायला बसवतो. सर, सहकारी भांडारातली खरी औषधं सरळ काढून घेतली जातात आणि काही ठराविक व्यापाऱ्यांना विकली जातात; आणि मग बनावट औषधं खरी म्हणून विकायला ठेवतात! ही सगळी कामं नोकर लोकांना करावी लागतात. सापडतील तर नोकर. आधी ते सापडणार नाहीतच म्हणा. कारण कोणी त्यांना पकडणारच नाही. तसा बंदोबस्त करून ठेवलेलाच आहे. आणि सापडलेच तर त्यांनी आपली अब्रू गमावलीच पाहिजे. मग त्या अब्रूची हा गब्रूराम करील ती किंमत!



**शहाणे** : पण या छोट्याशा गावात या गोष्टी इतका वेळ लपून कशा राहतात?

**सुधीर** : छोट्या गावामुळेच, सर. कारण इथं बोलणारी अधिकारवाणीची तोंडं मोजकीच असतात अन् म्हणून त्यांचा मुखलेप करणंसुद्धा सोपं असतं. जर कुणी मुखलेपावर राजी झाला नाही तर त्याचा मुखभंग व्हायला वेळ लागत नाही. (खिडकीशी जाऊन) सर, तो पाहिलात तिथला हमाल? शुद्ध लंगोटी लावून उभा आहे! पूर्वी प्राथमिक शिक्षक होता तो. 'तो' म्हणायची लाज वाटते सर, कारण त्यांनीच या माझ्या हातून श्रीगणेशा केला. अबोल आणि कामसू मनुष्य म्हणून रामरावांनी चार पैसे जादा देऊन त्यांना आपल्याकडे कामाला ठेवलं. पुढं काय झालं काही कळलं नाही, पण त्यांना म्हणे दूर रानात कुणीतरी चोरट्यांनी मारपीट केली. इतकी की त्यांची शुद्धच गेली– – कायमची! आता कुणी दिली तर हमाली तेवढी करू शकतात ते! सर, रात्री–अपरात्री मोठमोठ्यानं रडणारी बाई ऐकली आहेत ना तुम्ही आपल्या गावात? किती भेसूर वाटते तिचं रडणं! किती कळवळून रडते ती! सर, ती पूर्वी तिच्या तरुणपणी याच रामरावांच्या वाड्यावर कामाला होती. आता हातापायाला चिंध्या गुंडाळत नी सोडत पडक्या वाड्यांतून दिवसा हिंडते अन् रात्री किंचाळून उठते!

**शहाणे** : सुधीरराव, काय भयंकर गोष्टी सांगत आहात तुम्ही! पण तुम्हाला हे सारं कुणी सांगितलं?

**सुधीर** : शीलाताईंचे यजमान रामरावांच्याचकडे कामाला होते, त्यांनी. मुंबईत नोकरी करणं त्यांना शक्य होतं पण राहायला जागा घेणं परवडण्याजोगं नव्हतं. अन् शिवाय म्हाताऱ्या आईवडिलांची जबाबदारी. त्यांना घेऊन मोठ्या शहरातला खर्च झेपणार कसा? म्हणून मन मारून राहिले इथेच. महागाई वाढत चालली म्हणून त्यांनी रामरावांना पगारवाढ मागितली. तर रामराव काय म्हणाले असतील?

**शहाणे** : 'चालते व्हा.'

**सुधीर** : दुप्पट पगार देतो म्हणाले

**शहाणे** : असं?

**सुधीर** : हो! म्हणाले, 'दोघांचा पगार देतो, पण दोघांनी कामाला या. सगळ्या जगात नवराबायको नोकरी करतात.'

**शहाणे** : आणि मग?

**सुधीर** : भागच होतं दोघांनी नोकरी करणं. आपल्या या छोट्या गावात दुसरीकडे नोकरी मिळणार तरी कुठं? शीलाताईंनाही वाटलं, काही का असेना, दुसरीकडे कुठे अनोळखी माणसांबरोबर काम करण्यापेक्षा नवऱ्याबरोबर तरी काम करायला मिळेल.

**शहाणे** : बरोबरच आहे.

**सुधीर** : आणि मग शीलाताईंना नवऱ्याच्या पगारापेक्षा जास्त बढती मिळाली आणि रामरावांनी त्यांना आपल्या स्वत:च्या खासगी चिटणिसाचं काम दिलं.

**शहाणे** : अस्सं!

**सुधीर** : या कामाचे तास ठरलेले नाहीत. कोणत्या वेळी कामाचं बोलावणं येईल याचा नेम नाही.

**शहाणे** : हं?

**सुधीर** : सर, तेव्हापासून वसंतराव- - शीलाताईंचे यजमान- - बेचैन आहेत.

**शहाणे** : शीलापण- -

**सुधीर** : त्या तर त्यांच्याहून बेचैन आहेत.

**शहाणे** : ते पाहिलंच आपण. पण मग नोकरी का नाही सोडत? दुसरं काहीही करता येईल. आपण प्रयत्न करू.

**सुधीर** : आता शक्य नाही ते, सर. रामरावांच्या लबाडीच्या अनेक व्यवहारांवर सह्या आहेत वसंतरावांच्या. पूर्वी बोली होती की वसंतराव सापडले तरी आणि तुरुंगात गेले तरी त्यांचा पगार चालूच राहील.

**शहाणे** : मग आता का रामरावांनी आपली बोली बदलली?

**सुधीर** : रामरावांच्या प्रत्येक बोलाला मान डोलावली तरच त्यांची बोली ते पाळणार. नाहीतर नोकरी सोडू म्हटल्यानं आता सोडता येणार नाही. कारण रामरावांनी मोठ्या मऊ शब्दांत सांगितलंय की आपल्याला स्वत:लाच सगळे गैरव्यवहार उजेडात आणणं भाग पडेल!

**शहाणे** : काय पाताळयंत्री राजकारणी मनुष्य आहे हा!!



**सुधीर** : सर, आता या एवढ्याच राजकारणावर त्यांची भूक कशी भागणार? ही राजकारणं जमल्यावर त्यांनी याहून मोठी राजकारणं सुरू केली आहेत. तुम्ही ऐकलंच असेल सर, रामराव येत्या निवडणुकीत उभे राहणार आहेत-- आणि-- आणि जिंकून येणार आहेत!

**शहाणे** : बाप रे! नुसत्या लोकशाहीचाच नव्हे तर लोकांचासुद्धा बळी घेणारा हा नराधम हुकूमशहा निवडून येणार?

**सुधीर** : (एकदम) सर, तुम्ही का नाही निवडून येत?

(याच वेळी तीन विद्यार्थी- - प्रभाकर, सतीश, शेखर-- आणि एक विद्यार्थिनी-- नीता-- येतात.)

**प्रभाकर** : सर, खरंच, तुम्ही का नाही निवडून येत?

**सतीश** : सर, तुम्ही उभे राहण्याचाच अवकाश. नक्की निवडून याल!

**नीता** : अय्या! सर, तुम्ही निवडणूक जिंकणार! कित्ती छान!

**शेखर** : सर, आमची सगळी मतं तुम्हांलाच!

**शहाणे** : अरे, पण तुम्हांला मतं तरी आहेत का?

**प्रभाकर** : पण सर, पाचांमुखी परमेश्वर. आम्ही इथं पाचजण आहोत. आम्ही एकमतानं म्हणतो, सर, तुम्ही निवडून येणार!

**सर्वजण** : येणार! येणार!

**शहाणे** : अरे पण कोणती निवडणूक, कोणती जागा, काही पाहाल? का आधीच निवडून देणार आणि मग सावकाश पाहणार- - विधानसभा की लोकसभा ते?

**प्रभाकर** : दोन्ही ठिकाणी, सर! पण सर, इतके दिवस तुम्ही लोकशाहीची थिअरी शिकवलीत. आता प्रॅक्टिकल शिकवा, सर.

**सुधीर** : बरोबर आहे याचं म्हणणं, सर. फार छान प्रॅक्टिकल होईल, सर, आणि आम्हांलाच नव्हे तर सगळ्या लोकांना.

**शहाणे** : छे, छे. अरे माझं ज्ञान नुसतं पुस्तकी.

**सुधीर** : म्हणूनच सर, पुस्तकं न वाचणाऱ्यांनी निवडून येण्यापेक्षा तुम्ही निवडून यायला पाहिजे.

**शहाणे** : अरे, तुमची इच्छा मी मानतो. पण मतासाठी का होईना दारोदार याचना करीत हिंडणं मला नाही जमायचं. घरातदेखील जेवायला मागायचं जिवावर येतं माझ्या.

**सुधीर** : सर, तुम्ही नुसते उभे राहिल्याचं कळलं की लोक तुम्हाला मतं देतील, सर.

**प्रभाकर** : खरंच, सर. गेली पंधरा वर्षं तुम्ही इथं प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून आहात. तुमच्या हाताखालून गेलेले सर्वजण तुम्हांलाच मतं देणार, सर.

**नीता** : नुसते ते लोकच नव्हेत– – त्यांच्या बायकासुद्धा.

**सतीश** : आणि विद्यार्थिनींचे नवरे नाहीत का?

**शेखर** : तिथं कदाचित प्रचारापेक्षा पर्जन्यास्त्राचाच उपयोग मुली करतील.

**नीता** : सर, आम्हांला तुम्ही एवढं शिकवलंत, वक्तृत्वस्पर्धांत पारितोषिकं पटकावायला लावलीत, मग आम्ही काय आमची मतं कुणाला पटवून देऊ शकणार नाही?

**शहाणे** : बाजारांत तुरी अन् भट भटणीला मारी असा प्रकार चाललाय तुम्हा सगळ्यांचा. मी आणि निवडणूक? म्हणजे संन्याशी आणि संसारच म्हणा ना!

**सुधीर** : एका संन्याशानं संसार केला म्हणूनच महाराष्ट्राचा संसार सावरला ना?

**शहाणे** : अरे, ते कुठे आणि मी कुठे! मी एक अगदी सामान्य माणूस आहे रे! नामदेवतुकारामांसारखे भक्त लाभले म्हणजे पंढरपूरच्या दगडाला देवत्व येतं. तसं तुमच्या प्रेमामुळंच तुम्ही मोठं करताहात मला. पण माझ्या क्षुद्रत्वाची मला इतकी लाज वाटते म्हणून सांगू! आणि जगासमोर जाऊन मीच कसा लायक आहे ते पटवून देऊन स्वत:चीच जाहिरात करू? आपली आपण करी स्तुती तो एक मूर्ख!

**सुधीर** : सर, तुम्ही तुमची स्तुती करू नका. पण आम्हांला जर तुमची स्तुती करण्यात आनंद वाटत असेल तर आमचा आनंद तरी हिरावून घेऊ नका.

**प्रभाकर** : नाही, सर. या एका बाबतीत आम्ही नाही तुमचं ऐकणार!

**सतीश** : येस् सर. आम्ही तुमचा प्रचार करणार!

**नीता** : संगीत प्रचार, सर! अगदी साग्र संगीत! सर, तुम्हीच आमचे सांस्कृतिक कार्यक्रम बसवून दिले आहेत.

**शेखर** : चला! केव्हा करायचा दौरा सुरू?



**सतीश** : आधी एक रंगीत तालीम करू या. आपली नाटिका बसलीच आहे.

**सुधीर** : पाहा, सर. प्रचार–मोहीम सुरू!

**शहाणे** : बस्स. पुरे. थांबा. तुमचा उतू जाणारा उत्साह पाहून आनंद वाटला मला. पण तुमच्या उत्साहाचा ओघ योग्य दिशेलाच वळला पाहिजे. विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेऊ नये, असंच माझं मत आहे.

**सुधीर** : आम्ही राजकारणात भाग घेत नाही, सर. पण तुम्ही राजकारणात भाग घ्या.

**प्रभाकर** : सर, ज्या अर्थानं आज राजकारण चाललं आहे ते आम्ही करणार नाही, सर. कॉलेजच्या निवडणुकीत सुधीर आणि मी विरोधी उमेदवार होतो. पण तो जिंकला आणि मी पडलो तरी आम्ही मित्रच आहोत ना?

**सुधीर** : आणि सर, जे काही आम्ही करणार ते तुमच्या साक्षीनंच ना? नाही म्हणू नका, सर. सर, तुमची लोकप्रियता या भागात किती आहे, याची तुम्हांला कल्पना नाही. सूर्याच्या किरणांनी किती जीवांना आनंद होतो हे सूर्याला कसं कळणार, सर? तुमचं एक व्याख्यान ज्यानं ऐकलं तो तुमचाच झाला म्हणून समजा. आणि अशी गेल्या पंधरा वर्षांतली तुमची व्याख्यानं आठवा. सर, तुमचं व्याख्यान ऐकायला कशी गर्दी होते तुम्ही पाहताच ना? ती सारी माणसं तुम्हांलाच मतं देणार नाहीत तर कोणाला? खरं म्हणजे तुमच्यासाठी प्रचार करण्याची आवश्यकताच नाही. तुम्ही उभे राहिलात की पुरे. नाही म्हणू नका, सर. सर, तुम्ही लोकशाही शिकवता, मग लोकमताला मान द्या, सर. आणि टिळक – आगरकरांचं, फुले – शिंद्यांचं, सावरकर – आंबेडकरांचं चारित्र्यवान विद्वानांनी समाजाचं नेतृत्व करायचं युग पुन: आणा सर.

**शहाणे** : लोकशाही हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे, असंच मी मानतो आणि तसंच शिकवतो. या धर्माचं प्रत्यक्ष आचरण करण्याची संधी म्हणजे मला पर्वणीच वाटेल. पण या कामामुळं तुमची कोणाची वर्षं वाया गेली तर मेल्याहून वाईट वाटेल मला.

**सुधीर** : नाही सर. तशी हमी आम्ही सर्वजण देऊ. आम्ही संध्याकाळी

खेळतो त्याऐवजी लोकजागृती करू. आमच्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या तालमीच आम्ही खेडोपाडी करू आणि वर्गणी गोळा करू. निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा यांच्या निमित्तानं जी तयारी तुम्ही करून घेतलीत तीच लोकांसमोर दाखवू. वर्गांत तुम्ही जे रोजच्या रोज देशाविषयी आणि जगाविषयी सांगता तेच जनतेत जाऊन सांगू. सर, आदर्श लोकशाहीचा एक वस्तुपाठच लोकांना देऊ या, सर. आता नाही म्हणू नका, सर.

**नीता** : भारतमाता तुमची वाट पाहात आहे, सर.

**प्रभाकर** : आता काळ तुमचा आहे, सर.

**सुधीर** : बोला, प्राचार्य शहाणे यांचा- - -

**सर्वजण** : विजय असो!

**सुधीर** : लोकशाहीचा- - -

**सर्वजण** : विजय असो!

**सुधीर** : सत्याचा- - -

**सर्वजण** : विजय असो!

(आतून सौ. शहाणे व शीला बशा घेऊन येतात.)

**सुधीर** : भारतमाता की- - -

**सर्वजण** : जय!

**शहाणे** : मी नाही! मी नाही! आपण होऊनच आरडाओरडा करताहेत ही मुलं.

**सौ. शहाणे** : पण त्यांच्या घशांची काही काळजी? घ्या रे सर्वांनी आपापला वाटा. शेका जरा घसे. यांचा धंदाच पडला मेला ओरडण्याचा!

**शहाणे** : आमचा धंदा ओरडण्याचा हे खरंच; पण तुमचा स्वभावच--

**सौ. शहाणे** : ओरडण्याचा? मी ओरडते? घसा फोडून ओरडते? कधी तरी ओरडते?

**शहाणे** : नाही. कध्धी नाही. कारण आता इतकी सवय झाली आहे की तुझं ओरडणं--- चुकलो, गोड गोड बोलणं--- जाणवतसुद्धा नाही! आणि...

**सुधीर** : पण बाई, आता आमचं ओरडणं गोड वाटेलच तुम्हाला! कारण तुमचा गोड गोड गोड शिरा तोंडात शिरलाय ना!

**सौ. शहाणे** : एवढ्याशा शिऱ्यानं काय होतंय? सत्यनारायणाचा प्रसाद झाला हा.



**सुधीर** : बरोब्बर बोललात बाई! आज हा सत्यनारायणच झाला! नवाच सत्यनारायण आणि खराखुरा सत्यनारायण! बोला मंडळी, सत्याचा---

**सर्वजण** : विजय असो!

**प्राध्यापक गोडे** : (येत) तसं नव्हे. तसं नव्हे. 'सत्याचा विजय असो' अशा गर्जना करायला सत्य म्हणजे काय सत्या रामोशी आहे? सत्याचा विजय होतोच! सत्यमेव जयते! सत्यमेव जयते!

**सुधीर** : सर, तुम्ही अगदी सत्यासारखे आलात!

**गोडे** : सत्या रामोशासारखा?

**सुधीर** : नाही, सर. तुम्ही तुमच्या नावासारखेच गोडे आहात. तुम्हाला दरोडेखोर कोण म्हणेल? पण सर, तुम्ही येऊन अगदी शुभ शकुन केलात!

**गोडे** : छान! अरे मला काय शकुन सांगणारा पक्षी समजता की काय? पण आधी सांगा, सत्याच्या विजयाची गर्जना करण्याचं इथं काय प्रयोजन! सरांच्या घरावर मोर्चा आणलात की काय?

**सुधीर** : सर मोर्चा आता तुमच्याच घरावर येणार होता!

**गोडे** : बापरे! अहो का? जादा तास घेतले म्हणून की काय?

**सुधीर** : शहाणे सर आता निवडणुकीला उभे राहणार आहेत. तेव्हा सूचक म्हणून तुमचं नाव हवं, सर.

**गोडे** : कॉंग्रॅच्युलेशन्स आणि बेस्ट वुइशेस, सर! सर, तुम्ही नक्की निवडून येणार. आमचा तुम्हाला संपूर्ण हार्दिक पाठिंबा!

**सुधीर** : मग सर, तुमचं नाव सूचक म्हणून नक्की झालंच?

**गोडे** : छे छे, सर कुठे, मी कुठे? तिथं सरांच्या तोडीचीच माणसं पाहिजेत. आपण माणसं पाहू या. पण मी? नको नको. पायीची वहाण पायी बरी.

**शहाणे** : स्वतःला वहाण म्हणताहेत पण आहेत महान बरं का!

**गोडे** : शब्द गहाण टाकू नका, सर! बरं; मिस्टर सुधीर, तुम्ही दुपारी माझ्याकडे या. आपण सूचक, अनुमोदक, प्रचारक, प्रतिनिधी... सगळी यादी करू या आणि ताबडतोब कार्यक्रम पार पाडू या. माझी पत्नी तर सरांची विद्यार्थिनीच आहे.

माझ्या पुढे ती काम करील. प्राध्यापक सगळेच सहकुटुंब, सहपरिवार प्राचार्यांच्याच पक्षाचे. त्यांची मतं हमखास इथंच. पण आपण शक्य तितक्या बाहेरच्या लोकांनाही सामावून घेऊ या. कसं काय?

**सुधीर** : सर, तुमची योजना म्हणजे अगदी फर्स्ट क्लास वुइथ डिस्टिंक्शन! येतो, सर. – सर, तुम्ही आम्हाला नंबर मिळवून देता, बक्षिसं, पेले, पदकं मिळवून देता, म्हणून आमच्या आईवडिलांनाही तुमच्याविषयी फारफार आदर वाटतो. त्यांनाही ही बातमी लवकर सांगितली पाहिजे. सर, आमची आई रोज म्हणते, 'उडदामाजी काळेगोरे! काय निवडावे निवडणारे! कुचलिया वृक्षाची फळे । मधुर कोठोनी असतील?' तेव्हा वडील म्हणतात, 'हे व्यंकटेशस्तोत्र नसून आपल्या लोकशाहीच्या संकटाचं स्तोत्र आहे!' पण आता तुम्ही उभे राहिलात, त्यांना व्यंकटेश प्रसन्न झाल्याचा आनंद होईल, सर. आनंदी आनंद गडे! चला रे!

**घरोघरी, दीप लावु या, घरोघरी**
**ज्योति त्यांतल्या, नभातल्या ताऱ्यांशी करतिल बरोबरी, बरोबरी**
**जुलुम कुठे, अन्याय कुठे**
**हुकुमशहांचे वच उलटे**
**अता न त्यांचे नावहि राहिल**
**लोकराज्य हो खरोखरी, खरोखरी**
**स्वातंत्र्याचा अर्थ खरा हा**
**हर जीवाचे मूल्य हो महा**
**प्रत्येकाच्या आयुष्याचा अर्थ वाढणे वरीवरी, वरीवरी**
**(सर्व विद्यार्थी जातात. सौ. शहाणे आत जातात.)**

**गोडे** : फार उत्तम केलंत सर,– निवडणूक लढवण्याचा निर्णय तुम्ही घेतलात! प्लेटो म्हणतो ना, तत्त्वज्ञानी लोकांनीच राज्य करावं. प्लेटोला फार आनंद वाटेल, सर.

**शहाणे** : तुम्हाला वाटेल ना?

**गोडे** : म्हणजे काय? परमानंद वाटेल.

**शहाणे** : मग पुरे. खरोखर लोकांचीच इच्छा असेल लोक निवडून देतील मला. मी फक्त उभा राहणार आहे. निवडून आलो तर



अर्थातच होईल तेवढी लोकसेवा करणार आहे.

**गोडे** : सर, तुम्ही निवडून आला नाहीत तर लोकशाहीतच काही राम नाही असं मानायची पाळी येईल. सर, लोक मतं तुम्हांला देणार नाहीत तर काय त्या रामरावाला? नाव रामाचं पण काम... छे छे छे. आपण बोलणं म्हणजे आपली जीभ विटाळणं. तुम्ही उभे राहिलात. मला आनंद वाटला. लोक डोक्यावर घेऊन नाचतील तुम्हाला.

**शहाणे** : मतं देतील ना?

**गोडे** : शंकाच नको. तुम्ही मुळीच काळजी करू नका. नाही रामरावाचं डिपॉझिट जप्त झालं तर गोड्याचं नाव कडू करीन.

**सौ. शहाणे** : (बशी घेऊन येत) भावजी, तुमच्या गोडे नावात हे कडू काय आलं?

**गोडे** : म्हणून हा गोड शिरा आणलात की काय? (शिरा खात) वा:! काय सुंदर झालाय शिरा हा! वहिनी, तुम्ही हा शिराच प्रचाराऐवजी वाटत चला. सगळी मतं तुमचीच. आणा, आणखी शिरा आणा बुवा! उत्तम! अहाहा! वा:! (सौ. शहाणे आणखी शिरा आणून वाढतात.)

**सौ. शहाणे** : थोडी साखर जास्त झालीय. पण गोड करून घ्या हं.

**गोडे** : वहिनी, तुम्हीच सांगा, मी सगळ्याच गोष्टी गोड करून सोडतो की नाही?

**सौ. शहाणे** : हो तर, आता हे निवडणुकीचंच पाहा ना! तुमच्यामुळेच निवडणुकीचा दिवस गोड होणार.

**शहाणे** : गोडे सर, आज जेवायलाच थांबा ना. खूप बोलायचंय तुमच्याशी.

**गोडे** : खरं म्हणजे पोट चांगलंच भरलंय आता. पण तुम्ही बोलायचंच म्हणता, मग थांबलंच पाहिजे.

**सौ. शहाणे** : एवढ्याशा शिऱ्यानं पोट काय भरतंय? तुमच्या गप्पा सुरू झाल्या की तो शिरा कुठल्याकुठे गप्प होईल. तेवढ्यात स्वयंपाक होतोच आहे माझा.

**शहाणे** : आमच्या गप्पाच होतात तोवर तुझा स्वयंपाक होणार?

**सौ. शहाणे** : म्हणजे तुझा स्वयंपाक होईपर्यंत आम्ही गप्पाच मारीत बसावं?

**सौ. शहाणे** : स्वयंपाक करणं म्हणजे गप्पा मारणं नव्हे!

(सौ. शहाणे फणकाऱ्याने निघून जातात. दोघे मोठ्याने हसतात. इतक्यात दारावरची घंटा वाजते. गोडे पुढे होतो. रामराव येतो.)

**गोडे** : रामरावसाहेब, सर! साहेब, शंभर वर्षं आयुष्य आपल्याला!

**शहाणे** : नमस्कार साहेब! सूर्य आज पश्चिमेला कसा उगवला?

**रामराव** : आपण ज्ञानसूर्य! आपल्याला वंदन करायला!

**शहाणे** : वा:! लगेच कोटी करून आपणच आपल्या ज्ञानाचं तेज दाखवलंत! या. या. बसा. आराम करा.

**रामराव** : छे छे छे! आपणांसारख्या ज्ञानवंतांच्या आश्रमात अशा प्रशस्त आसनावर बसायची आमची लायकी नाही. आम्ही आपले या साधासुध्या खुर्चीवर बसतो. थांबा, थांबा साहेब, आपण आत जाऊ नका. कृपा करून काही चहा वगैरे सांगू नका. आपण भेटलात हाच आम्हांला मोठा लाभ झाला. आणखी आपणांकडून काही नको. आपली सेवा करण्याची संधी आम्हालाच लाभायला पाहिजे. आम्ही आपले नम्र सेवक!

**शहाणे** : असं मला लाजवू नका बुवा. आधी आपण गूळपाणी घेतलं पाहिजे. मग निवांतपणे बोलू. बसा आपण. गोडे सर, जरा साहेबांची सोय पाहा हं. (आत जातात.)

**रामराव** : (बाजूला येऊन) गोडेऽ (गोडे आल्यावर) तुमच्या या साहेबाला निवडणुकीत पडायची अवदसा कुठून आठवली?

**गोडे** : त्याचं काय आहे साहेब, इतके दिवस प्रिन्सिपॉल म्हणून खुर्ची अडवायची सवय झालीय. आता वरच्या खुर्चीकडे डोळे लागलेले दिसतात. दुसरं काय?

**रामराव** : तुम्हीच पाठिंबा दिलात असं ऐकलं आम्ही.

**गोडे** : (गडबडून) नाही, नाही साहेब. मुळीच नाही.

**रामराव** : नाही नाही काय? तुम्हांला माहीत नाही, आम्हीच निवडून येणार आहोत म्हणून?

**गोडे** : आमचं मत तुम्हालाच साहेब. म्हणजे बायकोचंसुद्धा. आता हे पडले नोकरीतले साहेब. नाही कसं म्हणायचं? त्यांना आपला हार्दिक पाठिंबा – फक्त हार्दिक! गळ्याशपथ साहेब.

**रामराव** : गोडेसाहेब, तुम्हांला ठाऊक आहे? ही मोठी निवडणूक तर आम्ही जिंकणारच. पण ती जिंकली म्हणजे तुमच्या त्या संस्थेचेही अध्यक्ष आम्हीच होणार आहोत!



**गोडे** : यात काय संशय, साहेब? नाही या शहाण्याचं डिपॉझिट जप्त झालं तर गोड्याचं नाव कडू करीन! आपण हमखास निवडून येणार, आमच्या संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष होणार... मग आपण... आपण मला प्रिन्सिपॉल कराल? ...नाही म्हणजे, तसं ठरलं असलं म्हणजे आत्ताच अधिकारवाणीनं सगळ्या स्टाफची–प्राध्यापक, कारकून, प्यून सरसकट सगळ्यांची मतं त्यांच्या बायकांसकट आपल्यालाच पडतील अशी व्यवस्था करतो.

**रामराव** : बायकांसकट?

**गोडे** : हां हां, म्हणजे बायकांच्या मतांसकट! आणि मग... मग... आपण माझ्या सुविद्य मिसेसलाही व्हाइस प्रिन्सिपॉल कराल? आम्हांला दोघांनाही जोडीनं समाजसेवा करण्याची फार फार तळमळ आहे हो!

**रामराव** : तुमची मिसेस? म्हणजे बायको? कधी पाहिल्याचं आठवत नाही? काय शिकली आहे?

**गोडे** : नाही म्हणजे त्याचं काय आहे साहेब, मी एकदा प्रिन्सिपॉल व्हायचाच अवकाश की तिच्या पुढच्या सगळ्या परीक्षा वगैरे आपोआप होऊन जातील.

**रामराव** : आपोआप?

**गोडे** : आपणच आमचे गुरु आहात साहेब!

**रामराव** : बरं बरं. आमचं काम तुम्ही करा म्हणजे तुमचंही आम्ही करून टाकू. त्यात काय? डाव्या हातचा मळ!

**गोडे** : पण साहेब, आपल्यासारख्या थोर समाजसेवकानं एका य:कश्चित प्रिन्सिपॉलच्या घरी यायचं म्हणजे– – –

**रामराव** : गाढव आहात तुम्ही, प्रिन्सिपॉल गोडे! अहो, अंतिम विजय आपलाच. म्हणजे काय, सत्यमेव जयते! होय की नाही? पण तो विजय जर थोड्या सौद्यानं स्वस्तात पडत असेल तर घेऊ नये काय? आमचं ऐका आणि गंमत बघा. या रामरावानं थोरामोठ्यांना गुंडाळलं तिथं या अडाण्याची काय कथा? असा कोण लागून गेलाय हा नालायक? मास्तर, प्रोफेसर... प्रिन्सिपॉल? हु:? एक माणूस, एक इसम, एक जनावर! सगळी जनावरं खेळवली आहेत मी. नुसती खेळवली नव्हे,

लोळवली आहेत. हा:! हा:! हा:! कित्येक माणसं नुसता पोकळ रुबाबाचा फडा काढला तरी बेडकासारखी गर्भगळीत होतात! कित्येक माणसं साध्या लाळघोट्या बोलण्यानंच मांजरासारखी मागे लागतात. कित्येक माणसं तर चक्क खोट्या स्तुतीनंही कुत्री बनतात! उरलेच तर कुणी पैशानं, कुणी पेल्यानं, कुणी प्यारनं सहज विकत घेता येतात. माणूस? हुं:! जगाच्या बाजारातली एक विक्रीची वस्तू. मागणी असेल तर किंमत. बघू या तुमच्या साहेबाची किंमत. परवडली तर देऊ; नाहीतर सोडून देऊ. सौद्यानं मिळालं तर ठीकच; नाहीतर सोट्यानं घेऊ. काय?

**गोडे** : खरं आहे साहेब. हे डोस्क्यातच आलं नाही बघा आमच्या.

**रामराव** : एवढाच फरक! चालायचंच. ते जाऊ द्या. एकदा बायकोला घेऊन या. म्हणजे महिलांना आपल्याकडे – म्हणजे आपल्या पक्षात आणायचं काम त्यांच्यावर सोपवून देऊ. काय? शिवाय, मोठ्या लोकांबरोबरच्या कामाचा अनुभव त्यांना असणं बरं. पुढं नेहमीच संबंध येणार. व्हाइसप्रिन्सिपॉल व्हायचंय ना त्यांना?

**गोडे** : होय, होय साहेब. अनुभव पाहिजेच. म्हणजे चांगला अनुभव येईल.

**शहाणे** : (येत) अहो हे काय गोडे सर, साहेबांना उभं ठेवलंत?

**गोडे** : साहेब बसणार नाहीत, सर. ते आता उभेच आहेत ना!

**शहाणे** : कोटी छान केलीत सर. पण साहेब उभे राहिले.

**रामराव** : परमेश्वराची वाट पाहत भक्तानं उभंच रहायला नको काय?

**शहाणे** : परमेश्वरसुद्धा भक्तालाच मोठं मानतो, साहेब. आणि परमेश्वर असो, नसो. भक्त हवाच. विठोबा असो, नसो. तुकाराम हवाच.

**रामराव** : आपण गुरुदेव! बोलण्यात काय आम्हाला हार जाणार? काही वाईट वाटून घेऊ नका प्रिन्सिपॉलसाहेब. उभ्याउभ्या आपल्या घरातील या महापुरुषांचं दर्शन घेत होतो. आहाहा! लोकमान्य टिळक! महात्मा गांधी! महापुरुष! त्यांचा आदर्श आज आम्हांला हवा.

**शहाणे** : माझंही अगदी हेच मत आहे. पण साहेब, आधी सांगा, आपल्यासारख्या थोर पुरुषानं आज माझ्या छोट्या घरी पायधूळ झाडण्याचं कारण?

**रामराव** : प्रिन्सिपॉलसाहेब, इतकी वर्षं आपण आमच्या गावात ज्ञानदानाचं पवित्र कार्य करीत आहात. म्हटलं, आपली काही सेवा या हातून घडावी. लोकशाही हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे आणि भ्रष्टाचार म्हणजे अधर्म आहे असं आपण आवेशानं सांगत असता.

**शहाणे** : होय. भ्रष्टाचार म्हणजे लोकशाहीचा क्षय. लोखंडाला गंज, तसा लोकशाहीला भ्रष्टाचार.

**रामराव** : अगदी बरोबर. माझंही अगदी हेच मत आहे. भ्रष्टाचाराचं समूळ निर्मूलन झालंच पाहिजे. पण आपल्याला असं नाही वाटत की हाच प्रश्न इंग्लंडअमेरिकेसारख्या जुन्या, मोठ्या लोकशाह्यांनाही भेडसावीत आहे?

**शहाणे** : पण तेथील नेते तो सोडविण्याचाही आटोकाट प्रयत्न करीत आहेत.

**रामराव** : अगदी बरोबर. त्यांच्या त्या प्रयत्नांचा लाभ आपणही उठवला पाहिजे, नाही का? म्हणूनच आम्ही–म्हणजे आमच्या राज्यकर्त्या पक्षानं–आपल्याला परदेशच्या दौऱ्यावर पाठवायचं ठरवलं आहे! नाही म्हणू नका, साहेब. आपल्याइतकी लायक व्यक्ती या सबंध देशात आम्हांला कुणी आढळत नाही. आणि लक्षात घ्या साहेब, आपल्या हातून हे केवढं महत्कार्य होणार आहे! भारताच्या लोकशाहीचा क्षय तुम्ही नष्ट कराल, साहेब. जगावर उपकार होतील. आणि या कामाला आता उशीर नको. पासपोर्ट वगैरे सर्व तयारी आम्हांला करू द्या. आपण फक्त होकार द्या आणि निघा. शुभस्य शीघ्रम्. चला. जग पाहून या आणि जगातला भ्रष्टाचार वाढतो आहे का कमी होत आहे हे प्रत्यक्षच डोळ्यांनी बघून या. (सौ. शहाणे चहा–पोहे घेऊन येतात. रामराव उठून त्यांच्या हातातून ताट घेतात.) फारफार कष्ट घेतलेत, वहिनीसाहेब, आम्ही आपली सेवा करायची तर आपणच आमच्यावर उपकारांचे–ह्या पोह्यांचे डोंगर रचता? वहिनीसाहेब, या प्रेमाची फेड आमच्याकडून पुढल्या जन्मात

तरी होईल काय? छे छे, वहिनीसाहेब, आता आम्हांला आपल्या सेवेची एक अल्प संधी द्या. आपण आणि आपले मालक एक परदेशचा दौरा करून या. सगळी व्यवस्था आम्हांला करू द्या.

**शहाणे** : आपल्या सद्भावनांबद्दल मी आपला फारफार आभारी आहे पण मला प्रामाणिकपणानं वाटतं की आपल्या घरातली भांडणं सोडविण्यासाठी दुसऱ्यांच्या घरात डोकावण्याची काही आवश्यकता नाही. आपल्या समस्या या आपल्याच आहेत अन् त्या आपणच सोडवायला पाहिजेत. आपल्या व्यसनामुळे आपला रोग वाढतो आहे हे धडधडीत दिसत असताना आपलं व्यसन कमी न करता जगातल्या व्यसनी लोकांच्यात जाऊन मिसळणं मला अगदी गैर वाटतं. समोर दिसणाऱ्या कळशासाठी सगळ्या जगाला आडवळसा कशाला?

(सौ. शहाणे जातात.)

**रामराव** : वा:! वा:! प्रोफेसरसाहेब, काय ज्ञान सांगितलंत! पटलं आपल्याला! याच विषयावर आपण नवा ग्रंथ लिहून द्या. आम्ही तो हिंदुस्थानातल्या चौदा भाषांत प्रसिद्ध करू. एवढंच नव्हे तर जगातही पाठवू. तुम्ही लिहीत राहा. आम्ही प्रचार करीत राहू.

**शहाणे** : लिहून खूप झालंय, साहेब. लो. टिळक म्हणतात, शब्द नकोत, कृती पाहिजे. कृती करणारं कुणीतरी हवं आहे. नुसतंच लिहीत जाणं म्हणजे शाईबरोबर वाहत जाणं आणि पांढऱ्याचं काळं करणं!

**रामराव** : आपल्याला सक्रिय कार्यकर्ता व्हायचं असेल तर आपण आमच्या पक्षाला येऊन का मिळत नाही? आपल्या मार्गदर्शनाचा आमच्या कार्यकर्त्यांना लाभ द्या. तुमचा हेतू साध्य होईल. आमचा हेतू साध्य होईल.

**शहाणे** : पक्षबाजीमुळंच वाटोळं झालंय देशाचं आपल्या. पक्षाचं हित लोकांना देशापेक्षा महत्त्वाचं वाटतंय. कारण त्यातच स्वत:चं हित आहे! ते काही नाही. पक्ष महत्त्वाचा नाही. माणूस महत्त्वाचा आहे. पक्षाचा कार्यक्रम मोठा आणि माणूस खोटा तर काय फायदा? पण चांगला माणूस चांगल्या ठिकाणी असेल तर काहीतरी चांगलंच घडवून आणील. चांगला माणूस ही खरीखुरी गरज आहे. चांगली माणसंच निवडून दिली पाहिजेत.

**रामराव** : आपण मला निवडून द्या. मी आपल्याशी पूर्ण सहमत आहे. माझी लोकसेवा आपल्यासमोर आहेच. शिवाय, आपल्याविषयी मला फार आदर आहे. आपला सल्ला मी हरेक कामात घेत जाईन आणि त्याबद्दल फूल ना फुलाची पाकळी आपल्याला देत राहीन. आपण आर्य चाणक्य, मी चंद्रगुप्त; आपण विद्यारण्यस्वामी, मी हरिहरबुक्क; आपण समर्थ रामदास, मी शिवाजी! साहेब, देशाचंच काय, जगाचं कल्याण करू. आपला आशीर्वाद हवा मला. साहेब, मी उभा आहे आणि रुक्मिणीच्या तुळशीपत्राप्रमाणं आपल्या महत्त्वपूर्ण मतानंच मी निवडून येणार आहे!

**शहाणे** : रामरावसाहेब, मीही उभा आहे; आणि आतापर्यंत आपण ज्या आदरानं माझ्याशी बोललात त्यावरून मला वाटतं, आपलं मतही आपण मलाच द्याल.

**रामराव** : रास्त बोललात, साहेब. माझं मत आपल्याला आणि आपलं मत मला! हा:! हा:! आता यातून एकच तोडगा निघतो. आपणा दोघांनाही लोकसेवेची हौस अनिवार आहे आणि आपला दोघांचा मतदारसंघही एकच आहे. तेव्हा आपण असं करू या. समता! समान वाटणी!! यावेळी मी उमेदवारीचा अर्ज भरलाच आहे. आपला अर्ज अजून भरायचा आहे. तेव्हा यावेळी मी उभा राहतो. पुढच्यावेळी आपण! लोकशाही! समानसंधी!

**शहाणे** : आपला विचार स्तुत्य आहे. पण ही वाटणी आता आपण नाही करायची. ती जनतेनं करायची आहे. आणि लोकशाहीचा पडेल तो कौल तुम्ही आणि मी दोघांनीही मानायचा आहे–खुल्या दिलानं आणि आनंदानं!

**रामराव** : म्हणजे आपली गाठ आता कुरूक्षेत्रावरच म्हणा ना!

**शहाणे** : धर्मक्षेत्रावर म्हणा साहेब!

**रामराव** : धर्मक्षेत्रावर कृष्णानंसुद्धा प्रतिज्ञाभंग केला साहेब. साहेब, आपण थोर आहात. प्रोफेसरसाहेब, मी आपल्याला शेवटी

एकदाच अत्यंत नम्र विनंती करतो. आपण ग्रंथ लिहा. व्याख्यानं द्या. टीकासुद्धा करा; पण राजकारणाच्या आखाड्यात कृपा करून उतरू नका. तुम्ही खूप मोठे आहात. पण तुमचं क्षेत्र निराळं. आमचं क्षेत्र निराळं.

**शहाणे** : काळ पालटला म्हणजे क्षेत्रंही पालटावी लागतात!

**रामराव** : ग्रहच पालटले असं म्हणायची वेळ येऊ देऊ नका, म्हणजे झालं. ठीक आहे. रामराम! निघतो आम्ही. पण आमचा हृदयपरिवर्तनावर विश्वास आहे. आपल्या चित्तात बदल झाला तर केव्हाही कळवा. लवकर कळवाल तर बरं. ईश्वर आपल्याला सद्‌बुद्धी देवो! दीर्घायुरारोग्य देवो! रामराम! वहिनीसाहेब, जाऊ? (सौ. शहाणे येतात.) आपण एकदा या आमच्या घरी. पतिदेवांना घेऊन या. मुलाबाळांना घेऊन या. आणि वहिनीसाहेब, तुमचं मत तुमच्या साहेबांनाच असणार! पण लोकशाही आहे हो! तुमचे साहेबच म्हणतात की लोकशाही सर्वश्रेष्ठ धर्म आहे म्हणून. मग तुमचं बहुमोल मत आम्हांला हवंच. खरं तर साहेबांचं मतही तुम्ही मिळवून द्या आम्हांला. काय? मग, याल ना आमच्याकडे? जाऊ? (जातो.)

**गोडे** : वा! वा! काय उत्तरं दिलीत, सर! उत्तम नेते होणार तुम्ही. शंकाच नको. अमेरिकेत निवडणुकीपूर्वी टेलिव्हिजनवर उमेदवारांची चकमक दाखवतात ना, तसं वाटलं! पण आता माघार घेऊ नका सर. तुमच्यासारख्यांचीच आज गरज आहे जगाला!

**शहाणे** : आणि तुमच्यासारख्यांचीच आज गरज आहे मला!

**गोडे** : अगदी निर्धास्त राहा तुम्ही सर. मी सर्व काही ठीक करतो. वहिनी, तुम्ही पानं वाढा. हा मी आलोच.

(बाहेर जातो. बाहेरून त्याची पुसट हाक ऐकू येते, 'साहेब.' सौ. शहाणे आत जातात. शहाण्यांचा मित्र विश्वास येतो.)

**विश्वास** : सुधाकर, अरे ऐकलं ते खरं काय? तू उभा राहणार म्हणायचं तर?

**शहाणे** : लोकांच्या इच्छेला मान नको का द्यायला?

**विश्वास** : पण तुला उभे करणारे हे लोक तू पडलास तर तुला



उठवायलासुद्धा पुढं येणार नाहीत.

**शहाणे** : 'मला उठवा' असं मीच कोणाला म्हणणार नाही.

**विश्वास** : ते माहिती आहे मला. म्हणूनच तुला विचारायला आलो आहे की सुखासुखी तू या आगीत उडी का मारतो आहेस? तुझा सामना कोणाशी आहे काही कल्पना आहे का तुला? अरे या रामरावानं एकएक पाप करायचं ठेवलं नसेल. हातभट्टी, जुगार, काळाबाजार, चोरटा व्यापार, पैशांचा अपहार... सारं काही. अन् यात कुणी विरोध करील तर त्याला 'राम' म्हणायला लावणारा राव आहे हा! पुन: वर साधू म्हणून मिरवायला तयार! साधू आहे खरा-संधिसाधू! अन् त्याच्या विरुद्ध तू! कशाला या कालियाच्या शेपटावर पाय देतोस? अरे, मुलाबाळांचा बाप तू! पोरांकडे पाहा-

**शहाणे** : अरे, पोराबाळांच्या चिंतेनं कुणीच काही करायचं नाही की काय? अरे हे काय चाललं आहे? कुणाचाच ताबा नसलेली घाटातून बेफाट सुटलेली गाडी ही! सगळा देश कोसळला तर आपली पोरंबाळं थोडीच टुणटुणीत राहणार आहेत?

**विश्वास** : ते काय व्हायचं असेल तेव्हा होईल. पण तू आपण होऊन का संकटांना हाका मारतो आहेस? उद्या मरण येईल म्हणून कोणी आज जीव देतो का?

**शहाणे** : विश्वास, मला सांग. तू एखाद्या रानात एकटा आहेस. जवळपास कोणी नाही. अशावेळी आकाशातून एखादं प्रचंड विमान स्फोट होऊन आगीच्या लोळात कोसळताना दिसलं तर तू मोठ्यानं ओरडशील की नाही?

**विश्वास** : होय. पण अरण्यरुदनच ठरेल ते.

**शहाणे** : होय. होय. अरण्यरुदन. पण मला जर तेवढंच करता येण्याजोगं असेल तर ते तरी केलंच पाहिजे. अरे एवढा हा भारतीय संस्कृतीचा भव्य राजवाडा कोसळतो आहे असं वाटलं तर निदान त्याचं शोकगीत तरी गायलं जाऊ दे!

**विश्वास** : अरे हा कोसळता डोलारा सावरणं हे तुझं एकट्याचं का काम आहे? त्याला लाख लाख माणसं हवीत रे! तुझ्यासारखा एकटा पार चिरडून जाऊन कुठं होता की नव्हता होऊन जाईल! कृष्णानंसुद्धा गोवर्धन पर्वत एकट्यानं नाही उचलला.

**शहाणे** : कोणीतरी सुरुवात तर करायला हवी?

**विश्वास** : तुझ्या चांगल्या कामात मी खो घालीत नाही. पण मित्र म्हणून मनापासून आवर्जून सांगतो–फेरविचार कर. येतो मी.

**शहाणे** : थांब. चांगल्या वेळी आला आहेस. जेवूनच जा.

**विश्वास** : अं–नको.

**शहाणे** : रागावलास?

**विश्वास** : नाही. पुन: येईन. आयत्या वेळी माणसं वाढली की बायका उपाशी राहतात एखादे वेळी. (जातो.)

**सौ. शहाणे** : (येत. हातात डाव तसाच आहे) हे काय–भावोजी गेले?– अन् विचार कसला करताहात?

**शहाणे** : मी मुलांना मगाशी 'हो' म्हटलं खरं. पण तुझं मत नाही विचारलं.

**सौ. शहाणे** : इश्श! तुमचं मत तेच माझं मत.

**शहाणे** : असं म्हणू नकोस. कदाचित मी चुकत असेन तर विचार करून मला जागं कर.

**सौ. शहाणे** : तुमच्या लोकप्रियतेचा अभिमान वाटतो मला. मुलं तुमच्यासाठी वेडी होतात. वाटतं, मी तुमची विद्यार्थिनीच राहिले असते तर बरं झालं असतं! आणि या पाहा मुलांच्या भेटवस्तू. नको म्हटलं तरी आणून देतात आणि घेतलं नाही तर त्यांना वाईट वाटेल म्हणून घ्यावं लागतं. घर भरलंय नुसतं भेटींनी. गेल्या पंधरा वर्षांतले तुमचे हे विद्यार्थी तुम्हांलाच निवडून देणार नाहीत, तर कुणाला?... पण...

**शहाणे** : 'पण' काय? बोल ना–

**सौ. शहाणे** : उगीचच काहीतरी हूरहूर येते मनात. अकारण काहीतरी चुकल्याचुकल्यासारखं वाटतं. कुठंतरी पाल चुकचुकते. कदाचित अगदीच अपरिचित मार्गावरून जायचं आहे म्हणूनही असेल, पण विनाकारण मनात अशुभ डोकावतं...

**गोडे** : (येत) का वहिनी, येऊ ना?

(सौ. शहाणे चमकतात. नकळत त्यांच्या हातातला डाव पडतो.)

* *



## ( प्रवेश दुसरा )

(रामरावाचे घर. रामराव, गुरुजी, शीला. भिंतीवर बैलगाडीचे चिन्ह.)

**रामराव** : गुरुजी, तुमचा जन्म भाग्याचा. पाहा, तुमचा सगळा काळ बालदेवांच्या पवित्र सहवासात जातो. अहाहा! मुलांशी गोष्टी करणं हे वेदान्ताची चर्चा करण्याहून चांगलं आहे. पण आम्हांला वेळ नाही. फार मोठी कामं लागली आहेत आमच्यामागं. आमच्या वतीनंही सांगत जा रोज चार गोष्टी. काय? मुलांचे फाटके कपडे पाहून माझं अंत:करण फाटून जातं. आम्ही चांगले सुंदर कपडे देतो हां! नवे नवे कपडे! जुने फेकुनी नवीन घ्या! गुरुजी, आतल्या खोलीत चला. नवे कपडे घ्या. भारताच्या भावी पिढीचं भवितव्य आम्हांला भरदारपणे घडवायचं आहे!

(गुरुजी शर्ट आणतो. शर्टांवर बैलगाडीचे छाप मारल्याचे दिसते!)

**गुरुजी** : साहेब, शंभर पोरं झाली बरोब्बर.

**रामराव** : फक्त? आणखी?

**गुरुजी** : करतो साहेब. पण थोडी मदत होईल तर–

**रामराव** : तुम्हाला पगार मिळतो ना? सरकारातून?

**गुरुजी** : होय, साहेब. पण त्यात–

**रामराव** : 'भागत नाही' असंच ना? अहो, जरा जगाची काळजी करा आणि संसार कमी करा. संततिप्रतिबंधाची साधनं वापरता की नाही? घेऊन चला आमच्याकडून.

**गुरुजी** : सगळं करतो, साहेब. तरीपण–

**रामराव** : अहो, तुम्हांला मासिक पगार तरी आहे. पण आम्हांला? आणि तुम्हांला फक्त एक संसार आहे. पण आम्हांला? राष्ट्राचा! तरी आम्ही केवढा स्वार्थत्याग करतो पाहा. अहो ही राजकारणं म्हणजे घरचं खाऊन लष्करच्या भाकरी भाजायच्या. आता हे या कारट्यांचे कपडेच पाहा. केवढा खर्च!

**गुरुजी** : त्यातूनच थोडी सहायता करावी, साहेब.

**रामराव** : तुम्हाला या चड्ड्या अन् हे शर्ट कसे होतील गुरुजी?

**गुरुजी** : शर्टसदरा आहे साहेब. पण त्याच्या खिशात काही नाही आहे, साहेब. निदान चहापाण्याला–

**रामराव** : निवडणुकी जवळ आल्या. आता इथं चहापाणी सारखंच चालणार. अन् तुम्ही तर इथंच असणार की. असणार की नाही?

**गुरुजी** : असणार की, साहेब. आपल्या पायाशीच. पण जरा चार पैसे मिळतील आता तर फार उपकार होतील साहेब. घरी बायकोचं आजारपण चालू आहे, साहेब.

**रामराव** : हे पाहा–मी काही वैद्य, डॉक्टर किंवा हकीम नाही. आहे का? मी सार्वजनिक समाजसेवक! निवडून आलो अन् प्राप्ती झाली की तुम्हाला तुमचा हिशोब नक्की चुकता करीन.

**गुरुजी** : बायको फार आजारी आहे, साहेब.

**रामराव** : सांगितलं ना, निवडून येऊ द्या आधी. मग पैसे देईन. अहो पैसे हवेत तर आधी माझ्या निवडणुकीच्या कामाला लागा! आजारपणाचं काय? राष्ट्रकार्याचं काम मढी झाकून ठेवून आधी करावं लागतं. जा.

(गुरुजी जातो. रामराव आत जाऊन कपडे बदलून येतो.)

**रामराव** : मिस शीला–

**शीला** : 'मिसेस शीला', साहेब.

**रामराव** : (हसून) पाश्चात्य देशांत घटस्फोट घेतल्यावर बायका मूळचंच नाव घेतात नाही?

**शीला** : मला माहीत नाही साहेब.

**रामराव** : जगाची माहिती करून घ्या. आपल्या बायका जगाच्या फार मागे. बरं. मिस नको, मिसेस नको. नुसतंच शीला म्हणू या. बाकी शीला हे नाव ब्यूटिफूल आहे. पाश्चात्यांतही हे नाव असतं, नाही? Sheila! बरं शीला, तुझ्या नवऱ्याचं कसं आहे?

**शीला** : ज्या अवस्थेत तुमच्या संस्थेतून त्यांना घरी न्यावं लागलं त्याच अवस्थेत आहेत ते.

**रामराव** : अरेरे! मला फार दया येते त्याची. खरं सांगू शीला, तुझा हा नवरा म्हणजे अगदी जुन्या जगातला – out of date – माणूस. नव्या जगात कसं नवं बनलं पाहिजे –up to date – म्हणजे मनाला फालतू त्रास होत नाही. बरं, मग औषधपाणी? मेडिसिन्स, टॉनिक्स?



**शीला** : चालू आहे. जमेल तसं.

**रामराव** : हे धर. हे घे पाचशे रुपये. बरा कर तुझ्या नवऱ्याला आणि हळूहळू नव्या जगाची रीत शिकव त्याला. तुझ्याही अंगवळणी पडत जाईल हळूहळू नवी रीत. आता हेच पाहा ना. तो जुनापुराणा बुरसटलेला पोषाख टाकून हा सेक्रेटरीचा पोषाख केलाच आहेस की तू. नोकरीसाठी आवश्यकच आहे ते. तसंच पुढं!

**शीला** : पुढं काय?

**रामराव** : इकडे ये. सांगतो. हे सगळं जीवन म्हणजे काय आहे, ठाऊक आहे? हा एक शेवटपर्यंत चालणारा खेळ आहे– 'गेम' आहे. संघर्ष आहे – सत्तेचा! आणि हा जीवनसंघर्ष आता इतका रंगात आला आहे की नुसतं जगणं म्हणजेदेखील झगडा करणं, पुढच्याला मागं टाकणं, तो पुढं येऊ नये म्हणून त्याला बुडवणं, नाहीसं करणं. आणि जीवनाची रचनाच अशी आहे की लहान झगडा करून झाला की मग त्याहून मोठा केलाच पाहिजे. जीवन म्हणजे युद्ध! आणि प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असतं. झगडा करण्याचे सर्वच मार्ग चांगले असतात. लायक जगेल. नालायक मरेल. यशस्वी लायक लोकांना सोडून नालायकांसाठी रडण्यात काय अर्थ आहे? ज्याला या खेळता भाग घ्यायचा नसेल त्यानं या जगाच्या बाहेर जावं. जगायचंच असेल आणि संघर्ष टाळायचाच असेल तर एखाद्या यशस्वी माणसाच्या छायेला उभं राहावं आणि त्याच्या तालावर नाचावं. जगाचा हा नियमच आहे, बेबी! इकडे ये. तुझा हा नवा कॉस्च्यूम फारच छान दिसतो. मोठी तेजस्विनी दिसतेस तू या पोषाखात. तू माझ्या देशकार्यात मदत कर. मी हळूहळू चढतचढत मोठ्यांतला मोठा नेता होणार आहे आणि माझ्याबरोबरच देशालाही खूपखूप मोठं करणार आहे, खूपखूप श्रीमंत करणार आहे! देशात जिकडेतिकडे भव्य थिएटर्स, उंची हॉटेल्स, मस्त नाइटक्लब्स, सरळ लांबचलांब रस्ते आणि देखण्या अलिशान मोटारी! पण या भिकार देशात

निवडून यायचं म्हणजे हे भिकारपणाचंच सोंग सजवावं लागतं. एकदा मी मोठा नेता होऊ दे की पाहा हिंदुस्थानची कशी अमेरिका करतो ते! ही दृष्टी आहे काय त्या प्राचार्य शहाण्याला? त्याला जगाचा नेता केलं तरी तो पुस्तकांतला किडा पुस्तकांतच मरायचा. आणि लोकांचं प्रेम त्याच्यावरच! भिकेचेच डोहाळे सगळ्यांना! हे बघ, तो महामूर्ख माणूस पैशावर संतुष्ट होईना. पुस्तक खरडण्याच्या निमित्तानं वाटेल ती रक्कम त्याला सरकारकडून मिळवून दिली असती; सगळ्या जगाचा दौरा-टोकियो, न्यूयॉर्क, लंडन, पॅरिस - घडवून आणला असता; पण नशिबातच नाही त्याच्या त्याला आम्ही तरी काय करणार? अशानं तो उभा राहिला आहे तो खाली बसेना. आता एकच उपाय आहे! जालीम उपाय. जबरदस्त उपाय. सेन्टपरसेन्ट सक्सेसफुल होणारा उपाय. शीला, तू मागशील ते मी तुला देईन. अगं, तू त्याला उभ्याचा बसवशील इतकंच नव्हे तर निजवशीलसुद्धा!

**शीला** : शी:! शी:! शी:! काय बोलता हे?

**रामराव** : (हसून) काही नाही. नव्या जगाचं तत्त्वज्ञान. सुखाचा मूलमंत्र! सुधारणा आणि सदाचार! तो सुखी, तू सुखी, मी सुखी! सुखासुखी सगळ्या गोष्टी होऊन जातील!

**शीला** : सर मला वडिलांच्या ठिकाणी आहेत.

**रामराव** : तुला ते. पण त्याला तू?

**शीला** : तेपण मला मुलगीच मानतात. फार मोठे आहेत ते. खरेखुरे देवमाणूस!

**रामराव** : ब्रह्मदेवच म्हण ना! (हसून) अगं प्रत्यक्ष ब्रह्मदेवसुद्धा पोटच्या पोरीला भुलला, तिथं दुसऱ्या कोणाची परक्याच्या कन्येबाबत काय कथा! फ्रॉइडनं चक्क सांगूनच ठेवलंय त्याला तुझा इलाज काय आणि माझा इलाज काय?

**शीला** : मला नाही जमायची असली कामं.

**रामराव** : तुलाच केली पाहिजेत. मी शिकवीन तुला.

**शीला** : जाते मी.

**रामराव** : कुठं? घरी! त्या वाचा बसलेल्या, पडलेल्या नवऱ्याकडे! तो कोणत्या उपयोगी पडणार आहे तुझ्या? अगं, चांगली तुम्हा



दोघांना नोकरी लावून दिली मी. काय वाईट करीत होतो मी तुमचं? जो माझ्या जितका उपयोगी पडतो तितकंच मी त्याचं भलंही करतो. भिकेला लागली असतीस ते तुला पोसलं म्हणून ही दगाबाजी? कसला धोका वाटतोय तुला हे काम करण्यात? तुझा मार्ग बिनधोक मोकळा करून देतो मी. तू फक्त पुढेच पाय टाक. चल. बोल. बोल.

**शीला** : जाऊ द्या मला.

**रामराव** : कुठं?

**शीला** : घरी.

**रामराव** : घरी? तुझं घर? हुं:! मीच उभं केलंय ते! आणि तुझ्या घरातील अख्खी चीजवस्तू अन् तुझ्या नवऱ्याचं उरलेलं आयुष्य जप्त करण्याची कळ आहे माझ्या हातात. मग तुझी पोरं?

**शीला** : सोडा मला.

**रामराव** : हां! त्या दीडशहाण्याकडे जाणार असशील! असा काय गूळ चिकटलाय त्याच्या अंगाला कुणास ठाऊक! त्याच्या गळ्यात असं जाऊन पडण्यापेक्षा 'तसं' पड. प्लेटॉनिक लव्ह असेलच तुमचं एकमेकांवर. हुं:! अरे हिम्मत नाही अस्सल प्रेम करण्याची. रगच नाही. पुरुषार्थ नाही.

**शीला** : त्यांना नावं ठेवू नका.

**रामराव** : अस्सं? तरीच! बरीच प्रगती झालेली दिसतेय! हं! तरी मला वाटलं होतंच. तूच त्या मूर्खाला माझ्याविरुद्ध चिथावलं असशील! रडली असशील तिथं जाऊन अन् त्याला पुळका आला असेल! त्या शहाण्यानं निवडणुकीत पडण्याचा मूर्खपणा जाहीर केला तेव्हा तिथं कोणकोण होतं ते सगळं कळलंय मला! त्याच्याकडली बित्तंबातमी मला सांगण्याऐवजी माझ्या कागाळ्या नेल्यास ना त्याच्याकडे? माझं खाऊन त्याचं काम? थांब. मलाच शरण आलं पाहिजे तुला. माझीच कामं केली पाहिजेस तू. माझ्या ऋणाची फेड सव्याज केलीच पाहिजे तुला. माझ्या अपराधाचा दंड भरलाच पाहिजे तुला. सगळं सगळं वसूल करणारच मी. सोडणार नाही त्याशिवाय. तुला काय वाटतं? तो जिंकणार? आणि मी

पडणार? अगं सोड. मला आडवं येणाऱ्याला पाडून त्याच्या अंगावर नाचल्याशिवाय राहणार नाही मी. हे बघ. तुलाच पाडून तुझीच खात्री पटवून देतो!

(रामराव शीलाच्या अंगावर हात टाकतो. ती सुटून जाण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागते. इतक्यात दारावर धक्के बसतात आणि त्या जोराने दार उघडते. शहाणे येतात.)

**रामराव** : तुम्ही इथं? तुमचं इथं काय काम आहे? जा इथून.

**शहाणे** : जायलाच आलो आहे; पण एकटा नाही.

**रामराव** : बरोबरच आहे. बुवा तेथे बाई. गुरू तेथे शिष्या.

**शहाणे** : शट् अप! नॉन्सेन्स! (पुढे येतात.)

**रामराव** : एन्जॉय युवरसेल्फ! ओन्ली नाउ!

(रामराव जातो. जाताना दार लावतो.)

**शहाणे** : ऊठ शीला. चल

**शीला** : तुम्ही आलात म्हणून आता वाचले मी सर. पण काय करू, या दुष्ट चक्रव्यूहातून माझी सुटका व्हायची नाही, सर.

**शहाणे** : सुटशील तू. मी सोडवीन तुला. विश्वास ठेव माझ्यावर अन् चल माझ्याबरोबर.

**शीला** : सर, तुम्ही इथं आलात तरी कसे?

**शहाणे** : तुम्ही सगळे माझ्या घरून गेलात; आणि खूप विचार केला मी. शेवटी ठरवलं, सिंहाचं बळ त्याच्या गुहेत, तसं माझ्यासारख्याचं महत्त्व त्या महाविद्यालयीन क्षेत्रातच. ते हातचं सोडून पळत्या राजकारणाच्या क्षेत्रात पडायचं म्हणजे दोन्हीही ठिकाणी फसायचं. त्यापेक्षा शिक्षणाच्या मार्गानंच जमेल अशी सुधारणा हळूहळू करीत जायचं!

**शीला** : मग?

**शहाणे** : हे सांगायला म्हणून मी सुधीरकडे गेलो. तो घरी नव्हता. पण त्यानं सांगितलं होतं की तुझं घर शेजारीच आहे म्हणून. म्हणून तुझ्या घरी गेलो. तुझ्या पतिराजांची स्थिती पाहिली आणि पुन: मनानं उचल खाल्ली. पुष्कळ अवेळ होऊनही तू आली नाहीस तशा मनात नको त्या शंका येऊ लागल्या. म्हटलं, जाऊनच पाहावं. अन् आता तुझी ही अवस्था पाहून तर मी पक्का निश्चयच केला आहे.



**शीला** : काय, सर?

**शहाणे** : निवडणुकीला उभं राहायचंच!

**शीला** : सर, किती चांगले आहात तुम्ही!

**शहाणे** : मला विचारही करवत नाही की हा रामराव प्रत्यक्ष सत्ताधारी झाला तर आणखी काय काय करील!

**शीला** : तुम्ही निवडून याल, सर. तुम्ही निवडून याच, सर!

**शहाणे** : आता चल लौकर इथून.

**शीला** : सर, सांगायला लाज वाटते, सर. पण तुम्ही मोठे आहात.

**शहाणे** : काय, शीला?

**शीला** : सर, माझ्या ब्लाउजची मागची बटणं मघाशी तुटली आहेत, सर. प्लीज तिथं ही सेफ्टी पिन लावा. त्याशिवाय बाहेर पडू कशी?

**शहाणे** : दे बघू.

**शीला** : सर, असला हा पोषाख सेक्रेटरीचा पोषाख म्हणून त्यांनी सक्तीचा केला होता. सगळीच सक्ती.

**शहाणे** : आता लाभेल मुक्ती!

(शीला जवळ येते. शहाणे पिन लावत असतात त्याच वेळी दारात काही लोकांसहित रामराव आणि एक छाया-चित्रकार असतो. तो प्रखर प्रकाश टाकून चटकन दोघांचा एकत्र फोटो काढतो. सगळेजण हसतात. त्यात गोडेही आहे.)

* *

# २

## (प्रवेश पहिला)

(प्राचार्य शहाणे यांचे घर. भित्तिपत्रके, फलक वगैरे निवडणुकीची तयारी दिसते. खूण-पुस्तक आणि लेखणी. प्रभाकर, सतीश, शेखर, पल्लवी आणि दोन विद्यार्थी.)

**प्रभाकर** : शीला अजून कशी नाही आली?

**सतीश** : छे, किती वाट पाहायची?

**शेखर** : प्रभाकर, अरे एव्हाना इथून निघायला हवं होतं. उशीर होईल ना प्रयोगाला.

**प्रभाकर** : शीलाताई कधी वेळ चुकवायची नाही. घरकाम असूनसुद्धा! मग आजच काय झालं कुणास ठाऊक. सुधीर तिला बघायला गेला पण त्याचाही पत्ता नाही. सर व्याख्यानाला गेलेत तेही तिकडेच. काय करणार आता?

**सतीश** : भारतमाताच नाही. मग बाकीचं नाटक कसं होणार?

**पल्लवी** : मी होऊ का भारतमाता? ऐकून ऐकून नाटक पाठ झालंय माझं. मी करीन शीलाताईचं काम.

**प्रभाकर** : चला. चटकन एक तालीम तरी करू या आणि निघू या. तोवर शीला आली तर ठीकच. नाहीतर ही भारतमाता आहेच.

**सतीश** : अरे प्रभाकर, भारतमाता बदलली तशी आणखी एक गंमत करू या. याला रामरावाचा वेष देऊ या.

**शेखर** : वा:! सतीश, डोकं आहे हं तुला! छान! झक्क प्रचार होईल.

**सर्वजण** : 'छान! छान!' 'वा:! वा:!' 'मजाच मजा!'

**प्रभाकर** : चला. कार्यक्रम सुरू.

**सतीश** : हा 'रामराव' आणि मी 'सर'!

**सर्वजण** : वाहवा! वाहवा! (टाळ्या वाजवतात.)

**प्रभाकर** : अरे, लवकर, लवकर.

**(तिघे भारतीय भारतमातेची आरती गात आहेत)**

**भारतमाते, भाग्य आमुचे, तू अमुची आई**



**या भाग्याला विश्वामध्ये तुलनाही नाही**
**दूध दिले तू अम्हांस गंगायमुनासिंधूचे**
**अंगाईस्तव मंत्र गायिले अगमानिगमांचे**
**मन रमवाया दिलिस खेळणी सुंदर लेण्यांची**
**घास भरविता गीते गासी नाना रागांची**
**खेळगडी तू दिले अम्हांला सगळ्या जगतातुनी**
**विहार करण्या नाचविले तू नक्षत्रांमधुनी**
**लपंडाव तू खेळ शिकविला आत्मा शोधावा**
**धडा गिरविला अमुच्या हस्ते विद्येचा धावा**
**या धरतीवर तुझ्या प्रीतिने पूर्ण दिशा दाही**
**तुझ्यामुळे तर शेष पृथ्विचा भार सुखे वाही**

(एकाएकी मुलांत कुरबूर सुरू होते. त्याचवेळी एक मोगली पोषाख केलेला राजा येतो. मुलांपैकी रामरावासारखा पोषाख केलेला एकजण फितूर होतो. त्याच्या मदतीनेच मोगल राजा सर्वांना गुलाम करतो. आपले जुने कपडे तो फितुराकडे फेकतो. मोगल राजा भारतमातेच्या अंगावरील दागिने ओरबाडून स्वत:च्या अंगावर चढवतो. गुलामांची गाडी करून हाकीत राहतो. त्यावेळी भारतमाता म्हणते-)

**रे बाळांनो, वाद थांबवा, शत्रूला अडवा**
**कलह नको रे, समर्थ तुम्ही, त्या नीचा बुडवा**
**फंदफितूरी नसे ही बरी झाले मी घाबरी**
**तुमच्यास्तव जे वैभव माझे ते नेतो हा दुरी**
**विसरलात रे कशी शक्ति जी तुमच्या बाहूंत**
**एक होउनी राज्य करा रे जगात सर्वत्र**

(मुले ऐकत नाहीत. शहाण्यांसारखा दिसणारा मुलगा इतरांना एक करण्याचा, फितुराला मित्र करण्याचा, राजाला शांत करण्याचा प्रयत्न करतो; पण सर्वजण त्याला झिडकारतात. हे लांबून पाहून एक इंग्रज जवळ येतो. बंदुकीचा बार काढतो. 'रामराव' त्याला फितूर होतो. मोगल राजा पळून जातो. इंग्रजी बंदूक फितूर मनुष्य स्वकीयांवर रोखतो आणि इंग्रजाला लूट करू देतो. भारतमाता खुणावून सांगते की 'बंदूक इंग्रजावर उचल' पण त्याऐवजी तो 'शहाण्या' वर नेम धरतो. इंग्रज त्याला उष्टा पाव देतो. गुलामांचा गाडा चालूच आहे. भारतमाता म्हणते-)

**गुलामगिरिची गुंगी असली कशी तुम्हा चढली**

**कुठे ती वीरश्री गेली**
**सूर्यवंश अन् सोमवंश हा जगद्‌गुरू तुम्ही**
**राबता परक्यांच्या कामी**
**सुवर्ण नेले, अन्न चोरिले, वस्त्र पहा ओढिती**
**व्हायची ह्यांची ना तृप्ती**
**तुमच्या माझ्या जीवांवरती पहा कसे टपले**
**चोर हे मालक की बनले**
**काळझोप लागली तुम्हा का? कशी नसे खन्त?**
**व्हायचा तुमचा का अन्त?**
**एक होउनी उठाल तुम्ही जरि क्षणही एक**
**व्हाल ना स्वतंत्र नि:शंक**
**उठा, चला, उठा, चला, उठा, चला**
**गेला गेला नीच शत्रु तो पार लया गेला**
**स्वातंत्र्याचा सूर्य उगवला हासत वर चालला**
**सर्व मिळूनी सुखात नांदा सुख द्या जगताला**

(प्राचार्य शहाणे येतात.)

(सर्वजण भारतमातेला अर्पण करण्यासाठी पंचपक्वान्नांचे ताट तयार करतात. 'रामराव' पुढाकार घेऊन ते स्वत: जवळ घेतो. 'भारतमातेला देतो' असे आश्वासन तो देतो आणि बाजूला होऊन आपणच खातो आणि लठ्ठ होतो. पण परत येऊन 'प्रसाद भारतमातेने खाल्ला' असे सर्वांना सांगतो. सर्वजण उपाशी राहतात आणि कृश होतात. त्यांच्या हातांतली कामाची हत्यारे गळून पडतात. ते पाहून सीमेवर चिनी-पाक शत्रू येतात. 'रामराव' त्यांना बोलावतो. शत्रू हल्ला करतात. भारतमाता आक्रोश करते.)

**शहाणे** : थांबा. थांबा. बंद करा हा कार्यक्रम.
**सर्वजण** : काय? बंद? का? काय चुकलं?
**शहाणे** : नाटक चांगलं झालं. चांगली कामं केलीत तुम्ही. पण त्या सगळ्याला गालबोट लावलंत.
**प्रभाकर** : काय चुकलं, सर?
**शहाणे** : या फितुराला रामरावाचा वेश द्यायला नको होता.
**सतीश** : त्यामुळं तर चांगला प्रचार होईल आपला.
**शहाणे** : दुसऱ्याची प्रतिमा वाईट करून आपली उजळ भासवायाची हे नको आहे मला.



**सतीश** : पण सर, रामराव तर-
**शहाणे** : काय पुरावा आहे तुमच्याजवळ?
**शेखर** : सगळं जग म्हणतंय, सर.
**शहाणे** : म्हणजे पुरावा नव्हे.
**प्रभाकर** : रामरावाचं चारित्र्य म्हणजे उघडंनागडं गुपित आहे, सर.
**शहाणे** : चारित्र्यासारख्या बाबतीत प्रत्यक्ष पुरावा असल्याखेरीज आपण बोलू कसं शकतो?
**प्रभाकर** : अशा गोष्टींत पुरावा मिळणारच कसा?
**शहाणे** : मग आपण असं नाटक कसं करू शकतो?
**प्रभाकर** : पुरावा गोळा करायचाच म्हटलं तर तेही करू आपण.
**शहाणे** : पण तो पुरावासुद्धा प्रथम न्यायालयातून सिद्ध करून आणावा लागेल.
**प्रभाकर** : पुरावा गोळा करायचा, खराखोटा ठरवायचा, कोर्टातून सिद्ध करून आणायचा, तर ही निवडणूक उलटून पुढची निवडणूक येईल.
**सतीश** : मग हे नाटक रद्द करायचं?
**शहाणे** : छे, छे, नाटक झालंच पाहिजे. त्यातलं तत्त्व लोकांच्या मनावर ठसलंच पाहिजे.
**शेखर** : पण मग प्रचार कसा व्हायचा, सर?
**प्रभाकर** : रामरावांनी काय चालवलंय, सर?
**शहाणे** : दुसऱ्याला बदनाम करून प्रसिद्ध होण्याची पाळी आपल्यावर आली आहे का? तशी वेळ आली असेल तर निवडून न येणंच चांगलं की. अरे, आपली बाजू इतकी भक्कम असली पाहिजे की केवळ आपल्या गुणांवरच आपण निवडून आलं पाहिजे. परीक्षेत पहिला क्रमांक पटकवायचा तो आपल्या अभ्यासाच्या बळावर की दुसऱ्याला नापास करण्यावर?
**प्रभाकर** : निवडणूक म्हणजे परीक्षा का, सर?
**शहाणे** : निश्चित. उमेदवारांनी आपापली उत्तरं जनतेपुढं मांडावीत. जनतेला जे उत्तर उत्तम वाटेल त्याला ती मतं देईल.
**प्रभाकर** : पण सर, आपण परीक्षक आहोत हे जनतेला ठाऊक तरी आहे का?
**शहाणे** : हीच जनताजागृती करायची आहे आपल्याला.

**प्रभाकर** : सर, निवडून येण्याचं काम आपण करायचं की लोकांना शिकवीत बसायचं?

**शहाणे** : दोन्ही करायचं!

**प्रभाकर** : सर, लोक तर शिकायचे नाहीतच; पण आपण मात्र पराभूत होऊ.

**शहाणे** : लोकांना शिकवण्यात अपयशी होणं हाच आपला पराभव आहे. लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकून निवडून येण्यापेक्षा धुळीला मिळून जाणंच मला आवडेल.

**सर्वजण** : सर!

**शहाणे** : लोकांवर प्रेम करायचं की लोकांना फसवायचं?

**प्रभाकर** : पण सर, रामरावांनी तर अगदी वाट्टेल त्या मार्गांनीसुद्धा निवडून यायचंच अशा हट्टानंच कंबर कसली आहे ना? त्यांनी चालवलेला प्रचार, त्यांचा तमाशा तुम्ही पाहिलात का, सर?

**शहाणे** : त्यांना त्यांच्या मार्गांनी जाऊ द्या. आपण आपल्या मार्गांनी जाऊ.

**प्रभाकर** : क्षमा करा, सर. मला हे शक्य वाटत नाही.

**शहाणे** : का?

**प्रभाकर** : दुष्ट शक्ती अधिक पुष्ट असतात, सर. त्यापुढं तुमच्यासारख्या सुष्टांचा पाडाव व्हायला वेळ लागणार नाही.

**शहाणे** : स्वार्थी हेतूंनी नीच गोष्टींना प्रवृत्त झालेले जे दुष्ट असतात त्यांच्या अंगी त्यांच्या वेड्या हट्टामुळं खूप बळ चढल्यासारखं वाटतं खरं; पण उदात्त हेतूंनी भव्य ध्येयांच्यामागे लागलेल्या त्यागी लोकांच्या अंगी त्यांच्याहून अनंतपटींनी महान सामर्थ्य प्रगट होतं. दुष्ट शक्ती एकदम माजतात तशाच एकदम नष्टही होतात. सुष्ट शक्ती हळूहळू वाढतात पण चिरंजीव होतात. अरे, कातडीबचाऊ माणसं कधी जीव तोडून कामं करतील काय? त्यांच्या हातून काय होणार? शेकडो श्रीमंत संस्थानिकांनी शेकडो वर्षांत जी कामं केली नाहीत, ती विवेकानंद, टिळक, गांधी अशा माणसांनी एकेकट्यानं केली नाहीत काय? संन्यासी विवेकानंदांनी सगळ्या पाश्चात्य प्रगतीला आव्हान दिलं नाही काय? लोकमान्य टिळकांनी केवळ आपल्या सिंहगर्जनेनं इंग्रजी साम्राज्याला कापरं भरवलं नाही काय? नि:शस्त्र गांधींनी पल्लेदार तोफा कुचकामी केल्या नाहीत काय? बोला, तुम्हाला विवेकानंद-टिळक-गांधींचं बळ हवं आहे की गुंडांचं, विकृत वेड्यांचं आणि नरपशूंचं बळ हवं आहे? आणि हे श्रेष्ठतम बळ तुम्हांला हवं असेल तर ज्येष्ठतम ध्येयाची उपासना करा. शारीरिक बलाची उपासना आपण रोज करतो; पण आंतरिक बलाला मात्र आपण उपासच पाडतो. अरे, हजारो माणसांना जगभर संचार करण्याची प्रेरणा एखादा धर्म देत नाही काय? जन्मजन्म साधना करायला लावण्याचं आकर्षण कला, विद्या, शास्त्रं माणसांना देत नाहीत काय? अरे, लोकशाही हाच मानवतेचा धर्म आहे. लोकशाही हीच सामूहिक जीवनाची कला आहे. लोकशाही हीच सर्व विद्यांची विद्या आहे. लोकशाही हेच सर्वश्रेष्ठ शास्त्र आहे. चला, उठा, हिंमत धरा आणि प्रचार करा. जे पाऊल उचलाल ते विजयाचेच आहे. जी कराल ती प्रगतीच आहे. बोला, लोकशाहीचा-

**सर्वजण** : विजय असो!

**शहाणे** : सत्याचा-!

**सर्वजण** : विजय असो!

**प्रभाकर** : प्राचार्य शहाणे यांचा-

**सर्वजण** : विजय असो!

**शहाणे** : पुरे, पुरे. माझा जयजयकार पुरे. माझा जयजयकार हा खरं म्हणजे तुमचाच जयजयकार आहे.

**प्रभाकर** : मग तो पुरे कसा? बोला, प्राचार्य शहाणे यांचा-

**इतर सर्व** : विजय असो!

('लोकशाहीचा विजय असो!' 'अमुचा पक्ष सत्याचा-लोकशाहीवाल्यांचा,' 'सत्याचा विजय असो-' 'प्रत्येकाला जगू द्या- जग सुखाचे बघू द्या', अशा घोषणा करीत तसेच फलक घेऊन सर्वजण जाऊ लागतात.)

**शहाणे** : अगं पल्लवी, शीलाची जागा तू का घेतलीस?

**पल्लवी** : शीलाताई आलीच नाही, बाबा.

**शहाणे** : का? काहीतरी तशीच अडचण असल्यावाचून ती वेळ चुकवणार नाही.

**प्रभाकर** : सुधीर तिकडेच गेला आहे. त्या भागात आपली पत्रकं वाटता-वाटता चौकशी करून येतो म्हणाला. पण तोसुद्धा

आला नाहीच.

**शहाणे** : आश्चर्य आहे! मी त्यांची थोडी वाट पाहतो. तुम्ही कार्यक्रम सुरू करा. मी हा आलोच व्याख्यान द्यायला.

(सर्वजण जातात. शहाणे व्याख्यानाची तयारी करू लागतात टेबलाजवळ बसून निरनिराळी पुस्तके चाळणे, टिपणे करणे, वगैरे. इतक्यात - -)

**विश्वास** : (येत) अरे सुधाकर, आनंदाची बातमी!

**शहाणे** : काय? शीला गेली कार्यक्रमाला?

**विश्वास** : शीला जाऊ दे रे. तिच्या प्रचारापेक्षा जास्त मतं मी तुला देतो. एकदम हजार-गठ्ठा!

**शहाणे** : असं?

**विश्वास** : अर्थात मत म्हणजे किंमत! नाहीतरी प्रचारावर खर्च करायचाच. पण प्रचाराचा खर्च करूनसुद्धा खात्री नाहीच. एक माणूस ही हमी देतो, पैसे मोजा. मतं घ्या. निम्मी रक्कम आधी. निम्मी निवडणुकीनंतर. एवढी सवलत. रामराव मताला पाच रुपये वाटतो आहे. हा अजून चारात खूष आहे. मला वाटतं, आपण विचार केला पाहिजे. खर्च करायचा तो वाया नाहीच जाता कामा.

**शहाणे** : अरे बाबा, लोकांना याच भ्रष्टाचाराच्या सवयी लावायच्या म्हणजे आईनं मुलाला दारू प्यायला शिकवणं आणि बापानं त्याला बाजारबसवीची माडी चढायला शिकवण्याप्रमाणं आहे. लोकजागृती करणं म्हणजे मुलाला शिकवणं. तो खर्च वाया कधीच जात नाही.

**विश्वास** : लोक चांगल्या सवयी लावून घेणार आहेत? अरे, त्या रामरावानं दम, दारू, दाम आणि दासी असा चौफेर हल्ला चढविला आहे आणि तू कसल्या ध्येयाच्या धुंदीत आहेस?

**शहाणे** : धुंदी नाही, विश्वास, जागृती. रामरावानं जर हा चौफेर हल्ला चढवला आहे तर आपण अष्टावधानी झालं पाहिजे. अरे रोगाची साथ वाढत चालली तर आरोग्याची काळजी दुप्पट वेगानं वाढवली पाहिजे.

**विश्वास** : या तुझ्या तपाला कसलं फळ येणार?

**रामराव** : कर्मण्येऽवाधिकारस्ते- -

**विश्वास** : कर्म! (जाऊ लागतो.)



**शहाणे** : थांब.

**विश्वास** : थांबू कसा?

**शहाणे** : का?

**विश्वास** : तूच म्हणालास ना दुप्पट काम केलं पाहिजे? मग-डबल अप!!

(जातो.)

(शहाणे पुन: पुस्तक वाचू लागतात. वाचता वाचता त्यातच मग्न होतात. सौ. शहाणे एकदा आतून येऊन पाहून जातात. मग तांब्याभांडे घेऊन येतात. टेबलावर ठेवतात. नंतर ताट वाढून आणतात. टेबलावर ठेवतात. क्षणभर वाट पहान भांड्यात पाणी ओततात. क्षणभर वाट पाहून भातावर आमटी ओततात. क्षणभर वाट पाहून चमच्याने भात कालवतात. शेवटी चमचा भरून तोंडात घालतात. शहाणे खातात; पण वाचनात दंगच. असेच भरवणे चालते.)

**सौ. शहाणे** : अहो, तुम्हाला काही जेवायखायचं भान?

**शहाणे** : खरंच की. मघाशी तेच झालं. लोकमान्य टिळकांचे लेख वाचीत होतो मी. लोकमान्यांचा शब्द म्हणजे लोकशाहीचा मंत्र. हा मंत्र आठवला की देहभान हरपतं. 'हिंदुस्थान ही आमची जन्मभूमी. हिंदुस्थान हीच आमची कर्मभूमी. हिंदुस्थानवासी हेच आमचे एकमेकांशी असलेले नाते. आणि सर्व हिंदुस्थानवासीयांची सर्वांगीण उन्नती करणे हाच आमचा धर्म.'

**सौ. शहाणे** : आणि पतीला जेवायला घालणे हाच पत्नीचा धर्म. चला. जेवा आधी.

**शहाणे** : अगं मला आता जाऊ दे. बाहेर खूप चहापाणी झालंय माझं. तू जेवून घे. (दारापर्यंत जाऊन) पण तू अजून काहीच खाल्लं नसशील. कसं समजावून सांगायचं बुवा तुला? जेवतो मी. तूही जेव. घे. घे. तुझं प्रेम मोठं. तू जेवणही खूप मोठं आणलं आहेस.

(इतक्यात जखमी सुधीर धडपडत येतो.)

**सुधीर** : (येत) सर, सर, आपला विजय जवळ आला.

**शहाणे** : कशावरून? आणि हे काय? या जखमा ---

**सुधीर** : या विजयाच्या खुणा, सर!

**सौ. शहाणे** : म्हणजे?

**सुधीर** : (हसत) सर, बोलणं खुंटलं म्हणजे माणूस हातघाईवर येतो. नाही?

**शहाणे** : पण---

**सुधीर** : आणि सर, माणूस पराभूत झाला की अगतिकतेनं हल्ला करतो. नाही? हा:! हा:! सर, हा पाहा आपल्या यशस्वी प्रचाराचा आणि हाताशी आलेल्या विजयाचा पुरावा. (अंगावरच्या जखमा दाखवतो, सौ. शहाणे औषधपट्ट्या करतात.)

**शहाणे** : अरे, असला हा विजय काय कामाचा? नको, नको हा विजय.

**सुधीर** : असं म्हणू नका, सर. तुम्ही विजयी झालंच पाहिजे.

**शहाणे** : तुझ्यासारख्याला मार खायला लावून?

**सुधीर** : सर, तुम्ही विजयी झाल्यानंच या जखमा बऱ्या होतील. आणि सर, तुम्ही विजयी झाल्यानंच पुढल्या मारामाऱ्या टळतील.

**शहाणे** : काय? मारामाऱ्या अटळ आहेत?

**सुधीर** : मारामारीशिवाय राजकारण कसं होणार?

**शहाणे** : नाही. नाही. लोकशाहीत काय वाटेल ते झालं तरी मारामारी टाळलीच पाहिजे.

**सुधीर** : शत्रू आडवा आला तरी?

**शहाणे** : अरे, विरोधी पक्ष म्हणजे शत्रू नव्हे.

**सुधीर** : असं फक्त तुम्ही मानता. तुमचे विरोधक तुमचं शत्रुत्वच करताहेत.

**शहाणे** : तरीपण आपण मित्रत्वच राखलं पाहिजे. विरोधी पक्ष म्हणजे काही शत्रुराष्ट्र नव्हे. तू आपण होऊन कुणाला मारलं नाहीस ना?

**सुधीर** : माफ करा, सर. मीच प्रथम मारलं!

**शहाणे व**
**सौ. शहाणे** : का? काय झालं?

**सुधीर** : सर, छापखान्यातून आपली प्रचारपत्रकं घेऊन मी येत होतो. येता-येता भराभर वाटीतही होतो. इतक्यात एक गुंड आला आणि माझी पिशवी हिसकू लागला. मला आला राग. मी दिला ढकलून त्याला चांगला दूर. तो पुन: येऊन माझ्याशी झोंबाझोंबी करू लागला. मग मात्र मी त्याला दमच भरला. म्हटलं, 'याद राख. पुढं येशील तर दातच पाडीन.' पण मला



माहीत नव्हतं. सर, तो मोहल्ला तर खास त्याचा मोहल्ला होता. कुठूनतरी एकदम त्याचे चारपाच दोस्त उगवले. त्यांनी मला घेरलं. पण मी ठरवलं, आपण घाबरायचं नाही. शक्य तेवढा आरडाओरडा करायचा. रामरावाचे लोक मला एकट्याला घेरून मारताहेत असं दिसलं तर तेवढाच आपला प्रचार होईल! ते लोक आले माझ्याजवळ अन् मग एकजण म्हणतो कसा, 'काय रे बेट्या, तुला तो पिरिनशिपाल काय देतो?' मी म्हटलं, 'तुम्हांला काही ते कळायचं नाही. मुकाट्यानं सोडा मला.' तसा दुसरा म्हणतो, 'अरे तो भिकारडा काय देणार अन् हा भेंडीखाऊ काय खाणार?' तिसरा म्हणतो, 'अरे पैसा राहिला, बाटली राहिली. निदान यात तरी वाटा देतो का नाही?' अन् असं म्हणून त्यानं एक फोटो दाखवला, सर. आणि सर... आणि सर... त्या फोटोत तुम्ही होता आणि शीला होती. फार वाईट होता सर फोटो तो. मी ओरडलो, 'फोटो बनावट आहे. इकडे द्या तो फोटो.' ते देईनात. मग मी त्यांच्या अंगावर धावलो. एकजण हसत म्हणाला, 'अरे, इथं कशाला मस्ती करतोस? असेल रग तर त्या मास्तरबरोबर जिरव.' मी त्याच्या मुस्काटातच भडकावली. त्या चौघांनी मिळून मलाही मारलं. पण सर, तो फोटो काही मिळवता आला नाही मला. माझ्या पिशवीतली पत्रकंही त्यांनी ओढली, सांडली, फाडली. घेता आली तेवढी घेऊन आलो मी. पण सर, तसले खोटेनाटे फोटो हे नीच मवाली लोकांना दाखवीत असणार. हा खोटेपणा कसा नष्ट करायचा, सर?

**शहाणे** : केवढा त्रास सहन केलास तू! पण तो फोटो खरा आहे.

**सुधीर** : शक्य नाही सर, शक्य नाही.

**शहाणे** : शीला फोटोतल्याच अवस्थेत होती. पण इथं नव्हे. रामरावांच्या घरी. त्या तशा अवस्थेतून रामरावांच्या तावडीतून तिला सोडवून आणावी लागली मला. तिला मी ब्लाउझ घालायला मदत करीत होतो, कारण त्याच्या गुंड्या सगळ्या तोडल्या होत्या त्या गुंडानं, तेवढ्यात त्यानंच चटकन फोटो घेतला.

**सुधीर** : सर, फोटो खरा आहे म्हणजे काळजीपूर्वक डोळसपणानं

पाहणाऱ्यांनासुद्धा तो पटणारच. सर, आता काय करणार?

**शहाणे** : छे, छे! हा आघात सहन करणं कठीण आहे. शीलासारख्या चांगल्या मुलीची केवढी ही बदनामी! तिला हे कळलं म्हणजे किती वाईट वाटेल तिला. छे, छे! अशा चांगल्या मुलीच्या बदनामीला असं कारण होण्यापेक्षा ही निवडणूक रद्द करणंच चांगलं.

**सुधीर** : मला एक उपाय सुचतो, सर. शीलानं जर आपण होऊन रामरावाचा गुन्हा जाहीर केला तर तुमच्यावरचं किटाळ तर मावळेलच; पण रामरावाचं हत्यार त्याच्यावरच उलटेल.

**शहाणे** : असं काहीही करायला मी सांगणार नाही तिला.

**सुधीर** : का?

**शहाणे** : आपल्या अब्रूचं असं जाहीर स्पष्टीकरण करीत बसणं कुणाला आवडेल?

**सुधीर** : तिनं स्वत:ची बदनामी बंद करून घ्यायला नको का, सर?

**शहाणे** : पण रामराव जाहीर रीतीनं तो फोटो दाखवतोच कुठं? तू काय, मी काय, शीला काय, घरोघर जाऊन खरोखर काय आहे ते सांगत बसणार की काय? लोक म्हणणार, 'हे आपण होऊन का येतात सांगायला? खाई त्याला खवखवे!' –आपण काय करू शकणार अशा वेळी? छे, छे, सगळं व्यर्थ आहे.

**सौ. शहाणे** : अहो, असे निराश नका होऊ. तुम्ही प्रचाराला, व्याख्यानाला निघालात की मी येते तुमच्या मागोमाग. अहो, जो नवरा दुसऱ्या बाईच्या मागे लागतो त्याच्यामागे त्याची बायको जाईल का?

**सुधीर** : पण लोक म्हणणार, किती चलाख आहे पाहा नवरा. बायकोला बरोबर मिरवतो अन् दुसरीकडे जीव रमवतो.

**सौ. शहाणे** : लोक काय वाटेल ते बोलतील. त्यांच्या तोंडी कुणी लागायचं?

**सुधीर** : त्याच लोकांच्या मतांवर निवडून यायचंय ना आपल्याला? म्हणूनच त्यांची खात्री पटवली पाहिजे की खरा बदमाष कोण आहे. सर, शीलाला साक्ष द्यायला सांगण्यात खोटं तर काही नाही?

**शहाणे** : नाही, नाही. माझ्यानं ते होणार नाही अन् तुम्हीही ते करू नका. छे, छे! तिची अशी बदनामी होते आहे हेसुद्धा तिला कळता कामा नये. तेच जिवाला लावून घेईल ती. अरे, अशा बाबतीत बायका एकवेळ जीव देतील पण कोर्टातदेखील साक्ष देणार नाहीत – स्वत:ची बाजू खरी असूनसुद्धा. सीतेनं न्याय मागितला नाही. – रामाजवळसुद्धा. तिनं स्वत:ला धरणीच्या पोटात लोटून दिलं. पद्मिनीनं निरपराधी असूनसुद्धा स्वत:ला जाळून घेतलं. त्या जातीची आहे शीला.

**सुधीर** : त्या जातीचे तुम्ही स्वत: आहात सर – अती हळवे. पण शीला जिवाचं रान करीत आहे तुमच्या विजयासाठी. तुमची ही बदनामी ऐकून स्वत: खेद करीत बसण्याइतकी आत्मकेंद्रित ती नाही. तिला रामरावाचा आणखीच राग येईल आणि तुमच्या बाजूनं ती नक्कीच साक्ष देईल. सर, रामरावाच्या पापांचा घडा भरला आहे. त्याचं पुरेपूर प्रायश्चित्त त्याच्या पदरात घातलंच पाहिजे. तुम्ही फक्त 'हो' म्हणा, सर. मी विचारतो शीलाला.

**शहाणे** : नको, नको, सुधीर. अरे, केशवसुतांसारख्या कवीला बायकांबाबत बोललेलंदेखील खपत नसे. अरे, स्त्रियांची मनं म्हणजे शिरीषाची फुलं. श्वासानंसुद्धा कोमेजावीत. पाहणाऱ्याच्या नजरेनंसुद्धा थरकापावीत. छे, छे, स्त्रियांची लाज राखण्यासाठी पुरुषांनी आपल्या बुद्धीची अन् पराक्रमाची शर्थ करावी की आपल्या वैयक्तिक राजकारणासाठी स्त्रियांची लाज खर्ची घालावी?

(इतक्यात दारात एक स्त्री येते. आधुनिकतम पोषाख. पांढऱ्या पारदर्शक साडीवर मोठाली बैलगाडीची चाके लालभडक रंगात विशिष्ट ठिकाणी येतील अशी रंगविली आहेत. बैलगाडीच्या चाकांच्या जोडीसारखी मोठी पर्स, कानात तशीच चाके, गळ्यात तसेच काहीतरी, कुंकूही तसेच! बांगड्याही तशाच! हातांच्या पंजांवरही मेंदीची चाकेच.)

**स्त्री** : नमस्ते! नमस्ते! मी सीता! रामरावांची सीता! आपणा सर्वांना रामरावांचे लाखलाख प्रणाम! मतदार देवो भव! रामनामाचा शिक्का मारताच दगडसुद्धा तरले आणि त्यावरून सर्वजण तरून गेले. विजयी झाले! रामरावांच्या खुणेवर आपणही शिक्का मारा आणि विजयी व्हा! रामाचा विजय हा लोकांचा विजय!

रामराज्य म्हणजेच लोकराज्य! लोकानुरंजानासाठी राम कोणतीही गोष्ट करायला राजी होता. लोकसेवेसाठीच आम्हीही कटिबद्ध आहोत. लोक जे जे मागतील ते ते आम्ही लोकांना खुशीने देऊ. आपण फक्त चक्रांवर आपला पक्का ठसा उठवा. बोला, मी आपल्याला काय देऊ? आपली कोणती सेवा करू? आपल्या काय मागण्या आहेत?

**सुधीर** : बाई, आमची एकच मागणी आहे -- आपण आपल्या अशोकवनात परत जा.

**स्त्री** : मी अ-शोक वनातच चालले आहे. पण आपण उगीच शोकवनात जाऊ नका हं! चक्रावरच शिक्का मारा! रामराम! 'रामराम' हं! (जाते.)

**सुधीर** : सर, पाहिलंत? आतातरी विचारू शीलाला?

**शहाणे** : अरे, आधी आहे कुठे शीला? आज दिवसभरात शीला दिसली नाही.नाटकाच्या प्रयोगाला गेली नाही. काहीतरी संकटांत असणार शीला.

**सुधीर** : मी येतो घेऊन शीलाला आणि विचारतो तुमच्यासमोरच. (जातो.)

**सुधीर (येत)**: सर, लोक म्हणतात, गावाबाहेरच्या मरीआईच्या माळावर ती पडली आहे.

**सर्वजण** : काय?

**सुधीर** : खूप गर्दी जमली आहे तिला पाहायला. तिचं पोट फाडलं आहे!

**सौ. शहाणे** : अगबाई! कुणी?

**सुधीर** : डॉक्टरनी.

**शहाणे** : काय? उत्तरीय तपासणी? सुधीर, लोक काय बोलत होते? तू काय पाहिलंस? सांग. सांग.

**सुधीर** : लोक म्हणत होते सर, ती विहिरीत पडली. पडली नाही. पाडली. पुरावाच नष्ट केला! साक्ष संपली! सर, लोक म्हणतात, तिचे ओठ फाटलेत, गालांतून रक्त आलंय, छातीचे लचके तुटलेत--

**शहाणे** : अरेरे! काय हे! काय हे! शीला... शीला... (मटकन खाली बसतात. तोंड झाकतात. हुंदके देतात. सौ. शहाणे त्यांना सावरायचा प्रयत्न करतात.)

**सुधीर** : बलात्कार! अत्याचार! खून! विटंबना! सर, मी चाललो. तुमचा आशीर्वाद द्या, सर. मी सूड उगवायला चाललो. तो रामराव मेलाच पाहिजे. सूड! सूड! सूड! (संतापाच्या भरात जे हातवारे करतो त्यांनी बँडेज सुटून लोंबते. रक्त वाहू लागते. भोवळ येऊन तो खाली पडतो.)

**नीता** : (धावत येत) सर, लौकर चला, सर. कार्यक्रम संपत आला. तुमच्या व्याख्यानाची वेळ आली. (घरातला प्रकार ध्यानात येऊन) अगबाई! काय हे! सुधीर! सुधीर-- (त्याला पाणी पाजते. बॅन्डेज बांधते.)

**शहाणे** : (शांत होण्याचा प्रयत्न करीत) सुधीर, जागा हो. शांत हो. आततायीपणा करू नकोस. हे राज्य कायद्याचं आहे. गुंडगिरीचं नाही. आणि कायदा गुंडांना यथायोग्य शासन केल्यावाचून राहणार नाही.

**सुधीर** : सर, कोर्टात कसं सिद्ध करणार सारं? आणि केव्हा करणार ते?

**शहाणे** : लोकशाहीचं व्रत घेतल्यावर धीर धरलाच पाहिजे, सुधीर.

**सुधीर** : माफ करा, सर. तुम्ही धर्मराजाचं तत्त्वज्ञान सांगत आहात.

**शहाणे** : अरे भगवान कृष्णानंसुद्धा वनवास, अज्ञातवास संपेपर्यंत धीरच धरला. अन् त्यानंतरसुद्धा धृतराष्ट्राच्या दरबारात दुर्योधनाच्या पापांचा पाढा वाचल्यावर मगच लढा दिला.

**नीता** : सर, मी थांबते इथं. मी नाही जाऊ देत याला कुठंही. तुम्ही पुढं व्हा, सर. उशीर झालाय.

**शहाणे** : खरं आहे. उशीर झालाय. भलताच उशीर झालाय. मानसिक आघाताच्या स्वार्थी कल्पनेत रंगलोय मी. तिकडे शीलाला केवढ्या यातना सहन कराव्या लागल्या असतील! चला. कर्तव्याला जागलं पाहिजे.

**सुधीर** : नीता, मी खरंच थांबतो इथं. तू सरांच्या बरोबर जा. त्यांच्याबरोबर कुणीतरी राहिलं पाहिजे.

**शहाणे** : नीता, तू नको येऊस माझ्याबरोबर. तुला पाहवणार नाही ते.

**नीता** : काय, सर?

**शहाणे** : (सौ. स) हे बघ, तू पहिल्याप्रथम शीलाच्या घरी जा. जाताना तिच्या घरच्या माणसांसाठी, मुलांसाठी, काहीतरी जेवणखाण

घेऊन जा. मी जातो–शीलाकडे–तिचा देह ताब्यात घ्यायला.

**नीता** : सर, मग व्याख्यान?

**शहाणे** : शीलाची पुढली व्यवस्था हे आपलं पहिलं कर्तव्य आहे, नीता. (जातात.)

**सुधीर** : नीता, व्याख्यानाच्या ठिकाणी तू जा आणि गाणी म्हण, व्याख्यान दे, काय हवं ते कर. प्रचार चालू राहिलाच पाहिजे. मला काही होत नाही, जा. पळ आधी. (तिला आग्रहाने पाठवतो, ती जाते.) बाई, एक काम होतं.

**सौ. शहाणे** : बोल ना.

**सुधीर** : बाई, पत्रकं छापून घेऊन येत होतो. पण त्या गुंडांनी मारामारीत सगळी विस्कटून, नासून टाकली. आणखी पत्रकं छापायला पाहिजेत. आणि छापण्याची ऑर्डर छापखान्यात लौकर दिली पाहिजे, बाई.

**सौ. शहाणे** : शीलाच्या घरी मी निघालेच आहे. वाटेत जाईन छापखान्यात.

**सुधीर** : छापखान्यात तुम्ही नका जाऊ, बाई.

**सौ. शहाणे** : का?

**सुधीर** : तो छापखानेवाला म्हणजे अगदी दगडधोंड्यांची विक्री करणारा पाषाण आहे.

**सौ. शहाणे** : का रे?

**सुधीर** : बाई, मी त्याला म्हटलं, थोडं थांब. आणखी पत्रकं छापून दे. सर निवडून येऊ देत. तुझे सगळे पैसे सव्याज फेडू. पण कसचं काय! एवढी पत्रकं छापली, प्रुफं त्यानंच वाचली, कॉपी त्यानंच पाहिली, पण त्याच्या मनावर ध्येयवादाचा एक ठिपका दिसेल तर शपथ. पैशासाठी पशूसारखा अंगावर आला माझ्या.

**सौ. शहाणे** : अरे, पण पैसे का नाही दिलेस?

**सुधीर** : बाई, सरांनी कोरा चेक लिहून दिला होता आणि उरली असेल ती रक्कम काढायला सांगितली होती. पण चेकप्रमाणंच खातंही कोरंच उरलंय, बाई.

**सौ. शहाणे** : पण पत्रकं छापलीच पाहिजेत. तू असं कर. या माझ्या बांगड्या घे. नाही म्हणू नकोस. टॅक्सी करून प्रथम बांगड्यांचे पैसे करून घे. तसाच दवाखान्यात जाऊन औषधंइंजेक्शनं घे.



मग टॅक्सीनंच त्या छापखानेवाल्याकडे जा. जा लौकर.

(सौ. शहाणे आत जातात. सुधीर बाहेर जाऊ लागतो.)

**गोडे** : (घाईने येत) अरे सुधीर, काय घाई आहे? काय गडबड? मी सरांचा प्रचार करीत तिकडे हिंडत होतो. इतक्यात तुझ्या मारामारीची, शीलाच्या अपघाताची, अशा चित्रविचित्र बातम्या कानांवर येऊ लागल्या. म्हटलं, केंद्रावर येऊनच चौकशी करावी. सांग, काय काय झालं?

**सुधीर** : तुम्हीच बाहेरून आलात, सर. तुम्हांलाच जास्त माहिती असेल. मला फक्त माझी कहाणी ठाऊक आहे. पण शीलाच्या कहाणीपुढं ती काहीच नाही. तिची हकीगत?

**गोडे** : मलासुद्धा अज्ञातच आहे.

**सुधीर** : मग आपण निघू या, सर.

**गोडे** : अरे, तू विश्रांती घे आणि बरा झाल्यावर दुप्पट कामं कर.

**सुधीर** : नाही, सर. मला काय झालंय? खूप कामं राहिलीत, सर.

**गोडे** : अरे ती कामं माझ्यावर सोपव.

**सुधीर** : तुमच्या कामांत भर कशाला?

**गोडे** : अरे, मला एक नवीनच अनुभव आलाय. काम करू लागलं की आणखी करावंसं वाटतं. आधी मला नाटक पाहण्याचं जाग्रणसुद्धा नको वाटायचं. पण आता कामापुढे रात्रसुद्धा कमीच वाटते. काम, काम, अखंड काम; मजा आहे! प्राचार्य शहाणे यांना विजयी केलंच पाहिजे! सत्याचा विजय झालाच पाहिजे! सांग, कोणती कामं आहेत?

**सुधीर** : ही उरलेली पत्रकं वाटायची आहेत. छापखान्यातून आणखी छापून आणायची आहेत आणि या बांगड्या मोडून त्यांचे पैसे फेडायचे आहेत.

**गोडे** : हात्तिच्या! एवढंच ना! कामं झालीच म्हणून समज. आण त्या बांगड्या इकडे, आणि ती पत्रकंपण. तू अगदी स्वस्थ राहा. किती लागलंय तुला!

**सुधीर** : काही विशेष नाही, सर.

**गोडे** : बघू. अरे बापरे! केवढं लागलंय रे हे! छे, छे, तू पूर्ण विश्रांती घेतली पाहिजेस.

**सुधीर** : जाऊ द्या, सर. त्याचं काय? वेळ वाया चाललाय हेच वाईट

वाटतंय मला.

**गोडे** : खरंच. फार वाईट झालं. तुझ्यासारख्या भल्या माणसाला मारणारा किती दुष्ट, नीच, राक्षसी असला पाहिजे. पण हा मार तुला कुणी आणि का दिलाय हे ठाऊक आहे का तुला?

**सुधीर** : रामरावांच्या गुंडांनी.

**गोडे** : छे, छे. तुला कल्पनाही येणार नाही इतक्या सफाईनं काम केलंय त्यांनी.

**सुधीर** : कुणी?

**गोडे** : प्रभाकरनं.

**सुधीर** : शक्य नाही सर, शक्य नाही!

**गोडे** : अशक्य आणि अतर्क्य वाटणाऱ्या गोष्टीच घडत असतात जगात.

**सुधीर** : कशावरून, सर?

**गोडे** : कॉलेजच्या निवडणुकीत तू प्रभाकरचा पराभव केला होतास ना?

**सुधीर** : पण त्यानं तो खुल्या दिलानं स्वीकारला होता.

**गोडे** : असं तू मानतोस. हा दिलखुलासपणा तुझा आहे. हुं:! निवडणुकीत तू त्याचा पराभव केलास. पण तुला फसवण्यात मात्र त्यानंच तुझा पराभव केलाय.

**सुधीर** : किती विचित्र आहे हे!

**गोडे** : आणखी ऐक. निवडणुकीत तू जिंकल्यापासून तुझी आणि नीताची घसट वाढत चाललीय. होय ना?

**सुधीर** : पण त्याचं काय, सर?

**गोडे** : 'आपण निवडणुकीत निवडून आलो असतो तर?' असं बोलताना त्याला ऐकलंय मी- - नीताच्या संदर्भात.

**सुधीर** : खरं?

**गोडे** : ज्यांनी तुला मारलं त्या गुंडांकडून कबुलीजबाब देऊ का तुझ्यापुढं?

**सुधीर** : नको सर. नको. आणखी पुढं काही ऐकायची इच्छा नाही माझी.

**गोडे** : पण सांगायची माझी इच्छा आहे. रागावू नकोस. पण नीट ध्यानात घे. आता तुझी काळजी तू यापुढे घेशीलच पण... पण



नीताचीही फार फार काळजी घेतली पाहिजे तुला.

**सुधीर** : सर!... नीता!

(सौ. शहाणे आतून डबा घेऊन येतात.)

**सौ. शहाणे** : तुझी दोघं आहात इथं? बरं झालं. (आतून शिऱ्याच्या बशा घेऊन येतात.)

**सुधीर** : नको बाई, यावेळी.

**सौ. शहाणे** : अरे, आता कामं व्याली. आपलं राहो; पण त्या कर्मांना खायला घातलं पाहिजे.

**गोडे** : सुधीर, खरं आहे बाई म्हणताहेत ते. खा आणि दुप्पट कामाची शक्ती मिळव. छे, छे, बाई, मला कशाला?

**सौ. शहाणे** : दुप्पट काम करायला. पण तुम्ही तर दुप्पट काम केलंच आहेत. मग दुप्पट घेतला पाहिजेत. सुधीर, हा डबा घेऊन मी शीलाकडे तिच्या मुलांकडे जाते हं. (पदराने हुंदका दाबीत जातात. सुधीर बशी तशीच ठेवून त्यांच्यामागे जाऊ लागतो. गोडे ती बशी ओढून घेतात!)

* *

## (प्रवेश दुसरा)

**स्थळ :** रामरावाची प्रचारमोहीम. मागे खूण बैलगाडी. एक नर्तिका दोन साथीदार.

**तुमच्यामागं धावून धावून जीव माझा दमला**
**काय येना दया तुम्हा राया जरा हात लावून पाहा पायाला**
**सख्या, बैलगाडीत बसवा मला ।।**
**तुमची कीर्ति ऐकुनी शर्थ करूनी मूर्ती पाहिली मनी**
**टाकिला जीवही ओवाळुनी**
**डोळं लागलं तुमच्या वाटेला अन् इकडं पायात काटा मोडला ।।**
**जडली प्रीती अती तुमच्यावरती करिते आरती**
**रती मी मदन तुम्ही किति गुणी**
**ठेवा धरून आवळून नाहीतर जाइन पडून**
**किती वेगात तुम्ही चालला ।।**
**परि सख्या, नजर माझ्यावरि, करा जरा तरि, करा घ्या करी**
**करिन मी जन्मभरी चाकरी**

घ्या हो मला उचलून जीव गेला उलून तुमच्या संगत काटा अंगी
फुलला ।।
पसरिते पदर, करा माझी कदर, राया प्रीती सुधर,
तुमच्यावाचून करमना खिनभर
आमचं लक्ष लक्ष तुमच्याकडं तुमचं कुणीकडं
इकडं तुमच्या चाकात पदर माझा गुंतला ।।
ही वाट उंच वाकडी गाडी धडधडी धक्के बसून होते चेंडू उडी
पाय माझा घसरू लागला चला पुढ्यात घेऊन मला
बैलगाडीत बसवा मला ।।

थोडा वेळ नाच होतो. मग पुढील गीत साभिनय सुरू होते. गुरू म्हणजे शहाण्यांची विदूषकी आवृत्ती आणि राजा म्हणजे रामराव.

कोण्या एका देशाच्या राजाची ही कथा
आवडेल आजही तुम्हाला म्हणून सांगतो आता
राजा रूपानं भरदार होता मोठा सुंदर
अख्ख्या जगातल्या नारी निवडून त्यानं जुळविला पदर
त्याला झाली योग्य काळी कन्या रूपगुणखानी
पाही तो वेडा होई हर्ष माईना मनी
राजानं केला विचार पोरीला शिकवीन शास्त्रे सगळी
आणि उभी करीन स्वयंवराला दिसेल जगावेगळी
असेल तिच्या तोडीचा कोणी जर राजकुमार
तर साऱ्या जगातून पारखून घेईन मगच जावई करणार
राजानं पिटली दवंडी आपल्या राज्यामधी
त्याची वार्ता पसरली सत्त्वर साऱ्या जगामधी
‘वेदशास्त्रेपुराणे चौसष्ट कला आणि साऱ्या विद्या
शिकविणारा असेल त्याला मढवीन सोन्यामोत्या’
आले गुरू कितीतरी त्यांची राजा परीक्षा करी
टिकले नाहीत पळभरी झाली फजितखोरी
अखेरी आला एक गुरू दिसण्यात चांगला
वागण्यात वाटला भला आणि खरा शिकलेला
राजानं पुढं जाऊन नमस्कार केला
तेव्हा गुरुमहाराज गर्वानं बोलला
‘राजा, विद्येमध्ये नाही माझ्याएवढा कोणी



तुझ्या कन्यारत्नाला पाडीन पैलू करीन जग वाखाणणी
शिकवीन शास्त्रे सगळी बाणवीन कला
पढवीन विद्या साऱ्या इहपरलोकांतल्या’
राजा झाला खूष दिली बांधून पाठशाळा
गुरूमहाराजांच्या साऱ्या इच्छा पुऱ्या केल्या
आधी कन्यारत्न छान त्यात वाढतं वय
घेऊ लागलं रूप हुरूपानं अभिनव
तिला लागली चटक ज्ञानाची आवडल्या कला
हर्षानं, तेजानं फुलू लागल्या तिच्या कला
नाद तिला शिकण्याचा नवे काही काही
कंटाळा कशाचा तिला मुळी आला नाही
अहोरात्र करू लागली नवानवा अभ्यास
झाली ज्ञानवेडी तिला लागला तोच ध्यास
शिकली अश्वारोहण जलतरण गिर्यारोहण
शिकली भालाफेक लढाई नाना रीती नर्तन
गाऊ लागली रागदारी दीपरागे ज्योती लावी
त्याच वाणीने कवित्व वाद करूनीही दावी
आधी राजाची पोर रूपाने सुंदर त्यात लाडकीही फार
केले होते शरीरसौंदर्यासाठी सारे उपचार
कमनीय तिचा बांधा करी मदनाला बाधा
तिच्या बोलण्या-चालण्यानं लागला फुलू दगडधोंडा
तिच्या ज्ञानचंद्राची झाली पुनव तसा गुरू झाला वेडा
शिष्येवर झाला फिदा तिला सोडवेना कदा
शेवटी बोलला बाळेला लाज सारूनी बाजूला
‘शिकविले सारे तुला पण राहिली एक कला
ती कला साऱ्या कलांचीही कला सर्वांहूनी श्रेष्ठ
तिनेच जग चाले तीच जगामधी ज्येष्ठ’
होती भोळी बाळा हौस तिला शिकण्याची
हट्ट धरून बसली म्हणे ‘मला शिकवा तीची’
गुरूने तिला शिकविली मग प्रेमकला
शृंगाराचे शास्त्र रतिमदनाची लीला
ती अजाण मुग्ध बाळा गुरूला मानणारी

**विश्वासानं श्रद्धेनं भावानं त्याचं ऐकणारी**
**त्यानं सांगितलं सारं ते ते तिनं केलं**
**ज्ञान तिच्या पोटामधी माईनासं झालं**
**शिकली होती कुंतीची कथा अनुभवाला आली**
**गुरूमहाराजांनी विद्या अशी फळाला आणिली**
**आला राग राजाला फार झाला लालेलाल**
**दिला हुकूम त्यानं 'ह्याला मारा करून हालहाल'**
**राजाची स्वप्नं होती कन्यास्वयंवराची**
**झाली धूळ स्वप्नांची त्या लाथ बसली खराची**
**राजा मोठा हुषार धूर्त मुत्सद्दी खबरदार**
**परी विश्वासला गुरूवर त्यानं फसला ठार**
**अशा गुरूवर कोणी नका विश्वास ठेवू**
**ज्ञानाचा तोरा मिरवून पाहती विश्वाला फसवू**
**फसू नका कोणी हीच आमची विनवणी**
**गुरू म्हणजे गुरू हेच खरे धरा ध्यानी**
**धरा चाबूक चांगला हाती बसा बैलगाडीमधी**
**गुरं जोडा गाडीला पक्की हाका गाडी जोरामंधी!**

नंतर घोषणा होतात–पुस्तकं फाटली, रद्दीत गेली; त्यांच्यांत घेऊन भेळ खाल्ली! लेखणी मोडली, चुलीत गेली; त्याच्यावर पेटवून बिडी ओढली! रामराव झिंदाबाद! शहाणे मुर्दाबाद!

* *

## (प्रवेश तिसरा)

रामरावाचे निवासस्थान. सत्यनारायणाची पूजा. रामरावाची प्रचारिका मीरा आतून धावत बाहेर येते.

**मीरा** : गोऽडेऽ
**गोडे** : (आतूनच धावत येत) काय गऽडे? (जवळ जातो.)
**मीरा** : हुं:! निवडणुकीचा निकाल लागल्यापासून असे वागताहात की जशी काही सगळ्यांवर आपलीच सत्ता आहे! निवडून आले–
**गोडे** : रामराव! याचाच अर्थ–आता मी होणार, प्रि–न्सि–पॉ–ल! प्राचार्य!



**मीरा** : तुम्ही आता 'शहाणे' होणार तर!
**गोडे** : अग, माझं नाव 'गोडे', 'वेडे' नाही.
**मीरा** : प्रेमवेडे आहातच की.
**गोडे** : (हसून) तेवढं मात्र खरं.
**मीरा** : होय ना? मग प्रेमशहाणे नाही ना होणार?
**गोडे** : आणि जरी मी झालो प्रेमशहाणा तरी तू आहेसच की मला प्रेमवेडा करायला.
**मीरा** : चला. तुम्हाला काय, शेवटी बायकोच आपली.
**गोडे** : आता तुझ्याच शब्दांत सांगायचं तर बायकोबाबत प्रेमशहाणा आणि तुझ्याबाबत प्रेमवेडा!
**मीरा** : म्हणजे दोघींनाही फसवणार तुम्ही. एकीला कळत, दुसरीला नकळत.
**गोडे** : मग? प्रिन्सिपॉल आहे ना मी! पण अशी रागवू नकोस गडे.
**मीरा** : हुं:! तुम्ही काय देणार मला? नुसतं प्रेम! तेसुद्धा पूर्ण नाही.
**गोडे** : हे पाहिलंस, तुझ्यासाठी काय आणलं आहे? अगदी पूर्णाकृती! एक नव्हे, दोन नव्हे, तीन नव्हे, चार! चार! चार!
**मीरा** : काय तरी? सांगा ना. दाखवा ना. द्या ना.

(गोडे मूठ झाकून ठेवतो. ती त्याच्या मागे लागते. तो तिला मूठ पकडू देतो पण सोडविण्यासाठी खटपट करायला लावतो. ती हातांनी खूप खटपट करते. मग तोंडाने चावते. तेव्हा हात सुटून खाली बांगड्या पडतात–सौ. शहाण्यांच्या!)

**मीरा** : अय्या! माझ्यासाठी! कित्ती छान!
**गोडे** : मग? तुझ्या सहवासाचा दिवस म्हणजे सोन्याचा दिवस! म्हणूनच...
**मीरा** : इश्श! काहीतरीच. मला नको.
**गोडे** : आता नको काय? अं? नको काय?
**मीरा** : (हसत) नकोच गडे.
**गोडे** : आतापर्यंत हो म्हणत गेलीस. आणि आताच नको काय?
**मीरा** : नाही. मला नाही बांगड्या आवडत.
**गोडे** : पण मला आवडतात ना!
**मीरा** : मग घाला तुम्हीच. नको मला. मला नाही घालता येत त्या हातांत. सवय नाही मला. जड होतात त्या.
**गोडे** : तुझे नुसते उघडे हातच छान दिसतात ग. अगदी सोन्यासारखे.

पण म्हणूनच...

**मीरा** : प्रेमवेडे म्हणता पण खरेच वेडे आहात.

**गोडे** : म्हणजे?

**मीरा** : हं. या बांगड्या घ्या आणि भरा- - - माझ्या हातांत.

**गोडे** : असं होय! ध्यानातच आलं नाही माझ्या.

**मीरा** : हे तुमचं प्रेम!

(गोडे हसून बांगड्या भरू लागतो. बांगड्या भरल्यावरही हात हातांतच ठेवतो. एवढ्यात रामराव येतो.)

**रामराव** : (खाकरून) हं, काय काय चाललंय गोडे- नव्हे, प्रिन्सिपॉल गोडेसाहेब?

**गोडे** : आपलं नेहमीचंच-काम चाललंय, साहेब.

(मीरा आत पळून जाते.)

**रामराव** : अस्सं! प्रिन्सिपॉल झालात! मुलींच्या मागे लागायचं हेच तुमचं प्रिन्सिपल वाटतं?

**गोडे** : प्रिन्सिपॉल झालो ही आपलीच कृपा, साहेब. पण प्रिन्सिपॉल म्हटला की, मुलींच्या मागे लागला; मग तो वेडा असो की शहाणा- अशी सर्वांची खात्री पटवत आणलीच आहे, साहेब. शीला आणि शहाणे यांच्यांत अनुप्रास जुळतो अशी बहुतेक सगळ्यांची खात्री पटवली.

**रामराव** : सगळ्यांची खात्री पटली तशी?

**गोडे** : म्हणजे तशी अगदी सगळ्यांची नाही.

**रामराव** : कुणाकुणाची नाही? का नाही? कशी नाही?

**गोडे** : शहाण्यांसारखा माणूस इतका वेडा असणं शक्य नाही, असं आमचं मत आहे, असं ते म्हणाले.

**रामराव** : कशावरून?

**गोडे** : स्वत:वरून, साहेब. म्हणजे असं की काही माणसं तरी चांगली असतातच असं त्यांना वाटतं-स्व:वरून!

**रामराव** : एवढा त्यांचा विश्वास आहे स्वत:वर? या जगात? की त्यांनी दुसऱ्यावरही विश्वास टाकावा? कोण आहेत हे हरामखोर? नालायक...

**गोडे** : (घाबरत) साहेब, आपण ज्या ज्या व्यक्तींची मुद्दाम खात्री पटवायला सांगितली होती त्याच व्यक्ती आहेत ह्या.



**रामराव** : सांगा लौकर कोण त्या.

**गोडे** : पोलिस इन्स्पेक्टर, पोस्टमास्तर, आणि ट्रॅन्सपोर्ट मॅनेजर, साहेब.

**रामराव** : म्हणजे जबाबदार माणसं आहेत!

**गोडे** : आपण फारच जबाबदार आहोत, असा भ्रम आहे त्यांचा.

**रामराव** : छे छे! हा भ्रमाचा भोपळा फोडलाच पाहिजे. आणि गोडे, हीच माणसं अजून सत्यनारायणाला आली नाहीत! आमच्याकडच्या सत्यनारायणाला न येण्याची यांची हिंमत?

**गोडे** : इतक्यात नाहीतच येणार ते. मुद्दाम सावकाशीनंच बोलावलं आहे त्यांना.

**रामराव** : त्यांना तुम्ही आमच्या भेटी नेऊन दिल्यात ना? त्यांच्याशी संपर्क साधलात ना? अजून ही मंडळी आपली झाली नाहीत? प्रिन्सिपॉल गोडे, तुम्ही हे काम करू शकत नाही तर प्रिन्सिपॉल कसे होणार?

**गोडे** : साहेब, आपण सांगितलंत त्यात माझी बुद्धिमत्ता मिसळून सगळं केलं. पण हे देव प्रसन्न होणं कठीण दिसतं.

**रामराव** : सगळे देव प्रसन्न होतात, गोडेसाहेब. नारळ, कोंबडी, बकरा.

**गोडे** : नव्हे, बकरी!

**रामराव** : ठीक. पण कोणती?

**गोडे** : ती काय आत आहे ती.

**रामराव** : ती? म्हणजे आमचं ताट हे देवच खाणार?

**गोडे** : देव खात नाहीत, साहेब.

**रामराव** : म्हणजे?

**गोडे** : देवांना फक्त नैवेद्य दाखवायचा. सुंदर, रसरशीत, भरगच्च! आणि मग प्रसाद आपणच खायचा.

**रामराव** : पण हे देव नुसत्या दर्शनावरच संतुष्ट कसे होणार?

**गोडे** : या सगळ्या देवांना इंद्रपदाला पोचवू या आपण. ही आधुनिक अहिल्या आहेच तयार. या देवांना आपण इंद्र आहोत असा साक्षात्कार झाला आणि तो त्यांचा साक्षात्कार जाहीर झाला, की झालं आपलं काम! त्यांना मग भगं पडतीलच आणि त्यांतून त्यांचं तेज वाहून जाईलच.

**रामराव** : गोडेसाहेब, प्रिन्सिपॉलच्या जागेला तुम्ही लायक दिसता!

**गोडे** : साहेब, कोणतंही काम सांगा. करून दाखवतो. तुम्ही सांगितल्याप्रमाणं शीलाला वाटेला लावली. शहाण्याची प्रचारपत्रकं पळवली, त्याच्या शिष्यांतच भांडणं जुंपवून दिली. शेवटी तो पडलाच की नाही!

**रामराव** : शाब्बास, गोडेसाहेब. तुम्ही आदर्श प्रिन्सिपॉल होणार. पण ही तर सुरुवात आहे.

**गोडे** : तुम्ही कामं सांगा. करून दाखवतो. तुम्ही राम, मी हनुमान. तुम्ही श्रीकृष्ण, मी अर्जुन.

**रामराव** : मग ऐका तर माझी योजना. या शहाण्याचा काटा मोडला; पण पुरता निघाला नाही. तो समूळ निघाला पाहिजे. नाही तर काट्याचा नायटा व्हायचा. पोलिस इन्स्पेक्टर, पोस्टमास्तर आणि ट्रॅन्सपोर्ट मॅनेजर हे तीन 'पो' घाण करतील. ते सारवून टाकले पाहिजेत. असे की शहाणे त्यांच्याकडे गेला की, घसरून पडलाच पाहिजे खोल खड्ड्यात; आणि मग अशी धूळफेक केली पाहिजे की तो पुरा गाडला गेला पाहिजे. मग तुम्ही आम्ही मोकळे झालो धर्माचा प्रचार करायला! मानवतेची सेवा करायला! विश्वाचं कल्याण करायला! आधी सत्ता, मग धर्म. धर्म सांगायचा तर सत्ता हवीच. आणि धर्म सांगितला की सत्ता पवित्र होतेच. मोठा धर्म मोठ्या प्रमाणात सांगायचा तर सत्ताही मोठीच हवी आणि त्या सत्तेचा बळीही मोठाच हवा. नियमच आहे निसर्गाचा! शहाण्याची मला कीव येते. वाईटसुद्धा वाटतं. पण आपणहून धोंडा पाडून घेतलाय त्यानं आपल्याच पायावर. त्याला आपण काय करणार?

**गोडे** : तुमचं म्हणणं खरं आहे, साहेब. शहाणे समोर नसले म्हणजे लोक तुमच्याच तोंडाकडे पाहणार.

**रामराव** : तुमचाच जास्त फायदा आहे, प्रिन्सिपॉल गोडेसाहेब. शहाणे समोर असेल तर तुमच्याकडे प्रिन्सिपॉल म्हणून कोण पाहील या जगात?

(घंटा वाजते. दारात तीन लोक उपस्थित होतात.)

**गोडे** : (पुढे होत) नमस्कार, नमस्कार. या. या. असे या साहेब, पोलिस इन्स्पेक्टर देसाईसाहेब.

**रामराव** : नमस्कार इन्स्पेक्टरसाहेब.



**गोडे** : पोस्टमास्तर कुलकर्णीसाहेब.

**रामराव** : नमस्कार पोस्टमास्तरसाहेब.

**गोडे** : ट्रॅन्स्पोर्ट मॅनेजर सामन्तसाहेब.

**रामराव** : नमस्कार मॅनेजरसाहेब. या. या. या. बसा. अलभ्य लाभ! अलभ्य लाभ!

**इन्स्पेक्टर** : लाभ तुमचा आम्हांला, साहेब. अभिनंदन! (पुष्पहार घालतो.)

**पोस्टमास्तर** : छान झालं आपण निवडून आलात! (पुष्पगुच्छ देतो.)

**मॅनेजर** : सगळ्या गावाच्या गर्वाची गोष्ट आहे ही.–आता आमच्या गावातून मंत्री होणार! (पेढ्यांची बॉक्स देतो.)

**रामराव** : (गळ्यात हार, दोन्ही हातांत पुष्पगुच्छ आणि पेढे) एवढा सत्कार कशाला साहेब? आपण मोठी माणसं. आपल्या पुण्याईनंच आम्ही निवडून आलो. आम्ही विनम्र सेवक आपले! (हस्तिदंती होते.) गोडेसाहेब, सत्यनारायणाचा प्रसाद आणायला सांगा. आपलं राज्य निधर्मी. पण सत्यनारायण केला पाहिजे. काय? कारण राज्याचं ब्रीद आहे ना– सत्यमेव जयते! सत्य! सत्याचा विजय झालाच पाहिजे!

**पोस्टमास्तर** : विजय आपलाच आहे, साहेब.

**रामराव** : आपलीच कृपा, साहेब.

(इतक्यात मीरा–जिने अत्यंत नखरेल केशभूषा आणि गुलाबी मॅचिंग वेषभूषा केली आहे–येऊन प्रत्येकाच्या हातात एकेक डिश देते.)

**मॅनेजर** : छे, छे. हे फार झालं, साहेब.

**रामराव** : प्रसाद साहेब, प्रसाद. सत्यनारायणाचा! लोकशाहीचा! जनतादेवीचा!

(प्रकाश मंद गुलाबी होतो. पाश्चात्त्य धर्तीचे संगीत हळूहळू वातावरण भारून टाकते. मीराच्या चालण्यात पाश्चात्त्य नृत्याची लय आहे! ती सर्वांच्या अंगाला अत्तर लावते. त्यांच्या कोटांवर गुलाबाची फुले खोवते. नंतर सर्वांना गडद गुलाबी रंगाचे पेय देते.)

**इन्स्पेक्टर** : माफ करा, साहेब. मी घेत नाही.

**रामराव** : सरकारमान्य प्रमाण, साहेब. जादा नाही. मीरा, साहेबांना आणखी दे. त्या साहेबांना दे. त्या साहेबांनापण दे. अहो, दिवसभर राबायचं. मग हा विरंगुळा हवाच. अगदी दिलखुलासपणानं घ्या.

बी ॲट ईज. बी कंफर्टेबल.

**गोडे** : बी ॲट होम. सर!

**रामराव** : उद्या पुन: जबाबदारीनं कामं करायची असली तर आत्ता श्रमपरिहार हवाच. मीरा, आणखी पेय आण. थोडं थोडं, साहेब. ही मीरा मोठी छान छोकरी आहे. एका विख्यात विलायती विमान कंपनीत कामाला होती अस्मानपरी म्हणून! मी इंपोर्ट केली तिला. म्हटलं, देशांतील माल देशातच राहिला पाहिजे. अनुभव खूप आहे तिचा– वय लहान असलं तरी. सगळ्या प्रकारच्या बड्या बड्या लोकांशी कसं वागायचं चांगलं ठाऊक आहे तिला. मलासुद्धा तिचा फार उपयोग होतो माझ्या खाजगी कामांत सर्व प्रकारच्या. घ्या साहेब, घ्या. नका म्हणू नका. घ्या हो. मी मंत्री झालो की, प्रथम तुम्हा लोकांचे पगार वाढवणार आहे. तुमच्या तर बढतीच करणार आहे. हाय लिव्हिंग आणि हाय थिंकिंग–उच्च राहणी, उच्च विचारसरणी, हे आपलं ध्येय आहे बघा. तुमच्यासारखे मित्र मला हवेत नेहमी हाताशी. मीरा, इकडे बघ. सगळेजण हातांत हात घालून काम करू या. प्रॉमिस. जिकडे तिकडे प्रगतीच प्रगती करून देऊ या. बस्स! हिंदुस्थानची कशी अमेरिका झाली पाहिजे! स्टेटस्! आबादी आबाद! आलिशान मोटारी! लांबरुंद सरळ कडक रस्ते! पॉश हॉटेल्स! ग्रँड थिएटर्स! रोमँटिक नाइट क्लब्स! आहाहा! अहो, असं केलं म्हणजेच टूरिस्टस् येतील सगळ्या जगातून आपल्याकडे. काय? मी हेच खातं घेणार आहे. प्रथम जगात दौरा काढणार आहे. काढलाच पाहिजे, काय? आणि मग आपल्या प्रिय भारतात अगदी आधुनिक सुधारणा करणार! काय, कशी वाटते माझी कल्पना? देणार ना साथ मला? अहो, कित्येक देश नुसते टूरिस्ट लोकांच्या पैशावर चैन करतात. कित्येक गावंच्या गावं केवळ टूरिस्ट लोकांसाठी वसवली गेली आहेत. कित्येक कुटुंबांनी आपली घरं हॉटेलांत रूपान्तरित केली आहेत. टूरिस्ट लोकांना हवं ते देऊन टाकायचं; आपणही मजा मारायची! ते खूष, आपण खूष! सर्वेऽत्र सुखिन: सन्तु! काय? मीरा, साहेबांना दे, आणखी, आणखी.

('बस्स!' 'पुरे'! 'खूप झाली!' म्हणत तिघे पाहुणे कसेबसे उभे राहतात. मीरा बाटली घेऊन मधे येते. इतक्यांत एकदम वीज जाते. पूर्ण काळोख होतो.)



**रामराव** : थांबा आपण. आराम करा. गोडेसाहेब, फोन करा बरं वीज कंपनीला.

**गोडे** : (जरा वेळाने) साहेब, वीज कंपनी म्हणते, तास दोन तास तरी वीज मिळायला लागणार. काहीतरी घातपाताचा संशय येतो! आपल्या विरोधी लोकांनीच तारा तोडल्या असणार. समाजकंटक कुठले!

**मीरा** : अगंबाई! घातपात? गुंड? इथं तर येणार नाहीत? मला भीती वाटते हो. काय करू? बाई बाई बाई! (जोराने चुंबन घेतल्याचा आवाज) अहो, नको, नको, (दबलेल्या आवाजात) मला संभाळा हो... सोडा, सोडा मला! (पुन: चुंबनाचा आवाज) मला वाचवा हो! (पुन: चुंबनाचा आवाज.)

(इतक्यात दिवे येतात. रामराव आणि गोडे दोन टोकांना उभे आहेत. मध्यभागी तिघे पाहुणे. समोर मीरा खाली पडलेली आहे. टीपॉयवर बाटली आणि पलीकडून मीराचे डोके–केस विखुरलेले–आणि पाय दिसतात. तिचे वेगवेगळे कपडे त्या तिघांच्या अंगावर आहेत! गोडे पुढे होऊन ते कपडे घेऊन खाली पडलेल्या मीराच्या अंगावर टाकतो. ते तिघे गडबडतात. चोरून एकमेकांकडे पाहतात आणि नजरा फिरवून मागे पाहतात. मागे दारात शहाणे उभे आहेत! मीरा अंगाभोवती कपडे कसेबसे लपेटून आत पळून जाते.)

**शहाणे** : अभिनंदन! अभिनंदन!! रावसाहेब, आपण निवडून आलात. लोकशाहीचा कौल आपल्या बाजूला पडला. मानतो मी– खुल्या दिलानं आणि आनंदानं! अवेळी आलो खरं; पण आपल्यासारख्या थोर लोकनेत्याकडे जायला कोणतीही वेळ मुहूर्तच म्हणून माझी क्षुद्र कामं संपताच आलो. चुकलं असेल तर क्षमस्व! रावसाहेब, शीलाताईंच्या मुलांसाठी मदत मागायला आलो. मला शक्य नाही म्हणून.

**गोडे** : सगळी मुलं रावसाहेबांचीच. म्हणजे रावसाहेबांना सगळीच मुलं प्रिय आहेत. मुलं आणि फुलं त्यांना फार आवडतात.

**शहाणे** : पण शीलाताईंची मुलं आता आपल्या कृपेनंच मोठी होणार! येतो आता. नमस्कार! (जातात.)

**रामराव** : अरेरे! शीला गेली. किती वाईट झालं. आता तिच्या कच्च्या–बच्च्यांकडे कोण पाहणार! शीला नावाप्रमाणेच

शीलवान होती. पण तिला कलंक लागला. तिनं जीव दिला. हा संभावित शहाणे. याची इतकी कुलंगडी मला माहीत आहेत. पण मी एक कुणाला सांगत नाही. हा मात्र माझ्यावर कुभांड रचतो. मला बदनाम करतो. जसं काही मला बदनाम केल्यानं शीला जिवंत होणार आहे! हरहर! शीलाताई गेल्याच्या दु:खावर हे आणखी डाग! हे जखमेवर तिखट! छे! छे! परमेश्वरा! परमेश्वरा! (बेशुद्ध पडतो.)

**गोडे** : (पाणी शिंपडून वारा घालीत) हा तोंडाळ व्याख्यानबाज शहाणा आता जगभर काय बोंब मारणार कुणास ठाऊक! त्याचं तोंड कोण धरणार?

**इन्स्पेक्टर** : आपण धरू.

**पोस्टमास्तर व मॅनेजर** : हो, हो. आपण धरू.

**गोडे** : अहो, शीला इथं कामाला होती, पण दिवसा. आमच्या या प्राचार्यांच्या घरी मात्र ती केव्हा असायची अन् किती वेळ असायची, विचारू नका. मी जेव्हा जेव्हा तिथं गेलो तेव्हा तेव्हा ती तिथं ठेवलेलीच. तिचा नवरा पंगू आणि त्यांची बायको नेहमी घराबाहेर–महिला मंडळांत आणि समाजसेवेत! आणि आमचे हे प्राचार्य मुलामुलींना जवळ करण्यात पटाईत. घरी बोलावीत आणि नाटकं शिकवीत–अभ्यास नव्हे, अभिनय! निवडणुकीच्या निमित्तानं तर नाटकं भलतीच रंगली आणि शीलाला त्यांनी गळ्याभोवती ओढून घेतलं. हा पाहा फोटो अस्सल आहे की नाही ते. साक्षीदार देतो हवेत तर!

**इन्स्पेक्टर** : अस्सं!

**मॅनेजर** : कमाल आहे बुवा!

**पोस्टमास्तर** : करून सवरून नामानिराळा!

**गोडे** : शेवटी व्हायचं तेच झालं. गोष्टी अक्षरश: वाढीस लागल्या आणि त्यांचा निकाल शेवटी बिचाऱ्या शीलाच्या मृत्यूनं लागला. कुणाला माहीत, आत्महत्या की खून? छे, छे, रामरावसाहेबांसारख्या निष्पाप लोकसेवकाला मात्र फुकट बदनामीला तोंड द्यावं लागत आहे. पाहा ना, बदनामीच्या कल्पनेनंच किती वाईट वाटतं त्यांना! पण काय करणार?



**पोस्टमास्तर** : आपण काळजी करू नका. आम्ही आपल्याच बाजूला आहोत.

**मॅनेजर** : आम्ही शहाण्याला शह देतो.

**इन्स्पेक्टर** : शहाण्याला शहच काय, शिक्षाच व्हायला पाहिजे चांगली जबरदस्त.

**गोडे** : चला. आपण डॉक्टरना घेऊन येऊ. सरकारी डॉक्टरच आणू या. त्यांनाही वस्तुस्थिती पटवून देऊ या. अहो, मानसिक धक्का हा. डॉक्टरांनाही पूर्ण कल्पना दिली पाहिजे.

**सर्वजण** : हो हो. हो हो.

**गोडे** : नर्स––

**पोस्टमास्तर** : नर्स कोण?

**गोडे** : पाहा ना. (मीरा परिचारिकेच्या पांढऱ्या शुभ्र वेषात येते.) नर्स कम सेक्रेटरी. काम फार पडतं ना! म्हणून नर्सही काळजी घ्यायला हवीच. दुसरं कोण आहे त्यांना? नर्स, रामरावांची चांगली काळजी घ्या. त्यांना वारा घाला. जरा कपडे सैल करा त्यांचे. आम्ही डॉक्टरांना घेऊन येतो. चला साहेब, आपली गाडी काढा. इन्स्पेक्टरसाहेब, आपल्याला सांगायला नकोच, पण जरा शहाण्यांवर लक्ष ठेवा घातपात सुरू झालाय म्हणून म्हणतो. मास्तर साहेब, आपण त्यांची डाक घेत चला. पाहत चला– शहाण्यांचा कट कसा असेल आणि आपल्यांपैकी कुणाकुणावर त्यांचा दात असेल कुणास ठाऊक. आणि मॅनेजरसाहेब, आपण तूर्त शहाण्यांना परगावी पळून जाऊ देऊ नका बसमधून. नाहीतर शीलाच्या पाठोपाठ आपल्याला वर पाठवून हे पसार व्हायचे. चला. उशीर झाला. निघू या लौकर. (सर्वजण जातात.)

**रामराव** : (मीरास) गेले का सगळे? च्युते साले! मूर्ख बेवकूफ! ऐकलंस का सगळं? छान! मजा आहे की नाही? शाब्बास! झक्क काम केलंस! स्त्री म्हणजे आदिशक्ती, महामाया! राजकारणावरूनच हा वेदान्त सुचला असावा लोकांना! तुला पुरेपूर मोबदला देऊ आम्ही. पण फार थकवा आलाय हे नाटक करून आणि या नालायकांशी, ओंगळ लोकांशी बोलून. आता फक्त तूच हवीस. नुसती तूच. आण, आण तो पेला भरभरून. (ती पेला आणते. तो एक घोट घेतो. मग तिच्या तोंडाला लावतो. तिला ठसका लागतो. तो हसतो आणि उरलेला पेला तिच्या उजव्या खांद्यावरून डाव्या खांद्यावर ओतत रिकामा करतो!)

* *

# ३

## (प्रवेश पहिला)

(शहाण्यांचे घर. घरातले लाकडी सामान गोळा करून मधेच रचून ठेवलेले दिसते. भांडीकुंडी भरलेली दोन पोतीही तिथेच आहेत. शहाणे आणि एक व्यापारी. गडदकडक काळ्यानिळ्या वुलन सुटात चिरूट ओढीत 'प्राचार्य' गोडे आणि उंची साडीत नटव्या थाटात सौ. गोडे येतात.)

**गोडे** : शुभ प्रभात, सर. येऊ का?

**शहाणे** : नमस्कार. नमस्कार. या, सर. या, वहिनी. कॉलेजचं नाव काढलं आणि तुम्ही आलात. सुयोगच म्हणायचा.

**गोडे** : सारं सामान एकत्र केलं आहेत. घराचा रंग पालटायचा विचार दिसतोय?

**शहाणे** : रंग सुचायची वेळ नाही ही, गोडे सर. घर धुवून काढायचा मात्र विचार आहे. हं शेटजी, द्या काय द्यायचंय ते.

**गोडे** : म्हणजे सर, तुम्ही हे सारं फुकून टाकत आहात? का? कशाला? अरेरे!

**शहाणे** : निवडणुकीचा खेळ खेळलो. त्याची ही किंमत.

**गोडे** : सामान बाहेर काढू नका, सर.

**शहाणे** : मग?

**गोडे** : थोडा वेळ तुम्ही बाहेर पडा आणि माझ्याबरोबर चला.

**शहाणे** : कुठे?

**गोडे** : साहेबांच्याकडे! आपल्या रामरावसाहेबांच्याकडे.

**शहाणे** : शेटजी, सामान घेऊन चला.

**गोडे** : सर, मी रामरावांच्याकडून आलोय.

**शहाणे** : तुम्ही त्यांच्याकडेच जा.

**गोडे** : तुम्हीही चला. त्यांनी मोठ्या मनानं बोलावलंय तुम्हाला.

**शहाणे** : शेटजी, सामान घेऊन चला.

**शेटजी** : (मोजून पैसे देऊन) हात लावा, मास्तर. (शेटजी खूष. शहाणे गंभीर. शेटजी जातो.)



**गोडे** : तुम्ही ठीक केलं नाहीत, सर. निवडणुकीत तुम्ही पडलात. तुम्हाला उठवायला रामरावांनी हात पुढे केला आहे. तो असा झिडकारू नका.

**शहाणे** : धन्यवाद! पण माझे हातपाय धड आहेत.

**गोडे** : पडलेल्या माणसाला आपण धड आहोत असंच वाटत असतं! पण एक्सरे काढून पाहावा लागतो, समजलात? आणि वेळीच इलाज केला नाही तर मरेपर्यंत दु:खच करायची पाळी येते.

**शहाणे** : गोडे सर, शरीर तपासण्याचे क्षकिरण बाहेर असतात. पण जीवन पाहण्याचा विवेक मनातच असतो. सर, मी काही आंधळा होऊन उभा राहिलो नव्हतो; आणि पडलो आहे तोही डोळसपणानंच. जीवनाच्या सर्वस्वाचा होम करूनच मला यज्ञकुंड पेटवायचं होतं. ते पेटलं नाही. पण माझी आहुतीही कमी पडली नाही. जीवनाची राखरांगोळी झाली हाच आनंद आहे माझा! या राखेतूनच निखारे फुलवीन पुन: मी.

**गोडे** : राखेतून निखारे फुलवणार? हुं:! हीच राख डोक्यात घालून आणि अंगाला फासून जावं लागेल तुम्हांला-- बायकापोरांसकट!

**शहाणे** : दैव सांगेल तर तेही केलं पाहिजे! बघू दे दैवाची वाट मला. मला धीर आहे.

**गोडे** : वाट कुठं पाहता, सर? दैव तुमच्यासमोर दत्त म्हणून उभं आहे. दैवाची चेष्टा करू नका. दैवाचे आघात झाल्यावरच कळत असतात आणि मग निघून गेलेली गोष्ट कशानंही फिरून येत नाही.

**शहाणे** : दैवाला करायचं असेल ते दैव करील. मला करायचं आहे ते मी करीन.

**गोडे** : चुकताहात तुम्ही, सर. तुमच्या मनाला वाटेल ते करायला तुम्ही मोकळे नाही आहात. तुमच्या हातांनी तुम्ही दुर्दैवाला आमंत्रण दिलंत. पण दैव तुमचं दार ठोठावत असूनसुद्धा अजून त्याची चाहूलदेखील तुम्हांला लागत नाही.

**शहाणे** : काय बोलताहात, गोडे सर?

**गोडे** : प्रि-न्सि-पॉ-ल गोडे सर!

**शहाणे** : प्रिन्सिपॉल गोडेसर?

**गोडे** : येस्. येस्. प्रिन्सिपॉल गोडे सर! श्रीयुत शहाणे, तुम्ही आजारीपणाच्या रजेवर आहात. कॉलेजविश्वाची तुम्हाला गंधवार्ता नाही. इकडची दुनिया तिकडे झाली. तुमचा जमाना गेला! आता संस्थेचे अध्यक्ष आहेत रामरावसाहेब आणि प्राचार्य आहेत प्रिन्सिपॉल गोडे सर. तुमची आजारीपणाची रजा आत्तापासून संपली आणि तुमची नोकरीही संपली.

**शहाणे** : माझ्या संमतीशिवाय? माझ्यात दोष दाखविल्याशिवाय? माझ्यावर आरोप ठेवल्याशिवाय?

**गोडे** : श्रीयुत शहाणे, किती आरोप पाहिजेत तुम्हाला?

**शहाणे** : एक तरी--

**गोडे** : अनंत आहेत!

**शहाणे** : पुरावा?

**गोडे** : पुराव्याची मला काय आवश्यकता आहे? मी प्राचार्य आहे!

**शहाणे** : मीही प्राचार्य–

**गोडे** : होतात. माजी. मेलेला–खेळात बाद झालेल्या गड्याला मेलेलाच म्हणतात.

**शहाणे** : पण खेळातला मेलेला गडी जिवंत होऊ शकतो.

**गोडे** : होय. पण पडून हातपाय मोडला नसेल, तर. पाय मोडलेल्या घोड्याला तर गोळीच घालतात. नियमच आहे तो सर्कशीतल्या आणि रेसच्या खेळाचा. आणि जीवन म्हणजे बैठा नाहीतर मैदानी खेळ नाही आहे सर, नव्हे, श्रीयुत शहाणे, जीवन म्हणजे रेस आहे रेस. बाद झाला की, मेला! आपटला की आटपला!

**शहाणे** : आनंद वाटला सर, भरून पावलो. वा:! वा:! मी तर साधासुधा शहाणेच आहे. श्रीयुतसुद्धा नाहीच. पण तुम्ही मात्र प्राचार्य म्हणून चढलात, अंतर्बाह्य प्राचार्य झालात, निव्वळ प्राचार्य! आणि या पदावर आरूढ झाल्याबरोबर, विक्रमादित्याच्या सिंहासनावर चढल्याप्रमाणं तुमची वाणी जी काही फुलू लागली आहे! गोडे सर, भाग्यवंत मी–तुमचं हे रूपान्तर पाहतो आहे! शाब्बास! पण सन्माननीय, आदरणीय, परमपूज्य प्राचार्य गोडे सर साहेब, मंत्र म्हटल्याशिवाय माझा बळी घेता यायचा नाही तुम्हांला. सांगा–कोणते आरोप ठेवलेत माझ्यावर, लोकांच्या तोंडावर फेकण्यासाठी आणि स्वत:च्याही समाधानासाठी!

**गोडे** : हे आरोप काही मीच केलेले नाहीत. प्रचंड लोकमताचा पाठिंबा असलेले रामरावसाहेब आणि त्यांच्याबरोबर–

**शहाणे** : बरोबरच आहे. सत्य स्वत:च्या पायावर उभं राहू शकतं. पण असत्य जितकं मोठं तितके टेकूही जास्त.

**गोडे** : जास्त बोलताहात तुम्ही, सर.

**शहाणे** : तुम्ही आरोपांचे खिळे ठोकावेत आणि मी चकार शब्दही काढू नये? बाकी बरोबरच आहे! आपलं हत्यार कितीही बोथट असलं, आपला हात कितीही सावकाश चालत असला तरी मरणाऱ्यानं मात्र निमूटपणानं मरावं असंच वाटत असतं मारणाऱ्याला, नाही का?

**गोडे** : मला काय विचारता?

**शहाणे** : एवढंच नव्हे, तर त्या तोडून टाकलेल्या तोंडातूनसुद्धा मारेकऱ्याची– नव्हे, उपकारकर्त्याची–स्तुतिस्तोत्रंच बाहेर पडावीत अशीच अपेक्षा असते नाही त्या उपकारकर्त्याची?

**गोडे** : उगीच त्रास देत आहात तुम्ही, सर.

**शहाणे** : क्षमा मागतो मी तुमची. पण काय करणार हो? शेळी स्वत:ला कापून देऊन स्वत:च शिजवून देऊ शकत नाही! हं. टाका वाचून ते आरोप.

**गोडे** : वाच ग. नाही, मिसेस व्हाइस प्रिन्सिपॉल, प्लीज ती नोटीस वाचाल?

**शहाणे** : ओहो! असत्याला आणि अन्यायाला हा फॅशनेबल सौंदर्याचा पाठिंबा! लोकांना ताबडतोब पटलं असेल नाही सारं?

**गोडे** : मिस्टर शहाणे, तुम्ही बेकार बडबड करीत आहात. आम्ही दोघेही बिझी आहोत.

**शहाणे** : बिझी असणारच. अहो, खरा माल खपवायचा तरी खूपच उद्योग करावा लागतो. मग खोटा माल खपविण्यासाठी तर–

**गोडे** : मिसेस प्रिन्सिपॉल, नोटीस वाचा.

**शहाणे** : लवकर वाचा, वहिनी–सॉरी–मिसेस प्रिन्सिपॉल. अहो, वेळ म्हणजे पैसा. दुसऱ्याचं लुबाडलेलं आयुष्य तर सोन्याहून

पिवळं.

**गोडे** : मिस्टर शहाणे, महाविद्यालयाच्या कामात तुम्ही अडथळा आणणार असाल तर हीच नोटीस पोस्टानं पाठवू शकतो आम्ही. पण तुम्हालाच नोटिशीवर विचार करायला विलंब लागेल.

**शहाणे** : आणि तुमचा खोळंबा होईल प्राचार्य होण्याच्या कामात! वाचा मॅडम. लाजू नका. तुम्ही माझी विद्यार्थिनी होतात, नाही का? पण तुम्ही धर्मपत्नीही आहात. चुकलो, मिसेस प्रिन्सिपॉल आहात!

**मिसेस गोडे** : भारतीय ज्ञान आणि संस्कृती विस्तारक मंडळाची ही विशेष सभा, अध्यक्ष आणि नियामकमंडळाचे सर्व पदाधिकारी आणि प्रतिनिधी यांसहित एकमताने ठराव करीत आहे की, श्रीयुत शहाणे यांना महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावरील जबाबदारीतून ताबडतोब मुक्त करण्यात यावे. त्यांच्यावरील गंभीर आरोपांची दखल घेण्यात सभेला अत्यंत खेद होतो. त्यांच्यावरील एकूण एक आरोपांची नोंद करणे या सभेला शक्य नाही; परंतु महत्त्वाच्या काही आरोपांची मात्र नोंद केल्याशिवाय इलाज नाही. म्हणून मोठ्या कष्टाने पुढे काही निवडक आरोप मांडले आहेत. आरोप क्र. (१) श्री. शहाणे यांनी संस्थेने त्यांच्याकडे विश्वासाने सुपूर्त केलेल्या अधिकाराचा कमालीचा दुरुपयोग केलेला आहे. स्वत: आपल्या कामाच्या वेळात ते राजकारण खेळले. प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्यावर दबाव आणून त्यांनी त्यांची व त्यांच्या कुटुंबियांची मते मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे सर्व नोकरवर्गासच नव्हे तर अज्ञान विद्यार्थि-विद्यार्थिनींनासुद्धा प्रचारासाठी राबविण्याचा अत्यंत निंद्य प्रयत्न केला. आरोप क्र. (२) श्री. शहाणे यांची आमदनी पाहता त्यांना निवडणुकीचा खर्च कसा झेपला हे आश्चर्यच आहे. त्यांचा निवडणुकीचा खर्च प्रमाणाबाहेर बराच झाला असावा असा दाट संशय आहे; पण तो तपासण्याचे काम सरकारचे आहे. प्रस्तुत मुद्दा हा की संस्थेच्या प्रचंड आर्थिक व्यवहारातूनच श्री. शहाणे यांनी हा खर्च भागविला असला पाहिजे यांत शंका नाही. संस्थेचे हिशोब बनावट असून संस्थेची देणी देताना श्री. शहाणे यांनी खूपच हातचे राखले असले पाहिजेत. तसे लेखी कबुलीजबाब अनेक कॉन्ट्रॅक्टर्सनी आणि दुकानदारांनी दिलेले आहेत. आरोप क्र. (३) श्री. शहाणे हे प्राचार्य आणि प्राध्यापक या नात्यांनी तरुण विद्यार्थिनींना घरी बोलावून नेत आणि या तरुण विद्यार्थिनी त्यांच्याकडे वेळी अवेळी तासन्तास असत. निवडणुकीच्या काळात तर या तरुण मुली त्यांच्याबरोबर मध्यरात्रीनंतरसुद्धा असत. अनेक प्रौढ, सुसंस्कृत पालकांनी या प्रकारांविषयी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. श्री. शहाणे यांच्याबरोबर नेहमी काम करणाऱ्या एका तरुण विवाहित स्त्रीचा अत्यंत संशयास्पद अवस्थेत मृत्यू झाल्याने या घटनांचा कळस झाला आहे. श्री. शहाणे यांच्या पत्नी महिला मंडळाच्या आणि समाजसेवेच्या निमित्ताने बहुतेक वेळ घराबाहेरच असत हे बहुतेक मंडळींना चांगलेच ठाऊक आहे. स्वत:चे चारित्र्य अशा प्रकारचे असूनही श्री. शहाणे यांनी निवडणुकीच्या निमित्ताने संस्थेच्या आजी अध्यक्षांना नाहक बदनाम करण्याची एकही संधी सोडलेली नाही. हे सर्व प्रकार म्हणजे दखलपात्र गुन्हेच आहेत; आणि त्यांबाबत लोकशाही सरकार योग्य ती कारवाई करीलच. परंतु अशा संशयित चारित्र्याच्या माणसाला इतक्या जबाबदारीच्या पदावरून त्वरित दूर करणे एवढेच संस्थेच्या हातात आहे आणि संस्था तेवढेच करीत आहे.

**शहाणे** : बस्स! पुरे! पुरे! खूप झालं. खूप झालं! हरे राम! हरे राम! गोडेसर, बसा. बसा. आराम करा. बाई, आपणही बसा. मीही बसतो. बसतो.

**सौ. शहाणे** : बसा बाई. बसा भावजी. शिरा आणते करून. माझ्या हातचा शिरा तुम्हाला फार आवडतो, नाही? पण मागे दिलेल्या शिऱ्यात साखर तर कमी पडली नव्हती?

**गोडे** : शिरा जरूर करा, मिसेस शहाणे. कारण ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड! पण आधी या नोटिशीवर सही करा-नोटीस पोचल्याची नव्हे, ती कबूल असल्याची! सही करा, सर; आणि तह करा, म्हणजेच हे युद्ध थांबेल.

**शहाणे** : म्हणजे तुम्ही केलेली सगळी पापं माझ्या माथ्यावर घेऊन मी मरून जावं आणि तुम्हांला उजळ माथ्यानं पुन: पापं करायला रान मोकळं करून द्यावं?

**गोडे** : तुम्ही कशाला रान मोकळं करून द्यायला पाहिजे? सगळं रान आता आमचंच आहे. आणि तुम्हांला या रानात राहू द्यायचं की नाही तेही आमच्याच मर्जीवर आहे! म्हणूनच मुकाट्यानं सही करा.

**शहाणे** : या संपूर्ण खोट्या आरोपांवर? सर, गेली दहा वर्षं तुम्ही माझे निकटवर्ती सहकारी म्हणून राहिलात. मीच ठेवलं तुम्हांला. तुम्ही केलेल्या आरोपांतली एकही गोष्ट मी स्वप्नातसुद्धा केलेली नाही हे पक्कं ठाऊक आहे तुम्हांला. पण निदान तुम्हांला एवढं कसं कळलं नाही की, असल्या आरोपांवर मी कदापीही सही करणार नाही?

**गोडे** : तुम्ही आरोप नाकारू इच्छिता. चांगली गोष्ट. म्हणजे तुम्हांला जगायचं आहे–शक्य तितक्या मानानं. पण तुमच्या जगण्याचा हा एकच मार्ग आहे, सर. ही नोटीस तुमच्या स्वातंत्र्याची सनद आहे! हा तुमचा मॅग्नाचार्टा आहे!

**शहाणे** : बंद करा ही वटवट. अहो कर नाही त्याला डर कशाला? मी माझ्या प्राचार्यपदाचा चुकूनसुद्धा गैरवापर केलेला नाही. गुंडांपासून मुलींचं मी नेहमी रक्षणच केलं. पण कधी वाकड्या नजरेनं पाहिलं नाही. लाखालाखांच्या इमारती उभारल्या आणि लाखलाख रुपयांचं सामान भरलं; पण कधी कंत्राटदाराकडून कमिशन काढलं नाही की दुकानदाराकडून पैची लाच खाल्ली नाही. शेकडो लोकांना नोकऱ्या दिल्या पण लाचारीसुद्धा अपेक्षिली नाही.

**गोडे** : तुम्ही चुकलात, सर! –अजूनही चुकतच आहात!–

**शहाणे** : आणि पुढेही चुकणारच आहे! या 'चुकीच्या' मार्गातच माझं सुख आहे!

**गोडे** : काल्पनिक सुखाचा शोध थांबवून खऱ्याखुऱ्या सुखाचा भोग घ्या, सर. पुष्कळ महाजनांनी या पंथाचा स्वीकार केला आहे!

**शहाणे** : तुमच्याप्रमाणं?

**गोडे** : होय, आमच्याप्रमाणं. नेत्र, उपनेत्र असलेले सर्व प्राध्यापक माझ्याच मागे आहेत.



**शहाणे** : अहो त्या सर्वांचा मलाच पाठिंबा होता!

**गोडे** : तसाच तो आता मलाही आहे! मी प्राचार्य आहे!

**शहाणे** : आश्चर्य आहे! मी प्राचार्य असताना कुणालाही कधी नोकराप्रमाणं वागवलं नाही. सर्वांना जास्तीत जास्त सवलतीच दिल्या. त्यांची सर्वत्र शिफारस केली! प्रिन्सिपल गोडे सर, तुमचंसुद्धा मी करता येईल तितकं कल्याणच केलं. तुम्ही असं करालसं वाटलं नव्हतं.

**गोडे** : माझ्यावर तुम्हीच आरोप करता? आणि तोही कृतघ्नपणाचा? अहो, तुम्ही जगावं असंच मला वाटतं. म्हणूनच मी प्रिन्सिपॉल असूनसुद्धा खुद्द जातीनं इथं आलो. वेळ नसूनसुद्धा तुमच्या समजावण्या करीत राहिलो. आणि तुम्ही मुळीच लक्ष न देता माझ्यावरच आग पाखडीत राहिलात तरी विनवण्या करीत राहिलो की सही करा, सही करा–

**शहाणे** : हे आरोप पत्करा, तुरुंगात जा, मरा, आणि बायकोमुलांना कलंकित करा––

**गोडे** : म्हणजेच त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था रामरावसाहेब उदारपणानं करतील.

**शहाणे** : असली भीक मागून त्यांना जगवू?

**गोडे** : पराभूताला भीकच मागावी लागते दाती तृण धरून.

**शहाणे** : असल्या भिकेपेक्षा विष खाणं पत्करलं.

**गोडे** : विषाची गोष्ट तुम्हीच काढलीत, सर. आम्ही नाही. तुमची बायका–मुलं मरावीत असं आम्हांला वाटत नाही. ती जगावीत. तुम्हीसुद्धा जगावंत. आणि आम्हीही जगावं Live and let live. तुम्ही आम्हांला सुखानं जगू द्या. आम्हीही तुम्हांला सुखानं जगू देऊ.

**शहाणे** : असल्या सोद्यांशी अब्रूचा सौदा करून?

**गोडे** : सारं जीवन म्हणजे एक सौदाच आहे, सर. प्राप्त परिस्थिती पाहा आणि पदरात पडेल तेवढं पाडून घ्या. लक्षात घ्या सर, तुमच्या खोट्या अब्रूला आमच्याचकडून काय ती मागणी आहे! ती अशी डावलू नका. गरज आम्हांला आहे तशी गरज तुम्हांलाही आहे. आणि तुमची गरज मोठी आहे. तुम्हाला

बायकामुळं आहेत. आणि तुमच्याजवळ बहुमत नाही, पैसा नाही, पाठबळ नाही, नोकरी नाही, काही काही नाही. मोठेपणा समजा आमचा तुमच्याकडे सौदा करायला आलो. आम्ही देऊ केलेली सवलत तुम्ही अशी झिडकारणार असलात तरी काहीही बिघडत नाही आमचं. आम्हांला थोडी जास्त किंमत पडेल; पण तुम्ही जमीनदोस्त व्हाल. सरकारी अधिकाऱ्यांची, कायदेपंडितांची आणि कॉलेजातल्या विद्वान प्रोफेसरांची वाटेल तेवढी भाडोत्री फौज आहे आमच्यापाशी. तिच्याशी सामना देऊन दगडावर-नव्हे, सिमेंट काँक्रीटवर डोकं फोडून घेऊ नका-स्वत:चं आणि बायकापोरांचं.

**शहाणे** : तुमचा फौजफाटा मोठा आहे खरा. पण माझ्या पाठीशी जी एकच गोष्ट आहे ती तुमच्यापाशी मुळीसुद्धा नाही.

**गोडे** : सत्यच ना? (मोठ्याने हसतो.) सत्यमेव जयते! (पुन: हसतो.) मूर्ख आहात तुम्ही शहाणे. जगाला शिकवणारे प्राचार्य झालात. पण स्वत: जगातलं काहीच शिकला नाहीत.

**शहाणे** : आणि तुमच्याकडून तर काहीच शिकायची इच्छा नाही माझी. प्राचार्यपदासाठी इतके उतावीळ झाला आहात ना? मग जा तर. त्या खुर्चीवर जाऊन बसा. त्या खुर्चीवरून नवी पिढी घडवा; जगाला याच नव्या तत्त्वज्ञानाचे डोस पाजा; आणि सौजन्यमूर्ती, विद्यार्थिप्रिय विद्वान देवमाणूस म्हणून मिरवा. जा-जा-जा--

**सौ. शहाणे** : देवदूतासारखे दिसलात आणि यमदूताची कामगिरी केलीत! भावजी, असा काय गुन्हा केला होता आम्ही तुमचा? तुमच्यावर आम्ही प्रेम केलं नाही का हो?

**गोडे** : होय. केलंत. तुम्हांला गरज होती म्हणून.

**सौ. शहाणे** : गरज?

**शहाणे** : होय सुमित्रा, गरज! प्रेम करणं ही आपली गरजच होती! आता त्या गरजेपोटी जे जे उपजेल ते ते भोगलंच पाहिजे.

**गोडे** : तुम्ही फसलात म्हणून असं बोलाताहात, सर. पण अजूनदेखील सावरायचं तुम्ही नाकारत आहात तिथं मी तरी काय करू? मागे मी तुमच्या घरी येत होतो तसे तुम्ही माझ्या घरी या. पण वेळ टळण्यापूर्वीच या. नाहीतर गोष्टी अटळ होतील! गुड् बाय! चला, मिसेस् प्रिन्सिपॉल. (जातात.)



**शहाणे** : सुमित्रा, मी चुकलो, मी फसलो, मी हरलो, मी संपलो!

**सौ. शहाणे** : नका असं बोलू.

**शहाणे** : सुमित्रा, मला वाटलं होतं, वर उडी मारली अन् ती चुकली तर फांदी हाताला लागणार नाही, पण पायाखालची जमीन तर कुठे जाणार नाही! पण खाली खोल खणून ठेवलेल्या काळोखी खड्ड्यात पडलोय मी. हातपाय मोडून आणि आधारावाचून.

**सौ. शहाणे** : नका असला विचार करू. माझे हातपाय हलताहेत ना? मी करीन कुठेतरी नोकरी. तुम्ही स्वस्थच बसा.

**शहाणे** : स्वस्थ बसू?

**सौ. शहाणे** : हो. इतके दिवस श्रम केलेत. आता विश्रांती घ्या. आणि पुस्तकं लिहा. किती ग्रंथांच्या योजना आखल्या होत्या तुम्ही? किती विचार केला होता?

**शहाणे** : तुझे आणि मुलांचे हाल पाहताना लिहिण्यात मन कसं लागेल माझं?

**सौ. शहाणे** : ते काही तुम्ही मनात आणू नका. मी पाहीन स्वत:कडे आणि मुलांकडे. तुम्ही पाहा आपल्या विचारांकडे आणि पुस्तकांकडे. झाली वाटणी? उठा आता. आता काळजी करू नका, आणि प्रकृतीवर परिणाम होऊ देऊ नका.

**शहाणे** : सुमित्रा, किती शहाणी आहेस तू! ...किती वेडी आहेस तू! ...त्या खोट्या आरोपांमुळे मला वेडच लागलं असतं; पण तुझ्या खऱ्या प्रेमामुळंच मी सावरलो.

**सौ. शहाणे** : त्या खोट्या गोष्टींची आठवण कशाला काढता?

**शहाणे** : खोट्यानाट्या आरोपांचं दु:ख खऱ्याखुऱ्या जखमांपेक्षाही जास्त होतं. जखमासुद्धा लौकर बऱ्या होतात आणि खपल्या गळून पडतात. पण हे भलते सलते खोटे-नाटे आरोप--

**सौ. शहाणे** : तेसुद्धा गळून पडतील. चार पोटभरू लोक अर्थाचे दास झाले म्हणून काय झालं? पैसे खातील त्यांची मनं त्यांना खातील. तुमच्यावर प्रेम करणाऱ्यांचं संख्याबळ आज कमी पडलं म्हणून काय झालं? ते प्रेम खरं आहे ना? त्या प्रेमात सत्याचे, न्यायाचे अंकुर वाढत राहतील.

**शहाणे** : किती गोड बोलतेस तू? आणि मला म्हणतेस, पुस्तकं लिहा! खरं तर, तूच बोलत राहा, तूच लिहीत राहा! --पण मला नोकरी कुठंय? मी कुठं तुला स्वास्थ्य देऊ शकतोय?

**सौ. शहाणे** : हे काय? असं वाईट वाटून नाही घ्यायचं. मनाला लावून नाही घ्यायचं. शांत व्हा ना. अहो, माझे हे साधेसुधे शब्द तुम्हांला इतके सुंदर वाटले का? पण खरं सांगू, माझे शब्द म्हणजे तुमच्या लेखनांतल्या, तुमच्या व्याख्यानांतल्या शब्दांच्या नुसत्या सावल्या आहेत सावल्या.

**शहाणे** : असतील कदाचित. पण सावलीचा ओलावा मात्र निश्चित आहे तुझ्या बोलांत!

**सौ. शहाणे** : तुमच्या डोळ्यांत मात्र ओलावा नको. चला. आत जाऊ या. चला ना. ...ओलावा फार झाला. चहा घेऊ या.

('सर, येऊ का?' अशी हा ऐकू येते.)

**शहाणे** : या, या. कोण?

(सुधीर आणि नीता येतात.)

**सुधीर, नीता** : आम्हांला आशीर्वाद द्या, सर. (नमस्कार करतात.)

**शहाणे** : पुरे पुरे. अरे 'आशीर्वाद' काय? शुभेच्छा म्हणा. अगदी मनापासून. तुम्हा दोघांना. आम्हा दोघांकडून. छान! छान! चांगलं झालं! उत्तम झालं! मनाजोगं झालं!

**सुधीर** : सर, पण काय?

**शहाणे** : खरंच, काय?

**सुधीर** : (हसून) सर, काय ते कळल्यावाचूनच 'चांगलं झालं' म्हणालात? आम्ही काही वाईटसाईट केलं असलं तर?

**नीता** : काहीतरी काय बोलता हो? सरांचे विद्यार्थी आपण. वाईट काही करू का?

**सुधीर** : पण प्रेम केलंय ना?

**नीता** : ते वाईट? सर तर शिकवतात, 'खरा जो प्रीतिचा प्याला, जगी प्याला सुखी झाला!'

**शहाणे** : म्हणजे? तुम्ही प्यालात वाटतं?

**सौ. शहाणे** : प्यालात?

**सुधीर** : (चटकन) हो, सर. नाही, सर. म्हणजे थोडासा, सर. फार नाही, सर.



**नीता** : नाही हो सर. काही नाही. काही नाही. काही नाही.

**सुधीर** : काही नाही, काही नाही काय? हीच, सर, उतावीळ झाली होती.

**नीता** : छे हो, सर; हाच तळमळत होता. त्या कविता, ती पत्रं, त्या चिठ्ठ्या...

**सुधीर** : अगं पुरे, पुरे. काही नाही काही नाही म्हणतेस आणि सारं सांगतेस?

**नीता** : मग लोकाला का कुणाला सांगतेय? सरांना सांगतेय. त्यांनीच प्रेमकाव्य नाही का शिकवलं?

**शहाणे** : अरे पण मी फक्त थिअरी शिकवली. तुम्हीतर प्रॅक्टिकलसुद्धा केलंत.

**सुधीर** : प्रॅक्टिकल केलं नाही, सर–

**शहाणे** : म्हणजे?

**सुधीर** : नाही म्हणजे तशी फक्त सुरुवात झालीय.

**शहाणे** : मग आता पूर्ण करा. पूर्ण केल्यावाचून राहू नका हं.

**सुधीर** : पूर्ण करायचंय सर. पण मोठीच डिफिकल्टी उद्‌भवलीय, सर!

**शहाणे** : कसली डिफिकल्टी?

**सुधीर** : सर, हिमालय परवडला, ज्वालामुखीही चालेल, सप्त सागरसुद्धा मानवेल.

**शहाणे** : मग काय?

**नीता** : सर, हे वर्णन चाललंय माझ्या वडिलांचं.

**शहाणे** : (हसून) तुमचं प्रेम पक्कं आहे ना? मग त्या प्रेमाला काही होणार नाही.

**सुधीर** : प्रेमाला काही होणार नाही, सर. पण मला म्हणजे माझ्या देहाला काय होईल?

**नीता** : सर, हा म्हणतो ते खरंच आहे. माझे बाबा हिमालयासारखे कठीण, ज्वालामुखीसारखे तापट आणि समुद्रासारखे ओरडणारे आहेत.

**शहाणे** : काय हो, पण तुमच्या बाबांना माझ्यासारखेच म्हणजेच दोनच पाय आहेत ना?

**सुधीर** : हो. म्हणजे?

**शहाणे** : अरे, मुलीच्या बापाला दोन पाय का असतात?

**सुधीर, नीता :** का?

**शहाणे :** तुम्ही दोघांनी धरायला!

**सुधीर :** पण आम्ही त्यांच्या पायांवर पडलो आणि दोघांनी दोन्ही पाय घट्ट धरले तर लाथा बसणार नाहीत हे खरं, पण--

**शहाणे :** पण काय?

**सुधीर :** पण सर, त्यांचे दोन्ही हात रिकामेच राहतील. आणि त्यांचे हात! बापरे! खरोखरच 'बाप'रे! सर, त्यांच्या घरी गाई, बैल, म्हशी सगळी जनावरं आहेत; आणि अगदी नाठाळ लाथामारू जनावरसुद्धा बाबाजींची थप्पड बसली की गप्प बसतं. बाप रे! आणि सर, त्यांना दोन हात आहेत!

**शहाणे :** मग ते धरायला आम्ही दोघांनी यावं की काय?

**सुधीर :** एक्झॅक्टली सर. प्रश्नाशिवाय नेमकं उत्तर दिलंत, सर. तुम्ही आलात तरच होईल हे काम, सर.

**शहाणे :** काम नाही होणार.

**सुधीर व नीता :** मग?

**शहाणे :** 'कार्य' होईल! (सर्वजण हसतात.) मंगल कार्य! शुभस्य शीघ्रम्! करून टाकू. पण काय रे, तुम्हांला लग्नाची एवढी घाई का झाली?

**सुधीर :** तेच सांगायला आलो होतो, सर. म्हणजे खरा आशीर्वाद तुमचा घ्यायचा होता त्यासाठीच.

**नीता :** म्हणजे लग्नाची गोष्ट महत्त्वाची नव्हे?

**सुधीर :** बाई, बाई, बाई, घाबरी होऊ नकोस, तुला सोडून मी जात नाही बरं! सर, झालं काय, मला एका अमेरिकन विद्यापीठाची स्कॉलरशिप मिळाली---

**शहाणे :** होय का? छान! छान! अभिनंदन! आता कळून सवरून अभिनंदन करतोय बरं का! पण कुठे, केव्हा, कशी?

**सुधीर :** तेच मी प्रथम सांगणार होतो, सर. पण हिचा आग्रह...

**शहाणे :** तो पूर्ण झालाच. आणि लक्षात ठेव--(नीतास) तू ऐकू नकोस ग--बायकोचा आग्रह हा अगदी सूर्यमालेतल्या ग्रहापेक्षाही मोठा ग्रह. पहिल्या प्रथम त्याला वंदन करीत जा.

**सौ. शहाणे :** होय का?



**नीता :** माझाच एवढा आग्रह?

**सुधीर :** नाहीतर काय? सर, मी हिला सांगायला गेलो की मी अमेरिकन स्कॉलर झालो, आता मी अमेरिकेला जाणार... तर सर,...

**नीता :** सरळ सांगा की हो. ही वेडीवाकडी वळणं कशाला? अमेरिकेची वाट विमानाची. अगदी सरळ. सरळ सरळ सांगा पाहू.

**सुधीर :** पण अमेरिकेच्या वाटेत तुझा हा घाट आहे ना, गोलगोल, गोलाकार, वाटोळा, चक्राकार, वर्तुळांचा...

**नीता :** अरे, पुरे!

**सुधीर :** सर, मला वाटलं होतं, मी अमेरिकेला जातो असं म्हणताक्षणीच ही नाचायला लागेल, गायला लागेल--

**शहाणे :** मग? काय केलंन हिनं?

**नीता :** काही नाही हो सर.

**सुधीर :** काही नाही काय? सर, नाचण्यागाण्याऐवजी हिनं चक्क गळा काढला. ओक्साबोक्शी रडू लागली. हातपाय आपटू लागली.

**नीता :** नाही हो सर, इतकं काही हे नाही केलं मी.

**सुधीर :** इतकं नाही, म्हणजे तुला कबूल आहेच. सर, काय घाबरलो मी ही रडायला लागल्यावर!

**शहाणे :** अरे पुरुष घाबरतोच! बरोबरच आहे तुझं.

**सौ. शहाणे :** हो का?

**शहाणे :** अरे पण या रडण्याघाबरण्याच्या घाईत मुद्दा राहिलाच.

**सुधीर :** सर, तिच्या रडण्यातही बोलण्याचा मुद्दा राहिलाच! म्हटलं, आता ही भरती जाऊन ओहोटी होण्याची वाट पाहिलीच पाहिजे-निदान अर्धा तास! मानसशास्त्रीय सिद्धान्त आहे ना, भावनेची भरती अर्धा तास टिकते म्हणून!

**नीता :** म्हणजे? मी अर्धा तास अखंड रडले वाटतं?

**सुधीर :** अखंड नव्हे. खंडित खंडित. पण अर्ध्या तासानं काय होतंय सर, कितीतरी वेळ.

**नीता :** किती वेळ हो? क्षणभरसुद्धा नाही.

**सुधीर :** मला तो काळ युगायुगासारखा वाटला!

**शहाणे :** तुझा क्षण आणि तुझं युग एकच दिसतंय!

**नीता** : पण तुम्ही सांगा सर, हा अमेरिकेत म्हणजे इतक्या लांब जाणार म्हणजे वाईट वाटलं पाहिजे की नाही हो मला? तेवढंच म्हटलं मी त्याला.

**सुधीर** : तेवढंच? सर, काय काय बोलली ही! रानडे वक्तृत्वस्पर्धेतलं पहिल्या क्रमांकाचं व्याख्यान झालं! म्हणाली, 'तू अमेरिकेत जाणार, मोठा होणार, आम्हांला विसरणार. तुला काय? रंगढंग आवडतातच. रमशील तिकडेच. नोकरीही धरशील लठ्ठ पगाराची आणि बायकोही करशील लठ्ठ गोऱ्या अंगाची! इकडे आम्ही आपल्या अशाच! उं उं उं...'

**नीता** : किती नाटक्या आहे पाहा, सर. असंच रडवलंन मला. आता यानं रडवलंच तर मी रडणार नाही का? पुरुषांना काय आनंद वाटतो बायकांना रडविण्यात त्यांनाच ठाऊक!

**शहाणे** : (सौ.स) मी रडवतो का ग तुला?

**सौ. शहाणे** : काहीतरीच काय हो!

**सुधीर** : सर, मीसुद्धा हिला रडवीत नव्हतोच. उलट, हसविण्याचाच प्रयत्न करीत होतो. पण हिचा काही विश्वास बसेना.

**शहाणे** : प्रेम बसलं, पण विश्वास बसेना?

**सुधीर** : पाहा ना, सर. मी चांगला सांगतोय की अगं रडू आवर, शांत हो, नीट ऐक, लक्षात घे की ही स्कॉलरशिप नवराबायको दोघांसाठीही आहे! अमेरिकेत विद्यापीठांत नवराबायकोसाठी खास वसतिगृहं असतात! –तेव्हा कुठे डोक्यात प्रकाश पडला! मला वाटतं, सर––

**शहाणे** : काय?

**सुधीर** : तू ऐकू नकोस ग! सर, हिच्यासारख्या मुलीच्या डोक्यावर हे जे दाट, लांब, कुरळे, काळेभोर केस असतात ना, त्यामुळे कुठलाही बाहेरचा प्रकाश आत लवकर शिरत नसला पाहिजे.

**नीता** : मग काय अमेरिकन फॅशन करू वाटतं? केस मुलासारखे कापून घेऊन?

**सुधीर** : हो, नाहीतरी आता अमेरिकेत जायचंच आहे!

**नीता** : ई ग बाई!

**सुधीर** : तुला मी आवडतो असं तू म्हणतेस तर मग माझ्यासारखं व्हायला का नाही आवडत तुला?



**नीता** : बघा, बघा सर, कसा अमेरिकन विचार करतो आहे! आणि याला अमेरिकेत जाऊ देऊ? एकटा?

**सुधीर** : तू सोडशील तर ना?

**शहाणे** : अरे, पण एवढी चांगली शिष्यवृत्ती तुला मिळाली आणि तिला तू, आणि तूसुद्धा बरं का ग, लायक आहातच हे खरं. पण हा अमृतयोग जमला कसा?

**सुधीर** : ही मात्र दैवयोगाची गोष्ट, सर. एके दिवशी आपलं माझ्या घरच्या पत्त्यावर पत्र आलं की, 'तुम्ही असाधारण हुषार विद्यार्थी आहात. तुमच्यासारख्या विद्यार्थ्यांच्या शोधातच आमची कंपनी आहे. तुम्ही ताबडतोब अर्ज करावा आणि निघण्याच्या तयारीलाच लागावे अशी आमची तुम्हाला आग्रहाची विनंती आहे. अट एवढीच की अमेरिकेतील उच्च शिक्षणानंतर किमान दहा वर्षं आपण आमच्या कंपनीत नोकरी करावी'. अर्ज केला आणि काम झालं. आश्चर्यच वाटलं मला, सर.

**शहाणे** : (विचारमग्न होत) खरंच आश्चर्य आहे. कोणती कंपनी ही?

**सुधीर** : ही सर. (कार्ड देतो).

**शहाणे** : अस्सं! ...उत्तम! उत्तम!

**सुधीर** : सर, तुम्ही गंभीर झालात?

**शहाणे** : अरे, तुम्ही एकजण दूर गेला असतात तरी मला वाईट वाटलं असतं. मग दोघं दूर जाणार? ...पण सुखात असा, जपून वागा. खूप अभ्यास करा. खूप मजा करा. खूप हसा. खूप खेळा. कुणालाही दुखवू नका. स्वत:चा स्वार्थच जास्तीत जास्त साधा; पण आपला स्वार्थ देशाच्या स्वार्थातच आहे हे ध्यानात ठेवून देशाचासुद्धा स्वार्थ साधा. तुमच्या पाठीशी आम्हा दोघांचा हार्दिक पाठिंबा कायमचा आहे बरं!

**सुधीर व नीता** : बरंय, सर. येतो आम्ही. (जातात.)

**शहाणे** : ओळखलंस?

**सौ. शहाणे** : काय?

**शहाणे** : अग, यांना ही शिष्यवृत्ती मिळायला आपणच कारण आहोत.

**सौ. शहाणे** : तुमचेच विद्यार्थी ते. तुम्ही एवढं शिकवलंत!

**शहाणे** : अं हं. ते शिकवणं नव्हे. या दोघांनी निवडणुकीच्या कामात मदत केली होती ना?

**सौ. शहाणे** : हो ना, कितीतरी.

**शहाणे** : त्या कामाचं पारितोषिक आहे हे.

**सौ. शहाणे** : बरं झालं बाई. पण कोणी आणि कसं दिलंय हे?

**शहाणे** : तुला आठवतंय, परदेशप्रवासाची संधी पूर्वी आपल्याकडेही चालून आली होती.

**सौ. शहाणे** : ती रामरावांची म्हणताय? जगातल्या लोकशाही पाहण्याची?

**शहाणे** : होय. तीच आता या दोघांना मिळालीय! या दोघांचा आपल्यावर जीव आहे आणि आपल्यासाठी पडतील ते कष्ट करायला त्यांना आनंदच वाटतो. विद्यार्थ्यांतसुद्धा ही दोघंच नेते आहेत. म्हणून मला कॉलेजमधून काढल्यावर यांनी गडबड करू नये म्हणून यांना परदेशी करायचा हा डाव आहे!

**सौ. शहाणे** : अगबाई! मग त्यांना हे सांगायचं नाही का?

**शहाणे** : त्यांना हे सांगू आणि त्यांच्या तोंडचा घास काढून घेऊ? अशा रीतीनं का होईना पण त्यांच्या भाग्याला आपण कारण होत आहोत याचा आनंदच वाटतो मला! नाहीतर त्या दोघांना परदेशी पाठवणं आपल्याला कधी तरी जमणार होतं का?

**सौ. शहाणे** : पण म्हणून?

**शहाणे** : आपलं काय होईल ते आपलं आपण बघून घेऊ. त्याचा त्रास आपल्या मुलांना कशाला?

**सौ. शहाणे** : पण त्यांना हे कळेल तेव्हा त्यांना किती वाईट वाटेल!

**शहाणे** : हे त्यांना कळणार नाही याची काळजी घेतली म्हणजे झालं! रामराव तर डोळ्यांत तेल घालून ही काळजी घेईलच. आपणही गुपित राखलं म्हणजं झालं!

**सौ. शहाणे** : छे छे! तुमचे विद्यार्थी हेच तुमचे हात. ते तुम्ही हातांत ठेवायला हवे होते. आता--

**शहाणे** : कसं बोलतेस तू? अग, किती आनंदात होती ती दोघेजण. त्यांच्या आनंदाचा हिरमोड करणं जमलं असतं का आपल्याला? जाऊ दे. त्यांना सुखी होऊ दे. मला फक्त तुझा हात हवा आहे. तो माझ्या हातात असला की मी सुखी आहे. तूही आहेस ना?



**सौ. शहाणे** : तुमचं सुख तेच माझं सुख.

**शहाणे** : सध्या मात्र माझं दुःख हेच तुझं दुःख आहे-

**सौ. शहाणे** : तुमच्या या दुःखातदेखील माझं सुखच आहे! पण--

**शहाणे** : बस्स! तुझा एवढा आधार असेल तर मी जगाविरुद्धसुद्धा उभा राहीन! आपण दोघं दुःखाला सामोरं जाऊ आणि विश्वाच्या रहस्याचा शोध घेऊ! चल.

(इतक्यात 'सर', सर' अशा हाका मारीत उमा, सुमुखी, लीनता आणि चारुता या मुली येतात. येऊन स्तब्ध उभ्या राहतात.)

**शहाणे** : काय ग मुलींनो? काय झालं? काही शंका?

**उमा** : सर, सर, तुम्ही कॉलेज सोडलंत? आमच्यावर रागवलात?

(सर्व मुली रडू लागतात.)

**शहाणे** : ए वेड्यांनो, रडू नका. रडू नका.

**उमा** : सर, ज्या कॉलेजमध्ये तुम्ही नाहीत त्या कॉलेजमध्ये कशाला जायचं?

**शहाणे** : अग, कॉलेजमध्ये तुम्ही का जात होता? ज्ञान मिळविण्यासाठी ना? ते आहेच ना तिथं!

**उमा** : सर, ज्ञानाची ओळख तुम्हीच करून दिलीत आणि आता मध्येच का आम्हांला सोडून देता?

**शहाणे** : मी तुम्हांला किती पुरणार होतो? चारसहा वर्षांनी कॉलेज सोडणारच होता ना तुम्ही? मग घेणारच होतात ना माझा निरोप? तोच थोडा आधी घेतलात असं माना.

**उमा** : सर, वियोग दुःखाचाच असतो. पण तो योग्य काळी झाला तर सहन तरी होतो. पिकलं फळ सहज तुटतं. हिरवा देठ तुटत नाही सर!

**सुमुखी** : आणि सर, कॉलेजबाहेरच्या जगात एकट्यानंच जायचंय आम्हांला. पण कॉलेजच्या जगांत तुमच्याशिवाय पाऊल कसं टाकायचं?

**शहाणे** : कॉलेजच्या जगातसुद्धा आपणच आपल्या पायावर उभं राहायचं असतं. माझ्यावाचून तुमचं चालणार नसेल तर मीच कमी पडलो म्हटलं पाहिजे.

**लीनता** : नुसतं उभं रहायलाच नव्हे तर आकाशात विहार करायला शिकवलंत तुम्ही, सर! आणि आता आम्हांला अधांतरीच का

सोडून देता? आता आम्ही वरून खाली पडलो तर आम्हांला उभंसुद्धा राहता येणार नाही.

**शहाणे** : तुम्ही प्रतिभेनं मुक्त संचार करू लागलात. हा तुमचाच मोठेपणा आहे! असलो तर मी केवळ निमित्त असेन.

**चारुता** : श्रीकृष्णसुद्धा निमित्तच होता, सर. पण अर्जुनाला वीरश्रेष्ठत्वाची पदवी त्यानंच मिळवून दिली.

**शहाणे** : फार मोठा दृष्टान्त घेतलात तुम्ही. माझ्यापेक्षा खूप श्रेष्ठ माणसं मिळतील तुम्हांला.

**सर्वजणी** : नाही, नाही, शक्य नाही!

**उमा** : सर, तुम्ही आमची मनं फुलवता. बाकीचे लोक ती कुस्करून टाकतात. तुम्ही आमच्या मनात वन्ही चेतवलात. बाकीचे लोक त्याची राख करून टाकतात. तो गोडे-गोडे कसला, कडू जहर तो! मत्सराशिवाय, द्वेषाशिवाय दुसरं काही येत नाही त्याला!

**शहाणे** : हां हां, थांबा. मत्सराशिवाय अन् द्वेषाशिवाय दुसरं काही यायला पाहिजे ना आपल्याला? मग आपण फक्त चांगल्याच गोष्टींचा विचार करू.

**उमा** : म्हणूनच सर, आम्ही तुमचाच विचार करतो आहोत. तुमच्याशिवाय कॉलेज म्हणजे मूर्तीशिवाय मंदिर! तुम्ही कॉलेजमध्ये आलं पाहिजे, सर.

**शहाणे** : बायांनो, ते तुमच्याही हातांत नाही, आणि माझ्याही हातांत नाही. आणि ज्या गोष्टी आपल्या हातांत नाहीत त्यांचा शोक करू नये माणसानं.

(इतक्यात गर्जना ऐकू येतात. 'वुइ वॉन्ट प्रिन्सिपॉल शहाणे', 'प्रिन्सिपॉल शहाणे झिंदाबाद', 'प्रिन्सिपॉल गोडे मुर्दाबाद', 'प्रिन्सिपॉल शहाणे चिरायू होवोत!' फलक घेऊन प्रभाकर, सतीश, शेखर आणि विकास ही मुले येतात. मुलेमुली एकदम म्हणतात-- 'आम्हांला हवेत शहाणे सर!' 'आम्हांला हवेत शहाणे सर-' असा गजर सुरू होतो.)

**शहाणे** : बंद! बंद करा ही ओरड! तुम्हांला मी हवा आहे ना? मग मला बोलू द्या ना.

**प्रभाकर** : तुमचंच बोलणं आम्हांला ऐकायचंय सर; म्हणूनच तुम्ही कॉलेजमध्ये आलं पाहिजे.



**शहाणे** : मी तर शिस्तीचा आणि शांततेचा भोक्ता आहे. मला अशा दंगलीच्या आणि गडबडीच्या मार्गानं तुम्ही कॉलेजात नेणार?

**प्रभाकर** : सर, सत्ता जुलूम करू लागते तेव्हा जालीम उपायच करावे लागतात ना?

**शहाणे** : होय. पण कोणी?

**प्रभाकर** : तरुण क्रांतिकारकांनी!

**शहाणे** : कोणाविरुद्ध?

**प्रभाकर** : जुलमी सत्ताधाऱ्यांविरुद्ध!

**शहाणे** : होय पण परकी सत्ताधाऱ्यांविरुद्ध. आपलेच लोक जेव्हा आपल्यावर अन्याय करू लागतात तेव्हा आत्मक्लेशावाचून आणि मतपरिवर्तनावाचून दुसरा मार्गच उरत नाही. लोकांचे डोळे त्यामुळेच उघडतील.

**सतीश** : सर, लोकांचे डोळे क्रांतीशिवाय उघडणार नाहीत.

**शहाणे** : आणि क्रांती तुम्ही करणार? रागवू नका. पण क्रांती करण्यात नुकतेच आपण अयशस्वी ठरलो आहोत ना? लोकजागृती नसताना क्रांती करणं म्हणजे भ्रांती आहे!

**शेखर** : सर, लोकजागृतीसाठीच आम्ही मोर्चे काढणार आहोत. संप करणार आहोत. उपोषणाचंसुद्धा हत्यार उपसणार आहोत.

**शहाणे** : अरे, मला एकट्याला कॉलेजबाहेर पडावं लागलं तेवढं पुरे नाही का? तुम्हा सर्वांनाही बाहेर पडावं लागेल!

**प्रभाकर** : सर, आम्ही बाहेर पडू. ज्या कॉलेजमध्ये तुम्ही नाहीत त्या कॉलेजमध्ये राम नाही. आम्ही बाहेरून परीक्षा देऊ. नाही तरी तुम्ही अनेक विषयांचं ज्ञान आम्हांला देतच होतात. तुमच्या घरी येऊन आम्ही शिकू. फी तुम्हांला देऊ. हेच खरं विद्यार्जन होईल. हाच खरा ज्ञानयज्ञ होईल. पुनः आपण आश्रमपद्धती रूढ करू. सर, तुम्ही खरे गुरू आहात. तुमचं घर खरं गुरुकुल आहे. खरा अभ्यास इथेच होईल. आणि सर, आम्हांला केवळ भोळेभाबडे समजू नका. आजच्या अमेरिकेतसुद्धा खऱ्या गुरूंनाच विद्यार्थ्यांना शिकविण्याचा-पदवी देण्याचासुद्धा अधिकार असतो.

**शहाणे** : पण बाहेरून परीक्षांना बसायचं म्हणजे तुम्हांला जास्त वर्षं घालवावी लागतील.

**विकास** : पण हे नुकसान आम्ही नोकऱ्या, नाहीतर काहीतरी उद्योग करून भरून काढू. चिनी आणि पाकी आक्रमणांच्या वेळी बूटपॉलिश करून आम्ही निधी जमवला होताच की नाही?

**शहाणे** : पण हे सर्व तुम्ही का करणार?

**प्रभाकर** : आम्हांला तुम्ही हवेत आहात आणि तुमच्याऐवजी जे आहेत ते नको आहेत म्हणून.

**शहाणे** : का?

**प्रभाकर** : सर, त्या गोड्यांनी तुम्हांला फसवलं, स्वत:च्या पोळीवर तूप ओढून घेतलं आणि प्रश्नपत्रिका काढणाऱ्यांपासून तो उत्तरपत्रिका तपासणाऱ्यांपर्यंत सर्वांचे उंबरठे झिजवून आपल्या बायकोला एम.ए. करून घेतलं. सर, दोन शब्द जिला बोलता येत नाहीत ती---

**शहाणे** : उपप्राचार्य झाली असंच ना? किती गोष्टी कळतात तुम्हांला! किती शहाणे, समंजस, हुषार झाला आहात तुम्ही! पण या शहाणपणाच्या जोडीला शांती आणि धीर नसेल तर तो वाया जाईल.

**प्रभाकर** : कसा, सर?

**शहाणे** : तुम्ही म्हणालात की तुम्ही बाहेरून परीक्षा देणार म्हणजे पदव्या तुम्हांलाही हव्याच आहेत! आणि ते योग्यच आहे. पण तुम्हीच सांगितलंत की, गोडेसरांसारखा एक मनुष्य निकालात अदलाबदल करू शकतो! मग, तुम्ही गोड्यांना उघडउघड विरोध करणार आणि गोडेसर ज्या विद्यापीठातील एका महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठातील पदाधिकारी, प्रश्नपत्रिका काढणारे, उत्तरपत्रिका तपासणारे, निकालपत्रक तयार करणारे आहेत, त्या विद्यापीठाकडून पदवीची अपेक्षा करणार? दुसऱ्या एखाद्या विद्यापीठात परीक्षा देऊ म्हणाल तरी तिथपर्यंतही अशा लोकांचे लागेबांधे लागलेले असतात, हे विसरू नका. इतकंही करून तुमची उत्तरं अगदी निखालस उत्कृष्टच असली आणि तुम्हांला नापास करणं अशक्यच असलं तर तुम्हांला पुढं नोकरी न मिळू देणंही अशा लोकांच्याच हातांत असतं. त्यांचे हात एखाद्या चेटकिणीच्या हातासारखे लांबचलांब पोचलेले असतात. तुम्हांला अभ्यासाखेरीज दुसरा उद्योग नसतो; पण अशा लोकांना तुमचा जीवघेणा पाठलाग करण्याखेरीज दुसरा उद्योग नसतो. त्यांचं सगळं लक्ष सूड घेण्यावरच केंद्रित झालेलं असतं. इतकं की तसतशी बुद्धी त्यांना सुचत जाते. तुम्हांला कुठं नोकरी मिळालीच तरीही तिथूनदेखील तुमची हकालपट्टी करायला ही माणसं वाट्टेल ते उपाय योजतील. अरे, ज्या रामरावांनी आणि गोड्यांनी ही निवडणूक जिंकली ते तुम्हांला जिंकू शकणार नाहीत की काय?

**प्रभाकर** : मग, सर? नाही, सर. काहीतरी केल्यावाचून आम्हांला चैन पडत नाही सर.

**शहाणे** : वाट पाहा. धीर धरा. कटू परंतु पथ्यकारक सत्याचा जिवाच्या करारानं आग्रह धरणारे आगरकरसुद्धा सांगतात की पोटावर पाय येणार असेल तर सत्य बोलू नका. आपल्या पायावर उभं राहण्याची ताकद आल्यावरच सत्य सांगा. सत्याचे अंकुर प्रतिकूल परिस्थितीच्या धगीत अकाली जाळून टाकण्यात काय अर्थ आहे? ते अंकुर जोपासा. त्याभोवती मौनाचं काटेरी कुंपण घाला. हे कुंपण बोचेल, टोचेल; पण अंकुर पूर्ण मरण्यापेक्षा ही टोचणी परवडली. जा. सर्वजण जा. अगदी शांत राहा. मला पाठिंबा देऊ नका. माझं नाव घेऊ नका. माझी आठवणसुद्धा काढू नका. वाटल्यास माझा निषेधसुद्धा करा. सांगा, हे मोर्चे, संप यांची भाषा शहाण्यांनीच काढली होती पण शहाण्यांचा स्वार्थ पाहून आणि आमच्याविषयीची बेपर्वाई पाहून आम्हीच ती बंद केली!

**प्रभाकर** : सर, सर हे कसं शक्य आहे?

**शहाणे** : तुम्ही माझे आहात ना? तुम्हांला माझ्याविषयी प्रेम वाटतं ना? मग तुम्ही जगलं पाहिजे, वाढलं पाहिजे. बळकट झालं पाहिजे. म्हणजेच तुम्हांला माझ्यावरचं प्रेम व्यक्त करता येईल. पण त्यासाठी माझ्या तिरस्काराचं नाटक तुम्हांला रंगवलंच पाहिजे मनापासून! जा. जा. चालते व्हा. सगळे चालते व्हा. आत्तापासून मी तुमचा कोणी नव्हे, तुम्ही माझे कोणी नव्हेत. मी तुमचा द्वेष करतो. तुम्ही माझा द्वेष करा! जा!! जा!!!

**सर्व विद्यार्थी**: सर, नमस्कार! आम्हांला आशीर्वाद द्या! (वाकतात.)

**शहाणे** : (दूर सरत) तुमचा नमस्कार आता मला नको; आणि मी तुम्हांला आता आशीर्वाद देत नाही.

**विद्यार्थी** : सर!

**शहाणे** : प्रिन्सिपॉल गोडेसरांना नमस्कार करा. आणि अध्यक्ष रामरावांचे आशीर्वाद मागा!! जा!!! (सर्व विद्यार्थी जातात.)

**सौ. शहाणे** : कसं होणार आहे काही कळत नाही. तुम्ही मुलांना आवडता, म्हणूनच तुम्हांला कॉलेजमधून काढणं तुमच्या हितशत्रूंना जमत नव्हतं. पण ही मुलंच तुम्ही दूर लोटलीत तर---

**शहाणे** : या मुलांचा वापर मी माझ्या वैयक्तिक कामासाठी करू?

**सौ. शहाणे** : निवडणुकीत नाही मुलांनी कामं केली?

**शहाणे** : ते काम माझं एकट्याचं नव्हतं. लोकांचा प्रतिनिधी म्हणून निवडून येणार होतो मी.

**सौ. शहाणे** : पण मुलं आपण होऊन तुमची बाजू उचलून धरीत असतील तर त्यांना विरोध तरी करू नका. तुम्ही प्राचार्य झालात तर या मुलांचंच जे कल्याण करू शकाल---

**शहाणे** : ते न साधता मुलं नुसती संकटातच पडली म्हणजे? मी प्राचार्य होईनच याची काय खात्री आहे? आणि प्राचार्य झालोच तरीही या मुलांना माझ्या शत्रूंपासून वाचवू शकेनच याची काय खात्री आहे? शीलाचं उदाहरण डोळ्यांसमोर आहे ना?

(दारात विश्वास येतो.)

**सौ. शहाणे** : मुलांची मदत घेणार नाही तर करणार तरी काय तुम्ही?

**शहाणे** : मलाही सुचत नाही. पण माझ्या कातडीसाठी मुलांचा बळी देऊ? आपलीच पिलं खाणारा बोका होऊ?

**विश्वास** : अरे, पण मुलांचा गैरवापर केलास असा आरोप तुझ्यावर आहेच ना?

**शहाणे** : मग काय त्या आरोपाला पुरावा देऊ?

**विश्वास** : मग तू करणार आहेस तरी काय? रामरावाला तू खाली कसा ओढणार आणि स्वत: वर कसा चढणार? रामरावाची निवडणूक रद्द व्हावी म्हणून अर्ज करण्याची आज शेवटची तारीख आहे. केलास का अर्ज?

**सौ. शहाणे** : निवडणूक रद्द करण्याचा अर्ज?

**विश्वास** : होय. निवडणुकीत रामरावानं गैर मार्गांचा अवलंब केला,



वाजवीपेक्षा जास्त खर्च केला, असं सिद्ध करू शकू आपण.

**शहाणे** : म्हणजे काय होईल?

**विश्वास** : म्हणजे? त्याची निवडणूक रद्द होईल.

**शहाणे** : आणि तो पुन: निवडणुकीला उभा राहील आणि अधिक काळजीनं वागून कायद्याच्या कचाट्यातून सुटून निवडून येईल.

**विश्वास** : अरे, कदाचित त्याला काही काळ निवडणूक लढवायला बंदीसुद्धा होईल.

**शहाणे** : म्हणजे स्वत:ऐवजी आपला पित्ता तो उभा करील. गोडे आहेच तयार.

**विश्वास** : अरे मग म्हणणं काय तुझं? हे सगळे गैरप्रकार खपवून घ्यायचे? त्यानं लोकांना पैसे चारले, लोकांना दारू पाजली, लोकांच्यापुढे बायका नाचवल्या, लोकांना धमक्या दिल्या--

**शहाणे** : आणि लोकांनी त्याला मतं दिली!

**विश्वास** : अरे रामरावानंच लोकांना भ्रष्ट केलं--

**शहाणे** : आणि लोक भ्रष्ट झाले! रामरावानं पाप केलं आणि लोकांनी त्याच्या हाताला हात लावला! विश्वास, अरे पापात प्रथम काय आणि दुय्यम काय?

**विश्वास** : अरे लोक घाबरले असतील त्याला. शीलाचा खून लोकांच्या डोळ्यांपुढं होता ना? मला तर वाटतं, लोकांना दहशत बसावी म्हणूनच शीलाचा खून केला असला पाहिजे रामरावानं. कुणी बोलत नव्हतं; पण खरा खुनी कोण आहे हे माहीत होतं सगळ्या लोकांना!

**शहाणे** : आणि तरीही लोकांनी त्यालाच निवडून द्यावं ना? जाणून बुजून? कळून सवरून? असली कसली भीती वाटत होती लोकांना की नागाच्या भीतीनं पळून जाण्याऐवजी त्यालाच शरण जाणाऱ्या उंदराप्रमाणं लोकांनी रामरावालाच शरण जावं? अरे भिऊ नका, तुम्हीच सर्वसमर्थ आहात, तुम्हीच सार्वभौम राजे आहात असं लोकांच्या कानीकपाळी आम्ही अहोरात्र ओरडत होतो, तरी लोक घाबरावेत ना? अरे, वाटल्यास, जबरदस्ती झाल्यास, पैसे घ्या, दारू घ्या, काय वाटेल ते करा, पण मतं विवेकानंच द्या, तुमचं कुणीही वाकडं

करू शकत नाही, असं आम्ही सर्वांना सतत सांगत सुटलो होतो, तरी पण लोकांनी मला डावलावंच ना?

**विश्वास** : अरे, निवडणुकीतले रामरावाचे सगळे गैरप्रकार एकदा सिद्ध झाले आणि जगजाहीर झाले की लोकांचे डोळे उघडतील.

**शहाणे** : अरे, ज्या लोकांनी हे गैरप्रकार खपवून घेतले त्यांना ते माहीत का नाहीत?

**विश्वास** : होय ना? मग ते लोक आणि त्यांची ती निवडणूक जाऊ देत की खड्ड्यात.

**शहाणे** : नाही विश्वास, लोक कसे खड्ड्यात जाऊ देत? अरे लोकांचा कौल हाच खरा कौल! जनता हीच खरी माता! जनता हाच पिता! जनता करील तीच पूर्वदिशा! जन नोहे हा अवघा जनार्दन!

**विश्वास** : असली ही अडाणी, पापी, भ्रष्ट, आंधळी जनता?

**शहाणे** : विश्वास, जनतेवर चिडून काय उपयोग? आपलेच दात आणि आपलेच ओठ! झोपलेल्या लोकांवर रागवण्यापेक्षा त्यांना जागं करण्याचा प्रयत्नच होईल तेवढा केला पाहिजे.

**विश्वास** : तू म्हणतोस त्याप्रमाणं लोक कधी काळी जागे होतील असं मला वाटत नाही.

**शहाणे** : तसंही असेल कदाचित! पण लोकशाही मानायची तर दुसरा मार्गच नाही!

**विश्वास** : अरे पण लोकशाही, लोकशाही असं तू म्हणतोस ती आहे कुठे? जिकडे तिकडे फक्त एकच शाही आहे. स्वार्थशाही! जो तो आपला स्वार्थच साधतो आहे. तूही साध!

**शहाणे** : मलाही असं वाटतं रे. पण काय करू? जमतच नाही.

**विश्वास** : आणि तुला शहाणपण पटवणं मलाही जमत नाही. तरी पहिल्यापासूनच मी सांगत होतो की, तू पोराबाळांचा बाप आहेस, या फंदात पडू नकोस. पण ऐकलं नाहीस आणि फसलास. फसलास कसला, जाणूनबुजून पडलास. अरे, एवढी जगाची काळजी करतो आहेस पण जग मात्र तुझा काळ बनून तुझा जीव घेत आहे! वेडा आहेस झालं. अजून तरी शहाणा हो. या बायकोपोरांकडे पाहा. सांग, तू हा अर्ज भरणार आहेस, की नाहीस? बोलत नाहीस? ठीक आहे! हा अर्ज आज संध्याकाळच्या आत भरला पाहिजे. तो भरायचा असेल, विद्यार्थ्यांची चळवळ करायची असेल, कुठल्याही उपायानं का होईना पण प्रथम प्राचार्य व्हायचं असेल आणि निवडून यायचंच असेल तरच माझ्याकडे ये. तू पराभूतच राहणार असशील तर विजयी रामरावाचा रोष ओढवून घेणं मलाही परवडणार नाही! तू माझा मित्र आहेस; पण मला बायकोमुलं आहेत. तुझ्यावर माझं प्रेम आहे; पण माझ्या बायकोपोरांना जगवणं माझं कर्तव्य आहे. समजलास? चाललो मी!

**सौ. शहाणे** : भावजी, थोडं थांबा--

**शहाणे** : जाऊ दे त्याला!

(विश्वास जातो.)

**सौ. शहाणे** : मित्रालाही तोडलंत? त्यांच्याशीसुद्धा भांडलात?

**शहाणे** : तू भांडणार माझ्याशी?

**सौ. शहाणे** : अहो, हे मांडलं आहेत तरी काय? काय, काय करणार आहात तुम्ही? कोण मदत करणार तुम्हांला? कसे उभे राहणार तुम्ही? किती रागवून गेले ते?

**शहाणे** : जाऊ दे. मदत नकोच आहे कुणाची मला. तो भांडून गेला; बरं झालं. भांडणाची जाहिरातच झाली पाहिजे. तो माझा मित्र आहे म्हणूनच.

**सौ. शहाणे** : म्हणजे काय?

**शहाणे** : रामरावानं माझ्याशी वैर धरलंय. माझ्या मित्रांशीही तो वैरच धरणार. माझा मित्र त्यातून सुटायचा भांडण हाच मार्ग आहे.

**सौ. शहाणे** : अहो पण असे एकाकी पडून सगळ्या जगाशी तुम्ही कसे लढणार?

**शहाणे** : तुला काय वाटतं, रामराव आणि गोड्यांनी केलेले हे खोटे आरोप मी मुकाट्यानं सहन करीन? चार पैसे साठू देत. न्यायालयात जाईन. वर्तमानपत्रंही काही थोडीथोडकी नाहीत. त्यांतूनही सत्य मांडीत राहीन. ग्रंथ लिहीन, व्याख्यानं देईन आणि लोकजागृती करीन. कुणा एका व्यक्तीची मदत नकोच आहे मला. कुणाही व्यक्तीला माझ्याबरोबर दु:खी करायचं नाही मला. पण लोकशाहीच्या या संस्थांची मदत घेऊन

लोकांच्या हृदयांची कवाडं ठोठावून पाहायची आहेत मला. माझं सर्वस्व हरपलं हेच बरं झालं. आता निकराची धडक देण्याची जिद्द येईल माझ्या अंगात.

(मोठा आवाज होऊन कौलांचे तुकडे आणि दगड पडतो.)

**सौ. शहाणे** : अगबाई! दगड! नशीब हो, डोक्यात नाही पडला कुणाच्या.

**शहाणे** : इतकी वर्षं राहत आहोत आपण इथं. पण नारळसुद्धा पडला नाही छपरावर. आणि आज हा दगड! (खिडकीतून, दारातून दोघे बाहेर पाहतात.) जाऊ दे. मारला असेल माडावर कुणीतरी वेड्यानं. चल. उगीच काळजी करू नकोस. उद्योगाला लागू या. तुला त्या शाळेत नोकरी बघायला जायचं होतं ना? मलासुद्धा इथल्या वर्तमानपत्रांच्या कार्यालयांत जायचं आहे.

**सौ. शहाणे** : पण अजून सुजन बाळ कसा आला नाही हो? केव्हाचा जाऊन बसलाय कुठं!

**शहाणे** : बाहेर पडतोच आहोत ना आपण? चौकशी करू या. बसला असेल खेळत कुणा मित्राकडे. भान राहत नाही त्याला.

**सौ. शहाणे** : नाही हो. आईवेडा आहे अगदी तो. शेजारी खेळत असला तरी चार वेळा घरात उगाचच डोकावून जाईल तो.

**शहाणे** : आणि अशी मुलं सोडून तू दिवसभर नोकरीवर जाणार?

**सौ. शहाणे** : झालं? कुठला विषय कुठे नेलात? चला पाहू.......... (वळतात तोच) अगबाई! विंचू! केवढा मोठा हो! हा पाहा. हा पाहा.

**शहाणे** : अरे बापरे! खरंच! चप्पल आण लवकर. मी लक्ष ठेवतो.

(सौ. शहाणे चप्पल आणतात. शहाणे विंचू मारतात.)

**सौ. शहाणे** : इ ग बाई! बरं झालं हो. देवाची मर्जी म्हणूनच नेमका नजरेला पडला. कुणाला चावला असता तर--

**शहाणे** : मुलाचाच काय मोठ्याचाही प्राण घेईल एवढा मोठा आहे हा विंचू! पण काय ग, विंचू कधी निघाला होता का आपल्या घरात?

**सौ. शहाणे** : कधीच नाही.

**शहाणे** : आणि एवढा थोरला विंचू इकडे पाहायला तरी सापडतो का कुठं?



**सौ. शहाणे** : छे. कुठंच नाही.

**शहाणे** : चिपळूणजवळच्या डोंगरात असतात असले प्रचंड विंचू. इकडे कसा आला? कुणी आणला तर नाही?

**सौ. शहाणे** : इश्श! अहो, विंचू कोण आणणार? तो काय ढेकूण आहे?

**शहाणे** : नाही. नाही. आता अधिक काळजीनं, सावधपणानं वागलं पाहिजे आपल्याला. दगडाखाली विंचू असतो. मघाशी तो दगड आला. त्याच्या मागेच हा विंचू आला. हा दगड साधा नाही. म्हणतात ना, महादेवाच्या पिंडीपाशी विंचू! हा विंचू त्या महादेवाच्या पिंडीपासचाच!

**सौ. शहाणे** : कोणता महादेव?

**शहाणे** : रामराव! (हातात विंचू धरतात. फक्त विंचवावर प्रकाश. त्याची मोठी सावली मागे पडते.)

## (प्रवेश दुसरा)

(तेच स्थळ काही काळानंतर. सौ. शहाणे अस्वस्थपणे येरझारा घालीत आहेत. त्यांनी बाहेर जाण्याची तयारी केलेली आहे; पण कुणाची तरी वाट त्या पाहत आहेत. काही वेळाने बाहेरून शहाणे येतात.)

**सौ. शहाणे** : लागला का सुजनचा काही सुगावा? (शहाणे मानेनंच नकार दर्शवितात.) म्हणजे कुठं असेल हो तो? काय करीत असेल? बोलत का नाही? सांगा ना. अहो, मुंबईच्या वर्तमानपत्रांत जाहिराती दिल्या होत्या ना? आकाशवाणीलासुद्धा कळवलं होतं ना? सांगा ना लवकर. मला वेळ होतोय. शाळेत जायचंय.

**शहाणे** : शाळेत जायची काही गरज नाही.

**सौ. शहाणे** : का?

**शहाणे** : पोस्टानं फक्त एकच पत्र आलंय. तुला नोकरीतून कमी केल्याचं.

**सौ. शहाणे** : पण का?

**शहाणे** : का? तू माझी बायको नाहीस का? तेवढं कारण पुरेसं नाही?

**सौ. शहाणे** : चला. आता दुसरीकडे कोठेतरी जाऊ. मुंबईला जाऊ. आणि सुजनचा शोध घेऊ. तुम्ही वर्तमानपत्रांत जाहिराती दिल्या

आहेत ना? पुन: द्या; आणि मुंबईचा कुठला तरी पत्ता कळवा.

**शहाणे** : कितीतरी वर्तमानपत्रांत जाहिराती पाठविल्या होत्या. पण एकातही छापून आली नाही.

**सौ. शहाणे** : काय?

**शहाणे** : इथल्या वर्तमानपत्रांत तर कुणी माझं अक्षर छापायला तयार नाही. आणि बाहेरच्या एकाही वर्तमानपत्रांत जाहिरात नाही. वाचनालयातली सगळी वर्तमानपत्रं वाचली.

**सौ. शहाणे** : म्हणजे? बाहेरच्या वर्तमानपत्रांचीसुद्धा तोंडं कुणी दाबून ठेवली आहेत?

**शहाणे** : त्या वर्तमानपत्रांचा दोष नसेल त्यात.

**सौ. शहाणे** : मग?

**शहाणे** : इथून पत्रच जात नसेल आपलं.

**सौ. शहाणे** : म्हणजे?

**शहाणे** : पोस्टातल्या झारीत शुक्राचार्य असणार. नाहीतर आपण आपल्या इतक्या नातेवाइकांना सुजन बाळ हरवल्याचं कळवलं होतं; पण एकाची पोचसुद्धा कशी नाही?

**सौ. शहाणे** : अहो पण रजिस्टर्ड पत्रं?

**शहाणे** : रजिस्टर्ड पत्रंसुद्धा आतला मजकूर बदलून पाठवली गेली असणार आणि आलेली उत्तरं नाहीशी केली असणार.

**सौ. शहाणे** : अहो, मग तक्रार नाही का करायची?

**शहाणे** : तक्रार केली आहे इथल्या पोस्टमास्तरकडे. त्यानं घेतली आहे नोंदवून. पुढे पाठवतो म्हणाला. पण त्याचाच यात हात असला पाहिजे. तार करायची आहे म्हटलं तर म्हणे तारा चालू नाहीत. फोन लावायचा आहे म्हटलं तर म्हणे मधले खांब पडले आहेत. पोलिस कचेरीत गेलो आणि तक्रार लिहून दिली. त्यांनी तक्रार घेतली आणि नुसतं 'पाहू' म्हणाले; 'तुम्ही जा' म्हणाले; आणि माझी पाठ वळते ना वळते तोच कुत्सित हसणं ऐकू आलं. मी उमगलो. म्हटलं, ही लक्षणं ठीक नव्हेत. ताबडतोब इथून हललं पाहिजे. दुसऱ्या गावी गेलं पाहिजे. म्हणून एस्.टी. स्टॅण्डवर गेलो तर रिझर्व्हेशनच मिळेना. गर्दी आहे म्हणे सगळ्या गाड्यांना.

**सौ. शहाणे** : आता मग?



**शहाणे** : या गावातले तर सगळे मार्ग बंदच झाले आहेत. बाहेरगावी गेलंच पाहिजे आणि तेसुद्धा चालत.

**सौ. शहाणे** : ठीक आहे. तयारी करू या.

**शहाणे** : तयारी कसली करतेस? अग, आपल्या घरावरसुद्धा पहारा असणारच रामरावाचा. आपल्याकडे कोण येतो, कोण जातो यावर पाळत असणारच. आजच्या आज काळोखातून लपतछपत पळून गेलं पाहिजे.

(दारावर टकटक. शहाणे दार उघडतात. इन्स्पेक्टर देसाई.)

**शहाणे** : इन्स्पेक्टरसाहेब, लागला का मुलाचा पत्ता?

**इन्स्पेक्टर** : मुलाचा पत्ता नाही लागला; पण शीलाकेसमधल्या खुनीचा पत्ता मात्र लागत चाललाय.

**शहाणे** : होय? कोण आहे खुनी?

**इन्स्पेक्टर** : ते कोर्टात ठरेलच. पण या केसशी तुमचा निकट संबंध असल्यानं आमच्या परवानगीशिवाय तुम्हांला इथून हलता येणार नाही.

**शहाणे** : तुम्हांला कुणी सांगितलं आम्ही गावाला जाणार आहोत म्हणून?

**इन्स्पेक्टर** : तुम्ही आम्हांला फसवू शकत नाही, मिस्टर शहाणे. एस्.टी. स्टॅण्डवर रिझर्वेशन करण्यासाठी कोण गेलं होतं?

**शहाणे** : होय. राजरोसपणे मुंबईला जाऊन येणार होतो मी. हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी.

**इन्स्पेक्टर** : हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी नव्हे; एकामागून एक पळून जाण्यासाठी. मुलाला तुम्ही आपण होऊनच पुढे धाडून दिलं असलं पाहिजे. बहुतेक गुन्हेगारांचे पत्ते आमच्यापाशी असतात. तुमचा मुलगा खरोखरच पळवला गेला असता तर इतक्या दिवसांत त्याचा काहीतरी ठावठिकाणा आम्हांला लागला असताच. पण तुम्हीच त्याला परगावी दडवून ठेवला आहेत; आणि त्याला शोधायच्या निमित्तानं तुम्हीही परगावी जाऊन दडून बसणार आहात.

**शहाणे** : इन्स्पेक्टरसाहेब, काय बोलताहात आपण? दुनिया अशी उलटी कशी झाली हो? अहो, आमचा मुलगा खरोखरच हरवला आहे हो! आमच्याकडे पाहूनसुद्धा तुम्हांला हे पटत

नाही का हो?

**इन्स्पेक्टर** : कायदा माणूस पाहत नाही मिस्टर शहाणे, पुरावा पाहतो.

**शहाणे** : आहे कसला पुरावा?

**शहाणे** : होय.

**इन्स्पेक्टर** : शीलाबाईंचा मृत्यू संशयास्पद आहे, हे तुम्हांला मान्य आहे?

**शहाणे** : होय.

**इन्स्पेक्टर** : तुमच्या निवडणुकीसाठी शीलाबाई रात्रीबेरात्री तुमच्याबरोबर होत्या. तुम्हीच त्यांना रात्री घरी पोचवीत होता?

**शहाणे** : होय. मी स्वत:. त्यांच्या घरापर्यंत.

**इन्स्पेक्टर** : ज्या दिवशी शीलाबाई बेपत्ता झाल्या असं तुम्ही म्हणता त्या आधीच्या पहाटे त्या तुमच्याबरोबरच होत्या?

**शहाणे** : होय. मीच घरी पोचवलं त्यांना.

**इन्स्पेक्टर** : असं तुम्ही म्हणता.

**शहाणे** : म्हणजे?

**इन्स्पेक्टर** : तुम्ही असं म्हणणारच.

**शहाणे** : अहो, याचा अर्थ काय?

**इन्स्पेक्टर** : हा अर्थ तुम्ही मला विचारता?

**शहाणे** : इन्स्पेक्टरसाहेब, कसले आरोप करता हे? अहो, शीला मला माझ्या मुलीसारखी होती. मीच तिला घरी पोचवली.

**इन्स्पेक्टर** : असं तिचा नवरा सांगत नाही.

**शहाणे** : अहो, ते वाचा असून मुके आहेत.

**इन्स्पेक्टर** : म्हणूनच मुकेपणाच्या गोष्टी चालत!

**शहाणे** : इन्स्पेक्टर!

**इन्स्पेक्टर** : शीला घरी आली असं तिची मुलंही सांगत नाहीत.

**शहाणे** : अहो, ती मुलं झोपली होती.

**इन्स्पेक्टर** : मग तर काय?

**शहाणे** : इन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर, कसले हे आरोप करता?

**इन्स्पेक्टर** : आरोप मी करतो?

**शहाणे** : नाहीतर काय पुरावा?

**इन्स्पेक्टर** : तुम्हांला कॉलेजमधून काढल्याची नोटीस काय सांगते? सभेपुढे संमत झालेली आहे ती नोटीस. आणि तुमचा शीलाबरोबरच फोटो–



**शहाणे** : खोटं आहे, खोटं आहे सारं.

**इन्स्पेक्टर** : सगळं जग खोटं काय? फक्त तुम्ही खरे?

**शहाणे** : अहो, खरं ते खरंच नाही का?

**इन्स्पेक्टर** : तेच आता कोर्ट ठरवील. आणि म्हणूनच तुम्हांला इथून हालता येणार नाही. हालण्याचा प्रयत्न केलात तर––

**शहाणे** : इन्स्पेक्टर!

**इन्स्पेक्टर** : तुम्ही आपला मुलगा हरवला म्हणता, नाही का? पण त्या दु:खापेक्षा आपल्याला पळून जाता येत नाही याचा रागच तुम्हांला जास्त येतोय! अं?

**शहाणे** : इन्स्पेक्टरसाहेब, दु:खावर आणखी किती डागण्या द्याल? इन्स्पेक्टरसाहेब, गुन्हेगारांच्या सहवासानं तुमच्या भावना इतक्या बोथट बनतात का की खऱ्या बापाचं फाटलेलं हृदय खोट्या आरोपांनी चिंध्या झाल्यावरसुद्धा तुम्हाला दिसू नये? इन्स्पेक्टरसाहेब, पळून कुठं जाऊ? अहो, कोर्टात खटला असेल तर न्यायाला मदतच करीन मी. कारण न्याय मलाच हवा आहे. पण पोराचा शोध घ्यायला तरी मला मोकळा सोडा. नाहीतर तुम्ही तरी पोराला शोधा हो.

**इन्स्पेक्टर** : मी काय करावं हे तुम्ही सांगण्याची गरज नाही. तुम्ही काय करावं ते सांगणं मात्र माझं कर्तव्य आहे. लक्षात ठेवा–तुम्ही इथून कुठंही जाऊ नका. (जातो.)

**शहाणे** : सुमित्रा, सुमित्रा, मला वेड कसं लागत नाही ग? आता मी वेडा होईन तरच जिवंत राहीन. पण वेड लागण्याचंसुद्धा भाग्य नाही माझं. वेडं होऊन जगायचं की हृदयक्रिया बंद पडून मरायचं हाच माझ्यापुढचा प्रश्न आहे. माझी बुद्धिमत्ता मला वेडं होऊ देणार नाही. पण या बुद्धीला कुठं वाटच नसेल तर ती बुद्धीच नाहीशी का होत नाही? निदान असल्या जगात जगण्याइतकी निगरगट्ट तरी का होत नाही? काय करू मी? त्या भिकार इन्स्पेक्टरकडे भीक मागू? की त्या भेदरट एस्.टी. मॅनेजरजवळ भीत भीत जाऊ? की त्या लाचार पोस्टमास्तरपुढे पदर पसरू? की त्या निर्दय रामरावापाशी रडत रडत जाऊ?

**सौ. शहाणे** : आपले मार्ग संपले. आपले विचार आटले. कुणाला तरी शरण गेल्याशिवाय जगता येणार नाही.

**शहाणे** : मग कुठं जाऊ म्हणतेस? अगदी तू म्हणशील तसं करीन. तू सांगशील तसं वागेन. खरं तर, तुझ्यावर संसाराचा भार मीच टाकला. मीच वाहून न्यायला हवा तो. पण मी हरलो. दुबळा ठरलो. माझी बुद्धी संपली. आता तूच या संसाराचा रथ ताब्यात घे आणि झाला तर माझा घोड्यासारखा उपयोग करून घे. लोकांना सांग हा घोडा लाथा मारीत होता तो मोकळा होता म्हणून. आता त्याला गाडीला जुंपलाय. आता नाही मारायचा तो. (तिच्या पायांवर पडतात.)

**सौ. शहाणे** : अहो उठा, उठा, असं काय करता?

**शहाणे** : कुठंही वाकायची सवय नव्हती मला. तुझ्यापासून सुरुवात करू दे.

**सौ. शहाणे** : तुम्ही वाकलेलं मलाही नाही खपायचं. तुम्ही वाकू नका. मी तुम्हांला वाकू द्यायची नाही. कुठंही नाही. तुम्ही काही कुणाचं घोडं मारलं नाहीत मग वाकायचं कशाला?

**शहाणे** : तूच म्हणालीस ना, कुणाला तरी शरण गेलंच पाहिजे म्हणून?

**सौ. शहाणे** : हो. इतका काळ एकट्याचीच हिंमत धरली. पण आता मदत मागितलीच पाहिजे. पण मदत मागण्यासाठी शरण जायचं ते पोरस राजाप्रमाणं. आणि तेही खोट्या शिकंदरापुढे नव्हे. तर आपल्या मित्राकडे. आजवर कुणाचे उपकार घेतले नाहीत. आज घेऊ पण पुढं सव्याज फेडू. तुम्ही विश्वासभाऊजींकडे जा. त्यांच्याशी वाद घातलात ती चूक मोठ्या मनानं कबूल करा. कृष्णाकडे सुदाम्याप्रमाणं आलो आहोत असं सांगा. आणि त्यांना या गावाबाहेर गुपचूप जाऊन आपली कोंडी जाहीर करायला सांगा. आपली कोंडी फोडायचा मार्ग आता या गावात नाही. बाहेरूनच तोंड फुटलं पाहिजे. लवकर जा. त्यांना सगळं समजावून सांगा. कुणीतरी हुषारीनं आणि तातडीनं हे काम केलं पाहिजे.

**शहाणे** : होय. जातो मी. तुझी इच्छा खरी ठरो! (जाऊ लागतात.)

**पल्लवी** : (बाहेरून मळक्या अवतारात धापा टाकीत येत) आई... आई आई.... (आईला मिठी मारून रडते.)

**सौ. शहाणे** : काय झालं ग? शांत हो. कुणी मारलं का? दप्तर कुठंय तुझं? कुठं पडलीस का?



**पल्लवी** : आई, आई, ते दार बंद कर. पक्कं बंद कर. कुलूप लावून बंद कर. ही खिडकी बंद कर. ती खिडकी बंद कर. आतलं दारसुद्धा बंद कर. आणि मला धर. घट्ट धर. अगदी घट्ट धर.

**सौ. शहाणे** : कोणी चोर का होता तुझ्यामागे? चोरलं का त्यानं दप्तर?

**पल्लवी** : चोर नव्हे, आई. त्याच्यापुढचा.

**शहाणे** : गुंड? मवाली?

**सौ. शहाणे** : अगबाई! सांग, बोल तरी.

**पल्लवी** : सगळ्या मुलीमुली आम्ही शाळेतून येत होतो. घर आलं म्हणून मी एकटी इकडे वळले मात्र. माझ्यामागून पुढं आले फक्त दोन राकट खरखरीत हात. त्यांनी माझं तोंड दाबलं अन् रानातून चालवलं त्या विहिरीकडे–त्या विहिरीकडे–ज्या विहिरीत शीलाताई पडली होती त्या विहिरीकडे–मी घाबरले–शीलाताईचं भूत मला दिसलं आणि मी भ्याले–चमकले–अन् एकदम मला काय झालं कोण जाणे. माझे दात शिवशिवले आणि मी त्या हातांचं मास विसविशीत होईपर्यंत चावले. तसे ते हात वळवळले. हातांचा चिमटा सैल झाला न् मी पळत सुटले ती थेट इथं.

**शहाणे** : शांत हो पल्लवी. आता घाबरू नकोस. जा ग. तिला आत घेऊन जा. तिचे हातपाय धू. तिला कॉफी दे.

**सौ. शहाणे** : ते बघते मी. तुम्ही जाऊन येता ना

**शहाणे** : तुम्हा दोघी बायकांनाच या घरात सोडून?

**सौ. शहाणे** : तुम्ही आमची काळजी नका करू. अंधार पडण्यापूर्वी जाऊन या. दुसरं कोणी आलं तर समाचार घेईन मी त्याचा. पल्लवीच्या अंगात जे बळ संचारलं तेच माझंही रक्षण करील. जा तुम्ही. त्या मोठ्या संकटाचा आधी विचार. मग या छोट्याचा. मी सांभाळीन घर. जा लवकर.

**पल्लवी** : आई, साप! साप! (पल्लवी घाबरून किंचाळते.)

**शहाणे** : काठी आण (सौ. शहाणे काठी आणतात. शहाणे साप मारतात.) बापरे! केवढा साप हा! आणि विषारी आहे! नशिबानंच वाचलो आपण. पण असले साप इकडे दिसत नाहीत. महाबळेश्वरच्या जंगलातला हा साप इकडे वाट कसा चुकला?.... बरोबर आहे! ज्या सापाच्या वाटेत मी आडवा

आलो तोच हा! ज्या महादेवाच्या पिंडीवरचा विंचू इथं आला त्याच महादेवाच्या गळ्याभोवतालचा सापही आता आला! आता राहिली आग–हालाहल आणि राख!

**सौ. शहाणे :** साप मेला. तुम्ही चला.

**शहाणे :** कसा जाऊ?

**सौ. शहाणे :** ही काठी आहे माझ्याजवळ. तुम्ही या जाऊन लौकर. आता आम्ही सावध आहोत. तुम्ही जा. बाहेर संध्याकाळ झाली. आत्ता अंधार पडेल.

(शहाणे जाऊ लागतात. इतक्यात बाहेर कोणीतरी ओरडते, 'शहाणेसाहेब, मुलगा विहिरीत पडलाय! धावा! धावा!')

**शहाणे :** सुजन!

**सौ. शहाणे :** बाळ!

**शहाणे :** तू इथंच थांब. मी आलोच. ऐक माझं. थांब. (जातात.)

(सौ. शहाणे दाराशीच तळमळत थांबतात. मग निश्चयाने दार बंद करून पल्लवीला आत घेऊन जातात. दारावर थापा. आतून धावत सौ. शहाणे येतात आणि दार उघडतात.)

**सौ. शहाणे :** कोण हवंय आपल्याला? ते घरात नाहीत.

**रामराव :** (आत येत) ते माहीत आहे मला. शहाणेसाहेब विहिरीकडे गेलेत तुमच्या मुलाचा शोध घेण्यासाठी. माझी माणसं त्यांना मदत करण्यासाठी मी पाठवलीत. तुमचा मुलगा हरवल्याचं कानावर आलं आमच्या अन् फार वाईट वाटलं आम्हांला. मोठ्या शहरांत मुलं हरवतात किंवा चोरली जातात ते एकवेळ समजण्यासारखं आहे. पण आपल्या चांगल्या गावात ही गोष्ट व्हावी अन् तीही मी या गावातून निवडून आल्यावर व्हावी, हे फार फार लागलं बघा आम्हांला. लवकरच मी मंत्री होणार आहे आणि हरवलेली मुलं शोधण्याचं काम माझ्याकडेच घेणार आहे.

**सौ. शहाणे :** या कामाची तुम्हाला चांगलीच माहिती दिसते!

**रामराव :** पुष्कळच कामांची फारच चांगली माहिती आहे मला, वहिनीसाहेब! जे न देखे रवी ते देखे कवी म्हणतात. पण ही म्हण दिवसाची झाली. रात्री जे न देखे चंद्र ते देखे मंत्री! बाई, तुम्ही फार चांगल्या आहात, भोळ्या आहात, प्रेमळ आहात



पण म्हणूनच तुम्ही–माफ करा–फसताहात.

**सौ. शहाणे :** होय. मी फसतेच आहे. पुरती फसले आहे.

**रामराव :** फसताहात आणि वाया जाताहात. तुमच्यासारखी एक थोर व्यक्ती वाया जावी हे बघवत नाही बघा आम्हांला. आता, तुमच्या साहेबांची नोकरी गेली. त्यांच्यावर आरोप लागले, ते त्या गोड्यांचं काम! पण तुमचीही नोकरी गेल्याचं कळलं आणि आश्चर्य वाटलं. अहो, बेकारीचा भस्मासुर नष्ट करणं हे तर आद्य कर्तव्य आहे माझं. आणि तुमच्यासारखी लायक माणसं तर प्रथम अधिकारपदावर पोचली पाहिजेत. तुम्ही अशा कामाशिवाय का राहता? हल्ली तर बायका देशांच्या पंतप्रधान बनतात. तुम्हीही घराबाहेर पडा, मोठ्या व्हा, खूप मोठ्या व्हा. तुम्हाला सर्वतोपरी साथ करीन मी. सध्याच मला एका स्त्रीची आवश्यकता आहे. हरवलेली मुलं शोधणं, मुलांचं नीट संगोपन करणं, समाजकल्याण, कुटुंबनियोजन, परदेशी प्रवाशांना पर्यटनाच्या सोयी उपलब्ध करून देणं... अशी कितीतरी खाती आहेत माझ्याकडे. खरं म्हणजे ही स्त्रियांची कामं. स्त्री म्हणजे संस्कृती! म्हणूनच माझ्याबरोबर कायम राहून काम करणारी कुणीतरी सुसंस्कृत स्त्री हवी आहे आम्हांला. अगदी थेट तुमच्यासारखी! तुम्ही याल?... तुम्ही बोलत नाही? काही अडचण आहे काय? सांगा. आपण सोडवून टाकू. बोला, कसल्या संकटात आहात तुम्ही?

**सौ. शहाणे :** कृपा करा अन् ताबडतोब निघून जा.

**रामराव :** तुम्ही संकटात दिसता अन् मी निघून जाऊ?

**सौ. शहाणे :** मूर्तिमंत संकट आहात तुम्ही.

**रामराव :** मूर्तिमंत सुटका आहे मी.

**सौ. शहाणे :** भूकंपातसुद्धा हे घर हादरलं नाही ते तुमच्या धक्क्यानं हादरलं. वादळातसुद्धा या छपरावर कधी नारळ पडला नाही ते तुमच्यामुळे दगडगोटे येऊ लागले. निवडणुकीत तुम्ही निवडून आलात आणि या घरात विंचू आले, साप आले, आणि आज तुम्ही आलात.

**रामराव :** या गोष्टींचा आणि माझा काय संबंध? भुताटकीच म्हटली पाहिजे.

**सौ. शहाणे :** ते भूत आहात तुम्ही.

**रामराव :** बस्स करा, बाईसाहेब. तुमच्या साहेबांच्या पापांची भुतावळ आहे ही. शीलाताईंच्या अतृप्त वासनांची भुतं छळताहेत त्यांना. गरीब होती बिचारी.

**सौ. शहाणे :** राक्षस आहात तुम्ही. शीलाचं वाटोळं करून वर तो आरोप आमच्यावर लादताहात.

**रामराव :** कीव येते मला तुमच्या भोळेपणाची, नव्हे अज्ञानाची, बाई! हा पाहिलात शीलाचा आणि तुमच्या साहेबांचा फोटो!

**सौ. शहाणे :** या फोटोनं तुम्ही जगाला फसवलंत. मला माझ्याशिवाय कुणाची खात्री पटवून देता येणार नाही; पण तुमच्या काळजाचा काळाकुट्ट फोटो मात्र बघितलाय मी.

**रामराव :** कारण तुमची नजर आंधळी झालीय. नवऱ्यावर इतकं आंधळं प्रेम करणारी मूर्ख बाई मी पाहिली नव्हती आजवर. ती शीला–नावाचीच शीला–माझीच खाजगी सेवा करीत होती. न संपणारं घरकाम, पडलेला नालायक नवरा, लहानसान पोरं आणि माझी पूर्ण वेळ नोकरी सांभाळून परीक्षेत पहिलं यायला तिला कसं जमलं? ती तुमच्या साहेबांचीच कृपा! कॉलेजच्या नाटकांत आणि साहेबांच्या निवडणुकीतल्या तमाशांत रात्री अपरात्री तिला सोबत लागत होती–तुमच्या साहेबांचीच. ते माझ्या घरी आले होते, तिच्या कच्च्याबच्च्यांकडे लक्ष द्या म्हणून! का, का एवढी 'आपुलकी?'

**सौ. शहाणे :** पुरे, पुरे करा हा खोटेपणा. भोळे सांब कोण आणि खोटे खांब कोण हे आम्हा स्त्रियांना चांगलं समजतं.

**रामराव :** आणि पुरुषाची जात शेवटी कशी असते हे आम्हा पुरुषांनाच समजतं! त्यातून या 'चालू' काळात––

**सौ. शहाणे :** चालू लागा! स्वत:वरून जग ओळखताहात तुम्ही? पुरुष आणि स्त्री जवळ आली की, जनावरंच झाली असं मानता तुम्ही? निघून जा इथून. तुम्हांला शरम नाही; पण तुम्हांला बेशरम म्हणायलासुद्धा मला शरम वाटते. वास्तविक तुमची शोभा पाद्यपूजा करूनच करायला पाहिजे. पण कितीही संताप आला तरी माझी जीभ अपशब्दांचा उच्चार करणार नाही आणि माझा हात पायातली वहाण काढून हातात घेणार नाही. पण तोंडात अपशब्द नाही आणि हातात वहाण नाही म्हणून मनात संताप नाही आणि संतापात जोर नाही असं समजू नका. चालू लागा.

**रामराव :** तुम्हाला राग आला? माफ करा! मी जाणारच आहे. पण तुमची सुटका करून जाणार आहे. तुमचा मुलगा–

**सौ. शहाणे :** कुठं आहे तो?

**रामराव :** मला काय माहीत?

**सौ. शहाणे :** तुम्हांलाच माहिती आहे.

**रामराव :** माझी माणसं पाठवीन मी त्याच्या शोधासाठी. पण इथल्या विहिरीत नाही तो. विहिरीवर फक्त त्याचे कपडे दिसले.

**सौ. शहाणे :** मग आहे कुठं? सुरक्षित आहे ना? का छळता त्याला? त्यानं काय केलंय हो तुमचं? अहो, इतका आईवेडा आहे तो! रडून रडून जीव जायची वेळ आली असेल त्याची. सांगा ना. गप्प का? असे कठोर का होता? मला भीक घाला एवढी. काय वाटेल ते करायला सांगा; पण मला माझा मुलगा द्या हो.

**रामराव :** सांगितलं ना, मला ठाऊक नाही.

**सौ. शहाणे :** नका हो असं करू, त्याचा जीव कासावीस झाला असेल हो!

**रामराव :** मी प्रयत्न करीन शोधायचा. पण माझं एक काम तुम्ही–तूही केलं पाहिजेस.

**सौ. शहाणे :** सांगा. सांगा लवकर. करीन मी.

**रामराव :** जास्त काही नाही. फक्त या कागदावर एक सही कर.

**सौ. शहाणे :** (चटकन कागद घेऊन) काय? घटस्फोट? शहाण्यांचा शीलाशी अनैतिक संबंध होता म्हणून घटस्फोट? शीलाचा खून शहाण्यांनीच केला म्हणून घटस्फोट?

**रामराव :** होय. घटस्फोट.

**सौ. शहाणे :** अहो, काय सांगता हे?

**रामराव :** योग्य तेच सांगतो आहे! ही शिक्षा आहे त्या शहाण्याला या रामरावाला विरोध केला म्हणून! या शहाण्यानं, विश्वाससारख्या त्याच्या मित्रानं, सुधीरसारख्या त्याच्या शिष्यानं, शीलासारख्या त्याच्या शिष्येनं माझी केलेली बदनामी भरून निघालीच पाहिजे. माझ्यावर त्यांनी चिखलफेक केली. तीच आता उलटली.

**सौ. शहाणे :** खोटं आहे हे. यांनी कुणाचीही बदनामी नाही केली.

**रामराव :** माझी बदनामी झाली हे सत्य आहे. शहाणे म्हणजे नीतीची मूर्ती आणि मी म्हणजे अनीतीची मूर्ती असंच लोक मानीत होते!

**सौ. शहाणे :** कारण तुमचे निवडून येण्याचे मार्ग लोक प्रत्यक्षच पाहत होते.

**रामराव :** पण आता मी निवडून आलो आहे. आता मला नवयुग आणायचं आहे. नवं स्वप्न साकार करायचं आहे. नवा धर्म प्रवर्तित करायचा आहे. माझी प्रतिमा मला उजळून काढलीच पाहिजे.

**सौ. शहाणे :** आणि त्यासाठी दुसऱ्याची डागळली पाहिजे?

**रामराव :** म्हणजेच माझं स्थान चिरंजीव होणार आहे.

**सौ. शहाणे :** दुसऱ्याला मारून?

**रामराव :** ते मी करणार आहे! आता माझ्या मार्गात कोणी आडवा येणार नाही. आलेला मला खपणार नाही. आला तर त्याला कापल्याशिवाय मी सोडणार नाही. माझी विजयाची घोडदौड आता अखेरपर्यंत अनिर्बंध चालूच राहणार. आणि शहाण्यांनी विजयी वीरांचीच पूजा बांधावी. शहाणेबाई, मी हात पुढे केला आहे तो आपणहून हातात घ्या आणि सुखी व्हा.

**सौ. शहाणे :** आणि नाही घेतला तर?

**रामराव :** तर मी सक्तीनं घेईन. निवडणुकीत हजारो लोकांचे हात मी हातात घेतले. लाखो लोकांनी माझे हात बळकट केले. त्या माझ्या हाताला हा एक हात अशक्य आहे की काय? (हात धरून) कपाळावर पराभवच लिहिलेला असताना आणि पोटभर पराभवच खाल्लेला असताना तुला प्रयत्न तरी का करावासा वाटतो? शीला गेली तिच्याऐवजी दुसरी एक होती तिचाही मला कंटाळा आला म्हणून मी तिला सोडून दिली. आता मला तुझ्यासारखीची सोबत हवी आहे. तुझा कंटाळा येईल असं वाटत नाही. तुझी बुद्धिमत्ता माझी करमणूक करील. तू मला सुख दे. मी तुला सुख देईन. तुझ्या सुखासाठी वाटेल तर त्या मूर्ख शहाण्याला फाशीऐवजी जन्मठेपेवर पाठवीन आणि त्याची पोरं एखाद्या होस्टेलवर ठेवून देईन. चल. कर सही. घे घटस्फोट. घे घटस्फोट. घे घटस्फोट.



**शहाणे :** (दारात येतात. कपडे भिजलेले. अंगावर जखमा.) घे घटस्फोट. घे घटस्फोट. घे घटस्फोट. चल नीघ या घरातून. बेशरम. मी घरात नसलो की तुझे हेच चाळे चालत नाही का? आजवर फक्त ऐकत होतो. आज पक्की खात्री झाली. ही एवढी पोरं आणून घातलीस माझ्या घरी? काळी कुळकुळीत कोकिळा!... आणि मला कावळ्याची कळा आणलीस? चल. नीघ. कुत्री कुठली!

(रामराव चकित होऊन निघून जातो.)

**सौ. शहाणे :** (रडत) तुमचे कपडे फाटले, तुमचं मन फाटलं, आणि तुमची बुद्धीही फाटली का हो? या एवढ्या जखमा कसल्या? आघातांनी आणि धक्क्यांनी स्मृती जाते म्हणतात, तशी तुमची स्मृती गेली का हो?

**शहाणे :** विस्मृतीचं वरदानसुद्धा मागून मिळत नाही, समजलीस? त्यालाही भाग्य लागतं! इतक्या वेळा मी डोकं फोडून घेतलं म्हणून या खोका पडल्या. वाटलं होतं की त्यामुळं तरी बुद्धिभ्रंश होईल! पण तो होईना!

**सौ. शहाणे :** का एवढा छळ मांडला आहेत स्वत:चाच?

**शहाणे :** तुझ्या सुखात व्यत्यय नको म्हणून! आजवर दुसरीकडे जे चाललं होतं ते आता घरात सुरू झाल्यावर डोकं फोडून घेऊ नको तर काय करू? माझी मुलं माझी मुलं म्हणून वाढवली ती कारटी सारी दुसऱ्यांचीच–डोळ्यांसमोर नकोत माझ्या ती! उचल आणि घेऊन जा. ती कोकिळा अंडी घालते कावळ्याच्या घरात, पण आपण जाऊन मुक्काम नाही ठोकत तिथं आणि तिची पिलंसुद्धा पंख फुटले की जातात दूर उडून. पण ही मानवी कोकिळा आणि तिची पिलं––

**सौ. शहाणे :** अहो, काय बरळता हे? लोक ऐकतील!

**शहाणे :** लोक आहेतच बाहेर. आणखीही जमतील. जमू देत. त्यांनी ऐकावं म्हणूनच ओरडतोय. इथूनच काय, चौकाचौकांत उभं राहून बोंबलून सांगेन की ही बायको माझी ठेवलेली बाईसुद्धा नाही आणि ही पोरं माझी पोरं नाहीत.

**सौ. शहाणे :** (रडू लागतात. मग हळूच) बाळचा पत्ता लागला का तुम्हाला?

**शहाणे** : नाही.

**सौ. शहाणे** : मला लागला.

**शहाणे** : (एकदम आवेगाने हळू आवाजात) कुठं आहे तो? कुठं आहे?

**सौ. शहाणे** : तो तुमचा कोणी नव्हे ना? मग का जीव कळवळला तुमचा?

**शहाणे** : तुझा आणि मुलांचा जीव वाचवण्याचा तेवढा एकच मार्ग आहे आता! तू घटस्फोट घेणं आणि मुलं दुसऱ्याची आहेत असं जाहीर करणं!

**सौ. शहाणे** : का?

**शहाणे** : या रामरावाचं वैर माझा आणि माझ्याबरोबर माझ्या बायको-मुलांचाही संपूर्ण नाश केल्यावाचून आवरायचं नाही. सुजन विहिरीत पडला ही आवईच होती. त्याचे कपडे मी काठावर पाहिले आणि आत उडी मारली. मी उडी मारली आणि वरून दगडफेक सुरू झाली! मी चपापलो. एक धोंडा डोक्यात बसला अन् डोक्यात प्रकाश पडला माझ्या. 'मेलो, मेलो' असं केविलवाणं मी ओरडलो आणि विहिरीत बुडून पाण्याखालून पलीकडे जाऊन पायऱ्यांखाली लपून राहिलो. वर कुणीतरी बोलत होतं. 'आरं चला. ते पाप्याचं पितर. एका खड्यानं मरल. आपुन तर धोंड्यांचा पाऊस पाडला. माझा धोंडा तर नेमबाज टकुऱ्यावर बसला बघ. गेलं ते पाण्याखाली. येईल आता फुगून उद्या वर. पोरगं मेलं. बाप मेला. आता बाकी काय किरकोळ खुर्दा.' दुसरा म्हणतो, 'खुर्दा कशानं मर्दा? आपल्याला तर भरभक्कम रक्कम भेटणार. चला'... या घरावर आता दगड, विंचू, साप, चोर, गुंड, मवाली यांचा पाऊस पडणार. इतक्या सरी येऊन गेल्या. आपण जेमतेम बचावलो. पण आता घर खचलं. भिंती फुटल्या. छप्पर फाटलं. आता आणखी एक सर आली तरी आपण टिकणार नाही. म्हणून म्हणतो, तू घटस्फोट घे, पोरं दुसऱ्याची आहेत असं सांग, मी नपुंसक होतो असं जाहीर कर! नाहीतरी मी तसाच ठरलो आहे!

**सौ. शहाणे** : अहो, यावर आपला शत्रू तरी विश्वास ठेवील का? तो रामराव, शीलाचा खून तिला भ्रष्ट करून तुम्हीच केलात असं माझ्याकडून लिहून मागत होता आणि त्या मोबदल्यात जन्मठेपेचं जीवदान तुम्हांला देऊ करीत होता. पण तोंडानं हे जीवदान देत असताना तिकडे तुमच्या खुनाचं कारस्थान घडवीत होता! मग मी घटस्फोट घेतला तरी पोरांची जीवितं राहतीलच याची काय खात्री? सुजनची झाली तीच अवस्था सगळ्यांची! (जरा वेळ हुंदके देऊन) आपली बेअब्रू आपल्याकडूनच जाहीर करवून घ्यायची आणि वर आपला निर्वंशही करायचा, असा दुहेरी डाव आहे त्याचा! नुसतं गवत खुडायचं, जाळायचं नाही तर वर काँक्रीटचे थर थापायचे. म्हणजे पुन: कधी कुणी यावच्चंद्रदिवाकरौ वर डोकं काढायला नको!

**शहाणे** : काय करू, काय करू आता?

**सौ. शहाणे** : आता विश्वास भाऊजींकडे जायचं. आणि मघाशी ठरवलं तसं करायचं. पण लोक यावरही टपलेले असणार. दिवसा मुलीच्या अंगावर लोक हात टाकतात. तुम्हांला विहिरीत ढकलतात. रात्री तर? नको. उद्या सकाळची वाट पाहिली पाहिजे. एवढी रात्र जागून काढली पाहिजे.

**शहाणे** : हो हो. जागलंच पाहिजे. तू मुलांकडे पाहा. त्यांच्या पोटांत चार घास घाल. तेवढं धान्य आहे ना घरात?

**सौ. शहाणे** : ते बघते मी. पण तुम्ही इथं स्वस्थ पडा. उगीच भलतेसलते विचार डोक्यात आणू नका. जाऊ मी?

**शहाणे** : जा, पण लवकर ये.

(सौ. शहाणे आत जातात. एक दगड वरून पडतो.)

**शहाणे** : सुमित्रा, वेडे सुमित्रा, कशाला भाताचं तपेलं चुलीवर चढवतेस? कढ येऊन वाफ निघेपर्यंत दम तुला निघेल. आपल्या पोरांनाही निघेल; पण ते भाताचं तपेलं चुलीवर चढेपर्यंत तरी दम निघेल का आपल्या शत्रूंना? ते वरून विंचू टाकणार, खालून साप सोडणार. किती परतवणार तू आणि किती मारणार मी! इथे आत हे प्राण्यांतले साप आणि विंचू, आणि बाहेर माणसांतले साप आणि विंचू! सुमित्रा, कसा निभाव लागायचा यांच्यापुढे? सुमित्रा, तुला कळलंय सारं. तुला सारं कळलंय. पण तू फसवते आहेस मला आणि

मुलांना! पण सुमित्रा, तू त्या मानवी सापाविंचवांना कसं फसवशील? त्यांना सोडून कुठं पळशील? त्यांच्या विषावर फुंकर कुठून घालशील, उतारा कुठून करशील? घरात बसलं, दारं खिडक्या लावली की साप येत नाही, तसं लोकशाहीच्या मंदिरात बसलं की मानवी साप चावणार नाहीत असं वाटलं होतं. पण लोकशाहीच्या द्रव्यावर जिकडे तिकडे सापच बसले आहेत. लोकशाही म्हणजे जीवनाचं वैभव! पण ते या नागोबांनी अडवून ठेवलंय. आणि बाकी सगळे लोक उंदराप्रमाणं त्यांना घाबरताहेत. सत्तेवर साप आणि सत्तेखाली सगळे उंदीर! माणसं कुठं आहेत? माणसं कुठे आहेत? माणसं कुठे आहेत? कशाला टाहो फोडायचा? कुणाला हाका मारायच्या? कुणाची वाट पाहायची? साप आणि उंदीर! साप झालं पाहिजे नाहीतर उंदीर झालं पाहिजे! साप, नाहीतर उंदीर! साप, नाहीतर उंदीर! माणसांचेच साप झाले, माणसांचेच उंदीर झाले म्हणून का जनावरातले साप, उंदीर कमी होत चालले? मानवी सापापुढे प्राणी साप लाजून मेले का? मानवी उंदरांपुढे प्राणी उंदीर शरमले का? हाच का मानवानं प्राणिसृष्टीवर मिळवलेला विजय? हीच का सृष्टीच्या प्रगतीची सीमा? हाच का विधात्याचा अंतिम हेतू? बोल सुमित्रा, विनाकारण चावणारी साप होणार की त्याच सापापुढे दयेची याचना करीत बळी जाणारी उंदीर होणार? (शहाणे बाहेर जातात.)

(एक दारुड्या झिंगत आत येतो. त्याच्या हातांत दोन बाटल्या. मोठ्यानं म्हणतो, 'बाटली...' ओरडा ऐकून आतून सौ. शहाणे, पल्लवी येतात.)

**दारुड्या** : छोटी बाटली–मोठी बाटली–छोटी बाट–ली–मोठी बाट–ली–छोटी बाटली–मोठी बाटली–मोठी बाटली–छोटी वाटली–छोटी बाटली–मोठी वाटली–छोटी मोठी–मोटी छोटी–छोर्री मोर्री–मोर्री–छोर्री–मोठी–बॉयली–छोटी बॉयली–बाटली बाटली–मज्जा आल्ली–बाटली चढली–मस्ती चढली– छोटी बाटली–मोठी बाटली–हातभट्टी–आमची गट्टी– उंची शराब–वरची पट्टी– हातभट्टी–नाही ऐकत–नाही मानत–करते विरोध–लाथा झाडत–हात आपटत–माना उडवत–डोळे



मोडत–अंग ओढत–घसा फोडत–हातभट्टी–मस्त कुस्ती–छोटी बाटली–मोठी बाटली–छोटी छाटली–मोठी काटली–छोटी लाटली–मोठी लुटली. छोटी बाटली–उलटी केली–मोठी बालटी–पालटी केली– उंची दारू–मंचावरती–हातभट्टी मिट्टीवरती–देते छुट्टी–चुटकीसरशी–छुट्टीछुट्टी छोटी कुठली–मोठी कुठली–बाटली कुठली–बाटली आटली–मस्त बाटली–चाटली चाटली–संपल्यावरती फोडून टाकली–झोकून दिली–फेकून दिली–ओढून घेतली–लाथ घातली–

(दारुड्या दोघींना आडवून आतल्या दाराकडे जाण्याचा प्रयत्न करतो.बाहेरून येऊन शहाणे त्याला हाकलून देण्याचा प्रयत्न करतात. म्हणतात, 'अग ए, आतली मोठी काठी आण पाहू.' त्याचवेळी 'अहो, अहो, लवकर आत चला, साप!' असे सौ. शहाणे म्हणतात. काठी देतात, तेव्हा शहाणे दारुड्याला बाहेर ढकलून देतात. आणि दार लावतात. सौ. शहाणे म्हणतात, 'अहो, मोरीतून मोठा थोरला साप आला होता आतमध्ये. मी काठी आपटली तशी बाहेर गेला. पुन: आल्यावाचून राहायचा नाही तो. चला आत. तुम्ही लक्ष ठेवा. मी भात करते.' आत जाऊ लागतात इतक्यात छपरातून आगीचा बोळा पुस्तकाच्या कपाटावर पडतो. शहाणे धावत जाऊन तो विझवतात; म्हणतात, 'मी बाहेरच लक्ष ठेवतो. तू आत ठेव.' इतक्यात पल्लवी 'विंचू, विंचू' म्हणून ओरडते; बाहेर येतात शहाणे जाऊन विंचू मारून येतात. पल्लवी म्हणते, 'बाबा, सगळी दारं–खिडक्या घट्ट लावली नाहीत का हो? आई, मला जवळ घे.' शहाणे म्हणतात, 'विंचू मारलाय हो मी. तुम्ही जरा बसा आतल्या खोलीत. थोडं लक्ष ठेवा हं. हल्ली विंचू–साप फारच माजलेत.' सौ. शहाणे, पल्लवी जातात. शहाणे विचारक्रान्त. इतक्यात कुठूनतरी विकट हास्य ऐकू येते आणि एक आवाज बोलू लागतो.)

**एक आवाज** : काय, फिटली का हौस तुझी लोकशाहीची?

**शहाणे** : अरे, लोकांचीच हौस पुरवणार होतो मी.

**आवाज** : मग बायकोमुलांची हौस?

**शहाणे** : सगळ्या लोकांची हौस पुरली असती म्हणजे बायकोची आणि मुलांची हौसपण पुरलीच असती.

**आवाज** : हुं:! त्यांची नुसती जगण्याची हौस तरी भागवलीस का?

**शहाणे** : (अवाक).

**आवाज** : बोलत का नाहीस? कबूल कर 'नाही' म्हणून.

**शहाणे** : नाही.

**आवाज** : 'स्वराज्य हा जन्मसिद्ध अधिकार आहे' म्हणून जगभर घोषणा केल्यास आणि घरच्या माणसांना जगायचीसुद्धा बंदी केलीस!

**शहाणे** : होय.

**आवाज** : मग घे प्रायश्चित्त. मर! लोकांना भ्याड उंदीर म्हणालास; मग तू मर की न भिता, माणसासारखा!

**शहाणे** : मी तयार आहे. पण...

**आवाज** : 'पण' काय? बायकोमुलं तयार नाहीत? त्यांनाही तयार करणार? त्यांना मारणार? मग त्या शत्रूंना का नाही मारत?

**शहाणे** : नाही, मी हिंस्र पशू नाही, मला हिंस्र पशू व्हायचं नाही, मला ते जमायचं नाही. मी माणूस आहे. मी माणसाला मारून खाणार नाही. मी मरेन; पण दुसऱ्याच्या मरणावर जगणार नाही. नाही. नाही

**आवाज** : स्वत:च्या बायकोमुलांना मात्र मारणार! हक्कानं!

**शहाणे** : दुसऱ्या कोणी त्यांना मारून खाऊ नये म्हणून! माझ्या शत्रूंनी त्यांच्यावरही दात धरला आहे, त्यांनी सावकाश चावून चावून त्यांचा चोथा करू नये म्हणून! या यातनांतून त्यांची चटकन सुटका व्हावी म्हणून!

**आवाज** : मरणं महत्त्वाचं की जगणं? अरे, आधी जगलं पाहिजे, काय वाटेल ते करून. दुष्टांना मारून. अरे, ते दुष्टच ना, ते आणखी किती दुष्टपणा करतील.

**शहाणे** : ते दुष्ट झाल्याशिवाय कसं कळणार?

**आवाज** : पण सगळं जग दुष्टांनीच भरलंय ना?

**शहाणे** : मग सगळ्या जगाला मारणं हा सुष्टपणा का?

**आवाज** : काय बिघडलं? दुष्ट लोकांना मारलं म्हणून काय बिघडलं? दुष्ट लोक कधीच सुष्ट होत नाहीत ना? दुष्ट लोकांनी दुष्टपणाच करावा हेच नैसर्गिक नाही काय?

**शहाणे** : आणि सुष्ट लोकांनी सुष्टपणाच करावा हेच नैसर्गिक नाही काय?

**आवाज** : अरे कसले हे लोक आणि कसलं त्यांचं जग! रान माजलं आहे नुसतं. नागसापांचं राज्य आहे इथं. ते इतर प्राण्यांना मारूनच जगणार.



**शहाणे** : पण त्याच रानातले उंदीर आणि ससे, शेळ्या आणि गाई, हरणं आणि हत्ती कुणालाही मारणार नाहीत दुष्काळ पडला तरी... ...पण रानातले उंदीरससेसुद्धा एकजूट करून पळवून लावतात नागसापाला; आणि मानवी उंदीर मात्र त्यांची एकजूट करणाऱ्यालाच बळी देतात मानवी सापापुढे!

**आवाज** : आता हे शहाणपण सांगतो आहेस! आधी माहीत नव्हतं?

**शहाणे** : माहीत होतं. सगळं माहीत होतं. सगळं वाङ्मय हेच सांगत होतं. अवतीभोवती हेच दिसत होतं. सुधाराची लक्षणं कुठंच नव्हती!

**आवाज** : मग का, का केलंस हे सारं?

**शहाणे** : घराला आग लागली आणि आगीतून तान्हं पोर रडून आक्रोश करू लागलं म्हणून त्या घरात उडी घातली तर चुकलंच म्हणायचं का? मानवाचं मूल काय आणि मानवाचं मूल्य काय, एकच नाही का? शीलासारख्या मुलीच्या शीलावर घाला पडत असताना रामरावाला अडवल्यावाचून राहवेल का? बाळ विहिरीत पडला आहे असं कळलं तर उडी टाकल्यावाचून बसवेल का? ते आगीतलं पोर गेलं! शीला गेली! बाळ गेला! --तूही जा! -मीही येतोच! आणि सुमित्रा....... सुमित्राबाई, तुमची गाठ आमच्या पदरात बांधली गेली पण आमची गाठ रामरावाशी पडली! सुमित्राबाई, आमची हौस तुम्ही पुरवलीत, पण तुमची हौस मात्र आम्ही पुरती मारली! सुमित्राबाई, आमच्या मर्यादा आम्हांला समजल्या, पण तुमचा थांग आम्हांला नाही लागला! बाई, तुम्ही आम्हांला टाकून गेला असतात तरी आमच्यावर उपकारच झाले असते, पण तुम्ही आम्हांला कधी टाकून बोललादेखील नाहीत! का? का असं? अहो, तुम्ही एकदा तरी रागवायला हवं होतं आमच्यावर; म्हणजे तुम्ही आम्हांला आमच्या बरोबरीच्या वाटला असतात! न रागवता कसं गिळता येतं तुम्हाला सगळं? जे जीवन आम्हांला गिळून टाकतंय ते तुम्ही गिळून टाकलंत? सुमित्राबाई, एकदा तरी रागवा, ओरडा, म्हणजे आम्हांलाच बरं वाटेल!......सुमित्रा, सुमित्रा, मला क्षमा कर असं तरी कसं म्हणू तुला? शिक्षा

करायची तिथंही प्रेमच केलंस तू! वेड्या वाटचालीतही साथच दिलीस तू! मी भरकटलो आणि हू की चू न करता तू माझ्यामागे ठेचकाळलीस, फरपटलीस! सुमित्रा... सुमित्रा...

(सौ. शहाणे येतात.)

**सौ. शहाणे** : काही खरं नाही. आजची रात्र निभावत नाही. पुन: दगड येणार. पुन: विंचू निघणार. पुन: साप शिरणार. पुन: आगीचे बोळे पडणार.

**शहाणे** : आपल्या सर्वांचा सर्वनाश होईपर्यंत हेच चालणार! पुन: जगाला जाहिरात की साप चावून मेले. आग लागून जळाले.

**सौ. शहाणे** : असं किडामुंगीसारखं मरण्यापेक्षा---

**शहाणे** : काय? काय?

**सौ. शहाणे** : माणसासारखं तरी मरू या.

**शहाणे** : काय बोलतेस हे सुमित्रा?

**सौ. शहाणे** : खरं तेच बोलते. एकवेळ या विंचवा-सापांना दया येईल पण या मारेकऱ्यांना दया येणार नाही.

**शहाणे** : सुमित्रा, माझ्यापेक्षा तूच थोर आहेस! तूच सत्य ओळखलंस, सत्याचं दर्शन घेतलंस, सत्य जिंकलंस.

**सौ. शहाणे** : जिवंत राहणं शक्य नाही हेच सत्य!

**शहाणे** : पण.....मुलांचं?

**सौ. शहाणे** : बाळचं काय झालं? तेच होणार ना त्यांचं? विटंबनेशिवाय मरण की विटंबनेसहित मरण एवढाच प्रश्न उरलाय आता. त्याचं उत्तर द्या. एक आपल्या हातात आहे. दुसरं आपल्या नशिबात आहे.

**शहाणे** : माझ्यावर प्रेम केलंस त्याचं तुला हे फळ मिळालं! तुझ्याबरोबर तुझ्या पोरांनापण! सुमित्रा, आपली पोरं किती शहाणी आहेत बघ. त्यांनासुद्धा प्रसंग कळला. त्यांनी हट्ट केला नाही. जेवणसुद्धा मागितलं नाही. आज्ञाधारकपणानं, सुजाणपणानं आपल्या खोलीची राखण करीत बसलीत ती. आपण आपल्या लहानपणी इतके समंजस होतो का ग? निदान मी तरी नव्हतोच नव्हतो. अजूनसुद्धा नाहीच. किती मोठी आहेत आत्ताच आपली मुलं. पण या मोठेपणाबद्दल त्यांना बक्षीस काय द्यायचं? विष?



**सौ. शहाणे** : अहो, विष तरी कुठं आहे आपल्याजवळ?

**शहाणे** : आहे. ही बाटली.

**सौ. शहाणे** : लपवून ठेवलेली.

**शहाणे** : उघडायला मन होत नव्हतं.

**सौ. शहाणे** : हिंसा..... हिंसा नको........ उपद्रवी किड्यांचीसुद्धा!.... पण आता उपयोगी पडेल.

**शहाणे** : घाल तिला भाताच्या पेजेत. पाज सर्वांना. तीच आपली संजीवनी. तेच आपलं अमृत.

(सौ. शहाणे आत जातात. शहाणे पुन: दार लावून कडी घालतात. आणि मग कपाटावरून एक मोठी शिवणाची कात्री काढतात. मुले ओरडत आहेतच. मुलांची एक हाक आली की, आपल्या अंगावर एकदा मारून घेतात! सौ. शहाणे आतून म्हणतात, 'अहो दार उघडा ना! दार का लावता? काय करता? उघडा ना दार. असं दूर का लोटता आम्हाला? माझी शुद्ध चाललीय हो. मला चक्कर येतेय हो. मी पडतेय हो. अहो अहो, दार उघडा, उघडा. एकदा मुलांना पाहा. पाहा. गेली हो गेली! मधुर....पल्लवी.... अहो, उघडा हो दार. शहाणे दार उघडतात. आत पाहतात.)

**सौ. शहाणे** : (येत) काय केलंत हे? कशाला, कशाला वार केलेत स्वत:वर? किती सोसलंत हो?

**शहाणे** : सुमित्रा....सुमित्रा.... मला क्षमा कर!

**सौ. शहाणे** : किती सोसलंत! किती मोठे आहात हो तुम्ही! माझं भाग्य...

(दोघे पडतात. थोड्याच वेळात दारावर धक्के बसतात. 'दार उघडा, दार उघडा' असा ओरडा होतो. शेवटी दार पडते. दारावरील लो. टिळकांची तसबीर पडते. रामराव येतो. त्याच्या मागोमाग दारुड्या गुंड, गोडे, बातमीदार, इन्स्पेक्टर येतात.)

**रामराव** : अरेरे! वाईट झालं. वाईट झालं. फार वाईट झालं! शहाणेसाहेब, बाई, आपण कसे हो आम्हांला सोडून गेलात? डॉक्टरांना बोलवा रे कुणी तर लवकर. पाहा अजून उपचार होतो आहे का? चला, आत पाहू या मुलंबाळं तरी जिवंत आहेत का?

(सर्वजण आत जातात. थोड्याच वेळात, 'छे, छे बघवत नाही बघा मला' म्हणत रामराव बाहेर येतो. त्याच्या पाठोपाठ दारुड्या गुंड येऊन बाहेर जातो.)

**गोडे** : (आतून येत) अभिनंदन, साहेब! तुमच्या पायातला काटा

पुरता निघाला.

**रामराव** : कुणाची माय व्यायलीय या जगात मला विरोध करण्याची? चिरडलाच जाईल तो माझ्या अंगाखाली असा किडामुंगीसारखा.

**गोडे** : हा पुस्तकातला किडा शेवटी चिरडला तुमच्याच अंगाखाली.

**रामराव** : आमची वजनदारी आहेच तशी.

**गोडे** : पण तुम्ही नाही चिरडलात तो!

**रामराव** : मग कोणी? तुम्ही?

**गोडे** : मी जातो इथून. म्हणजे कळेल कोणी ते! अहो, शहाणे मेला; पण त्याचं भूत झपाटेल लोकांना आणि बसेल तुमच्या डोक्यावर तेव्हा समजेल. ती पाहा माणसं आलीच. साहेब, शहाण्याला गाडला या गोड्यानंच आणि त्याचं भूत गाडायलाही हवा हा गोडेच.

**रामराव** : प्रिन्सिपॉल गोडेसाहेब, तुम्ही जाऊ नका.

**गोडे** : मग आधी आमचं श्रेय आम्हांला द्या.

**रामराव** : दिलं.

**गोडे** : शब्दाला काय किंमत? या कागदावर सही करा.

**रामराव** : काय? तुम्ही प्रिन्सिपॉल म्हणून कायम झाल्याची सही आत्ताच करू?

**गोडे** : तुम्हांला कायम पुढारी राहायचंय ना?

**रामराव** : हं. घ्या ही सही.

**गोडे** : थँक्यू. आता पुढच्या निवडणुकीत तुम्ही निवडून या न या. मी तर कायमचा प्रिन्सिपॉल झालो!

**रामराव** : स्वार्थी!

**गोडे** : मी की तुम्ही?

**रामराव** : कृतघ्न!

**गोडे** : मी की तुम्ही?

**रामराव** : नरपशू!

**गोडे** : मी की तुम्ही?

**रामराव** : गाठ माझ्याशी आहे.

**गोडे** : मारा मला. म्हणजे माझा, शहाण्यांचा, शीलाचा आणि दुसऱ्याही कित्येकांचा खून तुम्हीच केल्याचं पटेल लोकांना. ते पाहा लोक आलेच.

(बाहेरून दारुड्या गुंड आणि डॉक्टर येतात. आतून बातमीदार, इन्स्पेक्टर येतात. डॉक्टर शहाणे व बाईंना तपासून आत जातात.)

**बातमीदार** : खून की काय?

**गोडे** : खुळे की काय तुम्ही संपादक महाशय? अहो, दार आतून बंद होतं ना?

**बातमीदार** : हो हो. ते खरंच. पण... विषबाधा तर कुणी केली नसेल ना?

**गोडे** : ते डॉक्टर ठरवतीलच की.

(डॉक्टर येतात.)

**डॉक्टर** : विषबाधा!

**बातमीदार** : झालं? वाटलंच मला! अहो, बातमीदाराचा तर्क तो. खोटा ठरणार नाही.

**गोडे** : अहो, दुसऱ्या कोणी यांना विष घालायला यांच्याजवळ होतं काय? पैसाअडका? सोनंरुपं? की कोणाचं शत्रुत्व?

**बातमीदार** : हो हो. प्राचार्य शहाणे अजातशत्रू होते खरे. पण त्यांनी निवडणूक लढवली म्हणून कोणी त्यांचे शत्रू बनले होते असं म्हणतात.

**गोडे** : अहो, शहाणे तर निवडणूक हरले. मग त्यांच्या विजयी प्रतिस्पर्ध्यांना त्यांचा त्रास व्हायचं काही कारण तरी आहे का?

**बातमीदार** : नाही. पण--

**गोडे** : अहो हे रामरावसाहेबच त्यांचे प्रतिपक्षी आहेत ना? कालच साहेब यांच्या घरी येऊन यांचा समाचार घेऊन गेले. यांच्या नोकऱ्या सुटल्या, तर त्यासुद्धा देऊ केल्या होत्या त्यांना यांनी. (दारुड्याकडे बोट दाखवीत) विचारा यांना.

**बातमीदार** : मग? -आत्महत्या तर नव्हे?

**गोडे** : आता तुम्ही बातमीदार शोभता! तुम्हांला शहाण्यांवरचे आरोप माहिती आहेत ना?

**बातमीदार** : हे काय विचारणं? अहो, आम्हा बातमीदारांना साऱ्या जगातल्या खऱ्याखोट्या आरोपांची माहिती असते. पण मग सहकुटुंब आत्महत्या कशी?

**डॉक्टर** : विषानं मृत्यू आलाय सगळ्यांना.

**इन्स्पेक्टर** : होय. ही बाटली.

**बातमीदार** : पण या अंगावरच्या जखमा?

**गोडे** : अहो, काल म्हणे ते विहिरीत पडले होते.

**बातमीदार** : पण या जखमा पाहा. या सुरीच्या आहेत. अन्....अन् ही रक्त लागलेली कात्री पाहा.

**गोडे** : आता खात्रीच झाली. मी सांगतो. अहो, हा सगळा या दोघांच्या कडाक्याच्या भांडणाचा परिणाम. दोघांच्या म्हणजे या नवराबायकोच्या! या दोघांही शहाण्यांचं कधी कुणाशी पटलं असेल तर शपथ. हे रामरावसाहेब, झालंच तर मी स्वत: कितीतरी वेळा यांच्या घरी येऊन चार हिताच्या गोष्टी सांगत होतो. पण पटवून घ्यायचं नाव नाही. अहो, या नवराबायकोचंसुद्धा एकमेकांशी पटत नव्हतं. पटेलच कसं? शहाण्यांवरचे आरोप आता जगजाहीर आहेत. हे आरोप सिद्ध होऊन त्यांना कॉलेजमधून काढल्यापासून तर रोज दोघांची खडाजंगी व्हायची घरी. नवराबायकोचं भांडण आणि मुलांचं कांडण! म्हणून तर ते घोडपोर गेलं घरातून पळून. शहाण्यांनी मात्र उठवलं की माझं पोर पळवून नेलं. अहो पळवून न्यायला ती काय पोरगी होती? काल असंच नवराबायकोचं जोरदार भांडण जुंपलं. आपले रामरावसाहेब चांगले समाचाराला गेलेले. पण नवराबायकोची हातघाई मग पाहुण्याकडे कोण पाही? शहाण्यांची एकच गर्जना. बायकोला बजावीत होते, 'घे घटस्फोट, घे घटस्फोट– ही पोरटी माझी नाहीत.' विचारा साहेबांना. ते आले निघून मुकाट्यानं. अहो, बाजू घेणार कुणाची? आणि कशी? दोघंही एकाच माळेचे मणी! शहाण्यांचं पाप त्या शीलाच्या घरी रांगतं आहे पाहा. आणि त्यांच्या बायकोविषयी काय बोलायचं? बोलणं जिवावर येतं माझ्या. पण शहाणेबुवा मुलींना कॉलेजातून घरी बोलावून घेऊन बसत. मुलीमागून मुलं येत. आणि शहाणेबाई त्यांच्यावर प्रेम करीत. आता सांगायला लाज वाटते मला; पण मी कामानिमित्त नेहमी यायचा ना यांच्या घरी; आलो की न चुकता बाई मला शिरा करून घालीत साजुक तुपातला, चांगले काजूबेदाणे घालून, आग्रह करकरून, आणि शहाणे घरात नसतानासुद्धा! शेवटी तर न राहवून शहाणेबाईंनी चक्क मला विचारलं, 'गोडे सर, आम्ही प्रेम केलं नाही का हो तुमच्यावर?' विचारा व्हाइस प्रिन्सिपॉलना. त्यांच्या समक्ष म्हणाल्या त्या असं! आता सांगा! काल खूप अकांडतांडव केलं दोघांनी. पुष्कळ लोकांनी ऐकलं बाहेर, पण नवराबायकोचं भांडण, त्यात मध्ये शिरणार कोण! दोघांच्या उखाळ्या-पाखाळ्या चाललेल्या! ते सगळं ऐकलं म्हणून मला वाटतं की शहाणेबाईंच्या शीलाची खात्री पटून शहाण्यांनी बायकोमुलांच्या अन्नात विष कालवलं आणि ते पोटात गेल्याचं कळताच चिडून शहाणेबाईंनी शिवणाच्या कात्रीनंच त्यांना मारलं! बरं झालं ब्याद गेली. कीड किडीला खाऊन मरते, तसंच झालं!

**रामराव** : प्रिन्सिपल गोडेसाहेब, मेलेल्याविषयी वाईट बोलू नये! झालं गेलं विसरून गेलं पाहिजे! म्हटलंच आहे, मरणान्तानि वैराणि! आणि आपलं तर त्यांच्याशी कसलंच वैर नव्हतं! शीला खून खटल्यामधील मुख्य व्यक्तीच गेल्यानं तो खटला अनिर्णितच राहणार. पण म्हणून शहाण्यांच्यावर खुनाचा आरोप करणं आपल्याला शोभत नाही. आपली खात्री असेल तरीही ती आपण मनातच ठेवली पाहिजे. शहाण्यांचं खाजगी जीवन जरा वेळ बाजूला ठेवू या. कारण करावं तसं भरावं या नात्यानं त्यांनी भरपाई केलेली आपण सर्वजण पाहतच आहोत. पण असं असूनसुद्धा आपण मात्र दुर्जनांच्यांतसुद्धा सद्गुणच पाहिले पाहिजेत. गोडेसाहेब, लगोलग कॉलेजमध्ये जाऊन सभा भरवून शोकप्रस्ताव मंजूर करा आणि पूर्ण मिनिटभर शांतता पाळा. म्हणजे शहाण्यांच्या सर्व शिष्यांचं आणि मित्रांचं सांत्वन होईल. माजी प्राचार्य शहाणे माझे प्रिय मित्र होते. माझा सख्खा भाऊ आणि त्याचे अख्खे कुटुंब नष्ट झाल्याचे कष्ट माझ्या जीवाला यातना देत आहेत. देशाला आणि जगाला या दुर्धर काळात त्यांच्यासारख्या माणसांची फार फार आवश्यकता होती. पण ईश्वरेच्छेपुढे आपला काय इलाज? कैलासवासी शहाणे यांना देवाज्ञा झाल्याने जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून काढण्याचे सामर्थ्य तो जगन्नियंता परमेश्वर आम्हांला देवो आणि आमच्या हातून

जनता जनार्दनाची कायम जन्मभर सेवा घडो! ईश्वर मृतात्म्यांना चिरशांती प्रदान करो!!

(बातमीदार हे सर्व लिहून घेतो. मग.)

**गोडे** : रामरावसाहेबांचा--

**सर्वजण** : विजय असो!

**रामराव** : सत्याचा--

**सर्वजण** : विजय असो!!!

* *

---

## सत्तेचा विजय असो!
## काही अभिप्राय

आजच्या सामाजिक अवस्थेचे, नैतिक अधःपाताचे नि राजकीय वर्चस्वामुळे चालणाऱ्या गुंडगिरीचे मार्मिक चित्र 'सत्तेचा विजय असो' या नाटकात केले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या संक्रमणकाळातील हा एक भीषण अध्याय आहे. सामाजिक जीवनातील भ्रष्टतेचे परिणामकारक चित्र या नाटकात दर्शविले आहे.

– साप्ताहिक गोमन्तक.

'सत्तेचा विजय असो' हे शिक्षणक्षेत्रात काही वेळा आढळणाऱ्या वस्तुस्थितीवर विदारक प्रकाश टाकणारे नाटक लिहिण्यात लेखकाने बरेच साहस दाखविले आहे. प्रस्तुत नाटक जरूर वाचावयास हवे.

– रविवार सकाळ.



# मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

**अ काव्य**

१. नव्या युगाच्या कविता

२. 'नवरा नको ग बाई' आणि इतर पथनाट्ये

**ष्ट कथा**

३. 'नको हे पुरुषी मन' आणि इतर लघुकथा

४. शुभ मंगल! विज्ञान!! (विज्ञान कथा)

५. 'अवतार' आणि इतर कथा

**पै नाटक**

६. मस्तानीचा बाजीराव

७. सत्तेचा विजय असो!

८. प्रीती मिळेल का हो?

९. गजराज आणि वनराज

१०. आग लागो या सगळ्याला

११. चल ये, चल ये, चल ये, बयेऽ

१२. 'निम्मी माझी, निम्मी तुझी' आणि इतर एकांकिका

**लू पटकथा**

१३. स्वातंत्र्यवीर

**सा कादंबरी**

१४. त्सुनामीची सुवर्णसंधी

१५ किलर इन्स्टिंक्ट

१६. अंतिम सत्य

**हि विज्ञान**

१७. विज्ञानाचा कल्पतरू

**त्यि समीक्षा**

१८. साहित्यातील प्रीती आणि भक्ती

१९. महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती

२०. केशवसुतःवैदिक संस्कृतीचा आधुनिक उद्गाता

२१. केशवसुत गातचि बसले!

२२. वैज्ञानिक समीक्षा

**क संकीर्ण**

२३. हिंदू समाजाचा छेदाभ्यास

२४. इंग्रजीत नापास? अशक्य!!!

२५. To Be, or Not To Be

पुस्तक कसं वाटलं? मराठी भाषेला स्वतःची अंगभूत ग्डी आहेच. त्यात डॉ जावडेकरांचं शैलीदार लिखाण. मजा आली ना? मराठी पुस्तक वाचताना नेहमीच मजा येते. मराठी आहेच तशी.

पण काय ही आज मराठीची दूरवस्था! आज महाराष्ट्रात दोन मराठी माणसेसुद्धा एकमेकांशी मराठीत बोलत नाहीत. महाराष्ट्रात दुकानांवर मराठी बोर्ड असावेत म्हणून "खळ्ळ खट्टाक" करावे लागते. मराठी कवी लेखकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. मराठी शाळा ओस आणि बंद पडत आहेत. पुस्तकांचं वाचन करायच्या वयात मुलं पाण्यासाठी वणवण करताहेत.

अशा वेळी मराठीचा डंका महाराष्ट्रात नव्हे, भारतात नव्हे तर जगभरात गजबजेल अशी स्वप्नं आम्ही पहातो. आमच्यासारखे अनेक लोक पहातात. २३०० वर्षांचा इतिहास असलेल्या या अमृतवाणी मराठी साहित्याचं सुवर्णयुग येईल अशी खात्री आम्ही बाळगतो. कारण मराठीत समृद्ध साहित्य आहे. कारण मराठी माणसांकडे बुद्धीमत्ता आहे. कारण मराठी माणसांकडे प्रतिभा आहे. कारण मराठी नवीन साहित्यिक आणि नवीन वाचकवर्ग उभा होताना आम्ही पहातो आहोत. बारा कोटी मराठी माणसांच्या या भाषेला अमरत्त्व आहेच आहे याची आम्हाला शंभर टक्के खात्री आहे. म्हणून आम्ही बारा लाख मराठी लेखक वाचकांचं नेटवर्क उभं करण्यासाठी झटत असतो. दर आठवड्याला नवनवीन ई पुस्तकं दोन लाख लोकांना विनामूल्य पाठवत असतो.

हा यज्ञ दिवसेंदिवस मोठे रूप घेतो आहे. आणि त्यात हजारो हातांचं योगदान येत आहे. नवीन लेखक पुढे येत आहेत. हजारो लोक, रोज, कुणी आठ, कुणी दहा, कुणी शंभर, मेल आय डींचं योगदान देत आहेत. तुम्हीही तुमच्या ओळखीच्या शक्य तेवढ्या मराठी लोकांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना दर आठवड्याला विनामूल्य ई पुस्तकं पाठवली जातील. मराठी माणूस भले पैशात मागे असेल, पण वाचनात इतर लोकांपेक्षा नक्की पुढे आहे. आणि आज ना उद्या ही गोगल गाय वाटणारी भाषा ढाण्या वाघाचं स्वरूप धारण करील. करीलच!

सर्वांची साथ हवी यार! कृपया आपल्या किमान आठ आप्त मित्रांच्या मेल आय डी esahity@gmail.com या पत्त्यावर कळवा आणि या महायज्ञात सामिल करा. त्यांना आम्ही नवनवीन मराठी पुस्तकं विनामूल्य पाठवू.

साहित्य प्रतिष्ठान



**डॉ. मुरलीधर जावडेकर**

आत्महत्या? अन् तीही सहकुटुंब सहपरिवार आत्महत्या? होय! एका कुटुंबप्रमुखानं दूरगावी शिकत असलेल्या आपल्या मुलांना बोलावून घेतलं आणि बायकोमुलांसकट जीव दिला! दक्षिण हिंदुस्थानातील एका गावात सुमारे पंधरा वर्षांपूर्वी घडलेली ही घटना! कारण काय, तर निवडणुकीत त्यानं ज्याला विरोध केला तो निवडून आला; आणि त्या यशस्वी उमेदवारानं याला जगणं अशक्य केलं - नुसतं यालाच नव्हे, तर याच्या बायकोला आणि परगावी शिकणाऱ्या मुलांनासुद्धा! तिकडेच दुसऱ्या एका प्रांतात निवडणुका झाल्या, नवी विधानसभा भरली आणि नव्या उत्साहानं, नव्या आनंदानं, नवे आमदार उपस्थित झाले. पण सभा भरली अन् एका आमदाराला रडूच कोसळलं. हमसून-हुमसून रडू लागला तो. सगळे विचारू लागले; पण त्याला बोलवेचना. आवेग जरा कमी झाल्यावर तो म्हणाला, 'मी इथं आहे म्हणून जिवंत आहे, माझ्या गावी माझी बायकामुलं आता जिवंत असतील असं मला वाटत नाही!' विजयी उमेदवाराची ही अवस्था! मग त्या पराभूत उमेदवाराची काय झाली असेल? सुमारे दहा वर्षांपूर्वीची ही घटना. पूर्वेकडील त्या प्रांतात तर राजकीय खुनांचं सत्रच चालू आहे; आणि म्हणे, सवय व्हावी म्हणून बायकोमुलांदेखत हत्या केली जाते, आणि तीही एका वाराने नव्हे, तर पन्नास पन्नास वार निरनिराळ्या लोकांनी करून! राजकीय खुनांच्या वार्ताच नाहीत असा देशाचा कोणता तरी भाग शिल्लक राहिला आहे काय? आणि खुनांची संख्या वाढत चालली आहे हजारांनी. आणि साक्षीदार न्यायालयात सांगत आहेत, 'आम्हांला शिक्षा द्या पण आम्ही साक्ष देणार नाही, आम्ही साक्ष दिली तर आम्हांला संरक्षण कोण देईल?' 'राजकारण खुनांशिवाय कसं घडणार?' असंच मानून त्यात 'रंगणाऱ्या' एखाद्या हुकूमशहाविरुद्ध, दुसऱ्यांच्या भल्यासाठी आपला जीवही देणारा, आणि दुसऱ्याचा जीव घेण्याची पाळी येण्यापेक्षा आपणच डोळे मिटावेत असं वाटणारा मनुष्य उभा राहिला, तर? आणि लोक जागृत नसतील, तर? आणि लोकजागृतीचं काम करण्यासाठी स्थापिलेली विद्यापीठं भ्रष्ट झाली असतील तर? -

ता. क.

हा उतारा पहिल्या आवृत्तीचा आहे! आताचा...